TEXT FLY WITHIN
THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192461
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. G183.1 Accession No. G13482

Ph 53T

Author

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below.

नागपूर प्रकाशन क्रमांक—१८

# तेरी चूप मेरी चूप

## ( आणि इतर गोष्टी )

सौ० कमला फडके, एम. ए.

नागपूर प्रकाशन सिताबर्डी, नागपूर.

प्रकाशक—
**दि. मा. धुमाळ**
नागपूर प्रकाशन सिताबर्डी, नागपूर.

या पुढील आवृत्तीचे हक्क लेखिकेच्या स्वाधीन आहेत.

मुख पृष्ठावरील चित्र श्री. **दिनानाथ दलाल** यांचे आहे.

**किंमत २ रुपये**

**१९४६**

मुद्रक—
**ल. म. पटले**
रामेश्वर प्रिंटींग प्रेस, नागपूर.

१ तेरी चूप मेरी चूप!

२ पर्वतपे अपना डेरा.

३ दूरचे डोंगर.

४ माझा बजरंग.

५ इंफाळचा राजा.

६ बायकांनीं सिगरेट्स
ओढाव्या काय?

७ जावें त्याच्या वंशा—

८ एका कुलीन पुरुषाच्या
नाट्यसेवेची अमर कहाणी.

# नागपूर प्रकाशन
## प्रकाशक आणि विक्रेते
## सिताबर्डी, मेनरोड, नागपूर.

| | | |
|---|---|---|
| १ | माझें कादंबरी लेखन | १॥ |
| २ | वीणा | ३ |
| ३ | लढवय्ये | ३ |
| ४ | शककर्ता शालिवाहन | २॥ |
| ५ | परामर्श | ३ |
| ६ | प्रमद्वरा | २॥ |
| ७ | अमावास्या | २॥ |
| ८ | द्राविडी प्राणायाम | २। |
| ९ | प्रत्यय | २॥ |
| १० | कंगाल | २। |
| ११ | दोन घडीचा डाव | २॥ |
| १२ | माझी शीला | १। |
| १३ | पुन्हां एकदां | ३। |
| १४ | अडेल तट्टू | ३। |
| १५ | मृगाचा पाऊस | २ |
| १६ | लांब लांब सावल्या | २ |
| १७ | सन् १८५७ चें युद्ध | ॥ |
| १८ | तेरी चूप मेरी चूप | २ |

### आगामी

दोन प्रख्यात युद्धतंत्रे

जीवन प्रवाह

सखी

सांवलीच्या उन्हांत

*

# तेरी चूप-मेरी चूप : : १

चौथा तास संपल्यावर शामा कॉलेजमधून बाहेर पडली आणि नेहमी-प्रमाणं तिनं आपली सायकल उषेच्या घराकडे वळवली. कॉलेज आटोपल्यावर थेट घरीं न जातां शामा उषेच्या घरीं चहासाठी थांबत असे, त्याला दोन कारणें होतीं. पहिलं असं की तिचा स्वतःचा बंगला गावाबाहेर दोन मैलांवर नव्या वसाहतींत होता. शेवटचा संस्कृतचा 'सक्ती'चा तास आटोपल्यावर दोन मैल सायकल मारण्याची ताकद शामाच्या अंगीं उरत नसे. तेव्हां उषेच्या घरीं विश्रांतीबरोबर चहाहि घेण्याचा नियम तिनं ठरवून टाकला होता. दुसरं आणि याहून महत्त्वाचं कारण असं, की पाठलागानं तिचं प्रियाराधन करूं पाहणाऱ्या कॉलेज-विद्यार्थ्यांना चुकवण्यासाठी, टाळण्यासाठी तिला उषेचं घर फार उपयोगी पडत असे. डिबेटिंगचा सेक्रेटरी आठल्ये, मराठी मंडळाचा वेर्णेकर, तिच्या समोरच्या बांकावर वहिवाटीचा हक्क सांगणारा हसन शेख, केवळ तिच्याखातर पुनः पुन्हा टर्म्स भरून कॉलेजांत रेंगाळणारा पंडित, कॉलेजच्या वाचनालयांत एम्. ए. च्या अभ्यासासाठी पुस्तकं धुंडाळण्याऐवजी तिच्या दर्शना-साठी टपलेला क्षीरसागर, ही सारी मंडळी चौथा तास संपतो केव्हा आणि

शामाच्या सायकलीमागं आपली सायकल हाकतों केव्हां यासाटीं टपलेली असत. कित्येकदा, पुढं शामा आणि मागं ही उमेदवार मंडळी सायकलवरून चाललेली पाहून ही एखादी कम्युनिस्टांची मिरवणूक तर नाहीं, असा पाहणारांचा गैर-समज होत असे. एकदा तर कोणी राजकीय गुंडांनी या गैरसमजामुळं या मिरवणुकीवर दगडफेकहि केली होती! तेव्हापासून कॉलेज आटोपल्यावर उषेचं घर गाठून पाटलाग करणाऱ्या विद्यार्थ्यांना शामा गुंगारा देत असे. शामाचं प्रियाराधन करण्याचा हा 'राजमार्ग' बंद झाल्यावर या साऱ्या विद्यार्थ्यांनी भूमिगत चळवळ सुरु केली होती. शामाला प्रेमाची तशींच धाकाची निनांवी पत्रं पाठविण्यांत या भूमिगतांनी 'पत्री सरकारवर'हि ताण केली होती. आणि प्रेमाचीं हीं भूमिगत रोपटीं भुईमुगाच्या वेलाप्रमाणं उपटून टाकण्यांत शामानं ब्रिटिश सरकारवरहि मजल मारली होती.

युद्धाप्रमाणं प्रेमाच्या कथाहि ऐकण्यांत माणसाला गोडी वाटते. उषेला शामाच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकण्यांत मौज वाटत असली, तरी पुष्कळदा मनांतून तिला शामाच्या भवितव्याची चिंता वाटत असे. शामा देखणी होती. तिला 'कॉलेजची राणी' म्हणत असत. तेव्हा तिच्या रूपावर भाळणारे, तिचं प्रियाराधन करण्यासाठी धडपडणारे विद्यार्थी, प्रोफेसर किंवा इतर गावांतले होतकरू तरुण यांना दोष देण्यांत अर्थ नव्हता. दोष द्यायचा झालाच तर तो शामाच्या तारुण्याला आणि सौंदर्याला दिला पाहिजे हें उषा समजून होती. परंतु मांजरानं उंदराचा खेळ मांडावा त्याप्रमाणं आपल्यावर अनुरक्त होणाऱ्या प्रत्येक तरुणाचा खेळ करण्यांत जेव्हां शामा आनंद मानूं लागली, तेव्हा उषेला तिच्याविषयीं काळजी वाटूं लागली. दृष्टीस पडेल त्या झाडावर हातांतील कुऱ्हाड चालवून पाहणाऱ्या जॉर्ज वॉशिंग्टनप्रमाणं आपल्या सौंदर्याची तलवार प्रत्येक पुरुषाच्या हृदयावर चालवून त्याला जायबंदी करण्याचा पोरखेळ शामानं चालवावा हें उषेला पटत नसे. जर्मनीप्रमाणंच शामालाहि निःशस्त्र बनवून आपल्या ताब्यांत ठेवणारा कोणी महाभाग आल्याशिवाय शामाच्या वात्रटपणाला आळा बसणार नाहीं हें ती जाणून होती. परंतु तशी प्रार्थना करण्यापलीकडे उषा काय करूं शकणार होती?

नेहमीप्रमाणं तिनं आपली सायकल फाटकाशीं टेकून ठेवली आणि "उषा" अशी हाक मारीत, रेडिओजवळच्या प्रशस्त आरामशीर खुर्चीत अंग टाकावं म्हणून ती दिवाणखान्यांत शिरली. ती खुर्चीपाशीं आली तेव्हा तिच्या लक्षांत आलं, की खुर्ची रिकामी नव्हती. डोक्यावर गांधी टोपी, अंगांत नेहरू शर्ट आणि साधंसुधं खादीचं धोतर नेसलेला एक गौरवर्ण तरुण गृहस्थ एक भला मोठा ग्रंथ वाचीत बसलेला तिला आढळला. तिच्या पावलांची, बागड्यांची चाहूल लागूनहि त्यानं वर पाहूं नये, तिची दखल घेण्याइतपत देखील जिज्ञासा किंवा दाक्षिण्य त्याच्या ठिकाणीं असूं नये याचं तिला जितकं आश्चर्य वाटलं तितकीच ती नाराजहि झाली.

त्यानंतर ती दोनचार वेळां तरी उषेच्या घरीं गेली; पांचसहा वेळां व्हरां-ड्यांत, जिन्यामध्ये आणि फाटकाशीं त्या तरुण गृहस्थाच्या अंगावरून ती गेली; परंतु एकदाहि त्यानं तिच्याकडे साधा दृष्टिक्षेपहि केला नाही. किंबहुना घरांत उगीचच फेऱ्या मारणाऱ्या आगंतुक आणि निरुद्योगी मांजरांतच त्यानं तिची गणना केली होती! शामाला हा नवा अनुभव होता. पुरुषजात तेवढी आपल्या हातांतील मेणाचं बाहुलं समजणाऱ्या तिच्या घमेंडखोर मनाला या अनुभवानं धक्का दिला होता. या तरुण गृहस्थाच्या उपेक्षेनं तिला दुःख झालं नव्हतं; परंतु तिचा स्वाभिमान दुखावला गेला होता, डिवचला गेला होता! या अप-मानाचा सूड घेण्याचं सामर्थ्य आपल्या सौंदर्याच्या ठिकाणीं आहे असा तिचा आत्मविश्वास होता. म्हणून तिसरे दिवशीं कपांतला चहा तसाच ठेवून शामानं उषेला विचारलं, "हा कोण बाई जगावेगळा पाहुणा ठाणं देवून बसला आहे तुझ्या घरीं?"

"जगावेगळा?" उषेनं विचारलं. पण मग शामाच्या बोलण्याचा अर्थ लक्षांत येतांच ती म्हणाली, "तुझ्या जगांत असा पुरुष आढळणं कठीण आहे! तेव्हा त्या दृष्टीनं आमचा मोहन तुला जगावेगळा वाटावा हें साहजिकच आहे."

"बरीच आहेस की! मला टोले देतेस होय? माझ्या नादीं लागणारे सारे पुरुष नाचरे असतात असं म्हणायचं आहे तुला. पण एक लक्षांत ठेव,

की सारे पुरुप येथूनतेथून सारखेच असतात. हे संभावित पुरुप म्हणजे कातडीं पांघरलेले—"

उषेला शामाची ही बडबड रुचली नाही. ती मधेच म्हाणली. "तुझं पुरे ग शामा ! तुझ्या दृष्टीला कोणता पुरुप सभ्य दिसतो? पण आमच्या मोहनच्या बाबतींत तुला मी असलं काही बोलूं देणार नाही. तो माझा मावसभाऊ. त्याचं आणि माझं लहानपण एकत्र गेलं. मी त्याला पुरता ओळखतें. लहानपणीं सूर्य नमस्कार घालण्याबद्दल त्याला दासबोध बक्षीस मिळाला होता व कॉलेजात जाईपर्यंत तो दासबोधाचीं पारायणं करीत असे. कॉलेजात गेल्यावर तर त्याची मान सदा गणितांच्या व संस्कृताच्या पुस्तकात खुपसलेली असायची. आणि आतां कॉलेज सोडून दोन वर्पं झालीं तरी त्याचा अभ्यास सुटलेला नाही. 'ज्ञानेश्वरीचं तत्त्वज्ञान' या विपयावर निबंध लिहून तो पीएच्. डी. मिळविणार आहे. एवढ्या आयुष्यात त्यानं आईबहिणीखेरीज कुणाला पत्र पाठवलेलं नाही. सांगून आलेल्या मुलींचींदेखील त्यानं तोंडं पाहिलीं नाहीत. त्याला सुपारीच्या खांडाचंदेखील व्यसन नाही. त्याची स्नान-संध्या, पूजा-अर्चा आणि दासबोध-ज्ञानेश्वरीचं वाचन कधीं चुकत नाही. वयाला पंचवीस वर्पं झालीं तरी अजून एकहि सिनेमा अगर नाटक त्यानं पाहिलेलं नाहीं. नाटक-कादंबऱ्यांना तो शिवत नाहीं. म्हणूनच मी म्हटलं, की तुझ्या जगांत मोहनसारखा पुरुप आढळणार नाही. तो सत्पुरुप आहे, समजलीस?"

"सत्पुरुप?" शामा त्या शब्दाचीं चेष्टा करण्यासाठी हसून म्हणाली, "अग, असे सत्पुरुप पाहिलेत मीं शेंकडो. विश्वामित्रानं मेनकेच्या मोहाला बळी पडून साऱ्या पुरुपजातीची कायमची पत घालवून टाकली आहे!"

"पुराणांतलीं वांगीं पुराणांत. विश्वामित्र कांही माझा मावसभाऊ नाही. तेव्हा त्याची खात्री मला कशी देतां येणार? पण मोहन माझा भाऊ आहे. त्याची खात्री मला देतां येईल. प्रत्यक्ष मेनका जरी त्याच्यापुढं येवून नाचूं लागली, तरी तो पुस्तकांतून डोकं वर काढणार नाही." उपा म्हणाली.

"तें बरोबर आहे. विश्वामित्राला जिंकणारी मेनका या तुझ्या भावाला कशी जिंकू शकेल ? तिचीं हत्यारं आतां जुनीं झालीं. युद्धाप्रमाणं प्रेमाचंहि तंत्र दिवसेंदिवस बदलत चाललं आहे. मेनकेला जें साधणार नाहीं तें मी करून दाखवीन."

"म्हणजे आमच्या मोहनला जिंकून दाखवशील ? भलत्या पैजा कशाला मारतेस, शामा ?"

"मारलेली पैज मी कधींच हरत नाही. आजपासून बरोबर पंधरा" दिवसांच्या आंत तुझ्या भावाचं मन पालटीन तरच मी नावाची शामा !" शामानं पैजेचा विडा उचलला.

नंतर दोन दिवसांनी शामा उषेच्या घरीं गेली तेव्हा उषा घरांत नव्हती. परंतु शामा मागं परतली नाही. तिला पैजेची आठवण झाली. ती थेट सैंपाक-घरांत गेली आणि स्टोव्ह पेटवून तिनं दोन कप चहाचं आधण ठेवलं. चहा घेऊन ती दिवाणखान्यांत गेली तेव्हा मोहनची स्वारी नेहमीप्रमाणं कसल्यातरी जाडजूड ग्रंथात डोकं खुपसून बसलेली तिला दिसली. तिनं ट्रे टेबलावर ठेवला आणि एक खुर्ची ओढून तीवर बसत तिनं मोहनला विचारलं, "चहा घेणार का थोडा ?"

तिच्याकडे चमकून पाहात मोहन म्हणाला, "मला वाटलं उषा-ताईच आली !"

"उषाताईऐवजीं मी आलें म्हणून कांहीं बिघडलं नाही ना ?" शामानं खोडकरपणानं प्रश्न केला. त्या प्रश्नानं मोहन गोंधळून गेलेला पाहून ती आण-खीच खट्याळपणानं म्हणाली, "नाही म्हटलं, माझ्याशी बोलायचं-चालायचं नाही त्याप्रमाणं माझ्या हातचा चहाहि घ्यायचा नाहीं- असं ठरवलं आहे की काय तुम्ही ?"

आतां मात्र मोहन चांगलाच गोंधळला. तिचा तो समज दूर करण्याच्या घाईत त्याला कांही सुचेना. तो फक्त म्हणाला, "तुमचा भलताच गैरसमज झालेला दिसतो आहे."

आणि केवळ तिचा तो गैरसमज दूर करण्याच्या शिष्टाचाराखातर मोहन तिची बडबड ऐकून घेऊं लागला. तिनं जी बडबड चालवली होतीं, ती तिच्या सिनेमानटीसारख्या रूपाला शोभणारी नव्हती, किंवा उपेनं जे तिच्या स्वभावाचं त्याच्यापाशीं वर्णन केलं होतं त्याला जुळणारी नव्हती. एम्. ए. ला आपण संस्कृत-मराठी घेऊन बसणार आहों, अशी प्रस्तावना करून तिनं आपल्या भाषणाचा ओघ ज्ञानेश्वराकडे वळवला होता. आणि ज्ञानेश्वराच्या भाषेचं, विचाराचं सौंदर्य ती सोदाहरण त्याला ऐकवित होती. आपलं भाषण ऐकून मोहन किंचित आश्चर्यचकित झाला असावा अशी शंका येताच ती चटकन् म्हणाली होती, "माझा संतवाङ्मयाचा अभ्यास आज कित्येक वर्षं चालू आहे. विशेषतः ज्ञानेश्वरीवर मी खूपच विचार केला आहे. माझे बाबा तर ज्ञानेश्वरीवरची एक मोठी 'ॲथॉरिटी' समजले जातात. तुम्हाला त्याची फार मदत होईल. शिवाय ज्ञानेश्वराचा एक अभ्यासू भेटला म्हणून त्यानाहि तुमच्या भेटीनं आनंद होईल. तेव्हा उद्या संध्याकाळीं तुम्ही याच. आपण अठराव्या अध्यायावर चर्चा करूं."

शामानं ठरविलेल्या वेळीं तिच्या घरी जाणं मोहनला टाळतां येणं शक्य नव्हतं. ती काही सिनेमाला, नाटकाला, जलशाला किंवा चहाला बोलावीत नव्हती. अशापैकीं एखादं कारण असतं तर 'असल्या करमणुकी आपल्याला आवडत नाहीत' अशी सबब मोहनला सांगतां आली असती. परंतु ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथावर तिच्या वयोवृद्ध वडिलांचं प्रवचन ऐकण्याचं आमंत्रण नाकारणं म्हणजे तिचा नाही तरी ज्ञानेश्वराचा अपमान करण्यासारखं आहे, असा विचार करून मोहननं शामाचं आमंत्रण स्वीकारलं.

"आज तुमचा एक शिष्य तुम्हांला भेटायला येणार आहे," असं जेव्हां शामा आपल्या बाबाना म्हणाली, तेव्हा त्यांनी आश्चर्यानं तिला विचारलं, "मला भेटायला?"

बाबांना आश्चर्य वाटणं साहजिक होतं. रिटायर झालेल्या डॉक्टराप्रमाणें कॉलेजच्या नोकरींतून मुक्त झाल्यावर बाबा विद्यार्थ्यांना सल्ला देत असत.

परंतु शामा कॉलेजात जाऊं लागल्यापासून बाबाऐवजी शामाशीच सल्लामसलत करण्यासाठी विद्यार्थी झटत. घरीं कुणी विद्यार्थी आला तर त्याला शामाचीच भेट हवी असायची हें कटुसत्य त्यानी पचविलं होतं. अभ्यास हें त्यांचं साधन असून शामा हें त्यांचं साध्य होतं, ही अंदरकी बात बाबा जाणून होते. त्यामुळं कुणीहि विद्यार्थी मतवाङ्मयासंबंधी अगर अर्थशास्त्र, भापा वगैरेसंबंधी त्यांचा सल्ला विचारण्यासाठी म्हणून त्यांच्या भेटीस आला, तरी बाबा त्याची कुचंबना करीत नसत. स्वतःचा वेळ खर्चून या तरुण मंडळींच्या शिव्या खाण्यापेक्षां त्याना जरूर तें स्वातंत्र्य देऊन वडील माणसानी चांगुलपणा घ्यावा अशा मताचे बाबा असल्यानं अभ्यासांतल्या 'अडचणी' सोडविण्यापेक्षा स्वतःची अडचण विद्यार्थ्यांना होऊं नये म्हणून ते शक्य तितके दूर राहत. ज्ञानेश्वरीच्या चर्चेसाठी मोहन येणार आहे, असं सांगितलं होतं तरी मोहन कशासाठी येणार होता हा अंदाज त्यानी बांधला; आणि म्हणून मोहन जेव्हां ठराविक वेळीं त्यांच्या भेटीला आला तेव्हां त्याला नमस्कार करून डोकेंदुखीच्या निमित्तानं अदृश्य होण्याचा चमत्कार त्यानीं केला. आणि साहजिकच ज्ञानेश्वरीवरील चर्चेची सारी जबाबदारी शामा आणि मोहन यांच्यावरच पडली.

नंतरच्या दिवसांत अनेक निमित्तं पुढं करून शामानं मोहनच्या गाठीभेटी घेतल्या. अर्थात् उषेला त्याची फारशी कल्पना नव्हती. मधूनच कधीतरी शामाच्या पैजेची आठवण झाली की तीं विचारी, "काय शामा, प्रगति कुठवर झाली ?" यावर शामाहि हसून उत्तर देत असे, "अजून चार दिवस अवकाश आहे"..."दोन दिवस आहेत..."

पैजेचा शेवटचा दिवस उजाडला तशी शामा चिंतातुर झाली. गेल्या तेरा चौदा दिवसांत हरप्रयत्नानं तिनं मोहनच्या भेटी घडवून आणल्या होत्या; परंतु त्यांतून तिला हवं तें निष्पन्न झालं नव्हतं. त्या भेटींचं, बोलण्याचालण्याचं स्वरूप अजूनहि औपचारिकच राहिलं होतं. औपचारिकपणाची ही 'सिगफ्रीड लाइन' ओलांडण्याचं दिव्य एकदां केलं की मोहनचं हृदय काबीज करण्यास अवकाश नव्हता. परंतु ती ओलांडण्याचा तिचा प्रयत्न विफल झाला होता. शामानं आडून सूचक रीतीनं चालविलेल्या 'गुरिला' युद्धाला मोहननं मोठ्या

चिकाटीनं तोंड दिलं होतं. तेव्हां आता एकदा निर्वाणीचा हल्ला करायचा असं शामानं मनाशी ठरविलं आणि ती चढाईची तयारी करूं लागली.

" आज आमच्या मावशीनं तुम्हाला बोलावलं आहे संध्याकाळीं सात वाजतां. " शामा मोहनला म्हणाली.

" तें कां ? " मोहननं पुस्तकांतून वर मान न करतांच तिला विचारलं.

" बनारसचे एक कोणी संस्कृतचे बडे प्रोफेसर त्यांच्या घरीं चहाला येणार आहेत. तेव्हा त्यांच्याशी गप्पागोष्टी करायला तसाच कुणी विद्वान हवा म्हणून तिनं मला सांगितलं, कीं तुझ्या मोहनरावांना घेऊन ये. "

" कुणाच्या ? " मोहननं दचकून विचारलं.

आपल्या तोंडांतून हा काय भलताच शब्द बाहेर पडला या विचारानं शामा शरमली.

" 'तुझ्या' असं मावशी म्हणाली बरं का ? मी नाहीं. " शामानं स्वतःला सावरून घेतलं.

" बरं पण तुम्हांला नातेवाईक मंडळी आहेत तरी किती ? चार आत्या, तीन चुलतभाऊ, दोन मेहुणे, दोन आजोबा, एक आते बहीण, एक मानलेली बहीण नि आतां जी मला आमंत्रण देत आहे ती मावशी...अरे बापरे ! "

" त्यांत वाईट काय झालं ? 'अरे बाप रे !' म्हणण्यासारखं काय आहे ? " शामानं त्याच्यावर खोटं रागावून प्रश्न केला.

" वाईट एवढंच, की जिनं मला बोलवावंसं मला वाटतं ती कधीच बोलवीत नाही. " पुस्तक मिटून बाजूला ठेवीत मोहन म्हणाला.

" पण माझ्या बोलावण्यानं तुम्ही येणार कसे ? तुम्ही तर विद्वान माणसं ! कार्तिकस्वामीचे अवतार ! तेव्हा मला तें धाडस करतां येईना. पण आतां तुम्हांला बोलावलं तर तुम्ही याल ? " शामानं विचारलं.

" हो. निदान तुमच्या नातेवाईक मंडळींना चुकवण्यासाठी तरी येईन. मावशीपेक्षा..."

" भाची बरी. होय ना ?" असं म्हणून शामा मोठ्यांदा हसली.

कालव्याच्या तीरानं जाणारी ती पाऊलवाट अगदी निर्मनुष्य होती. कालव्यांतल्या लव्हाळ्यांचा ओलसर, कडवट दर्प, कापणीला आलेल्या पिकाचा गोड सुगंध आणि मोकाट फिरणाऱ्या वाऱ्याच्या झुळुकीबरोबर वाहणाऱ्या रानवट वनस्पतींचा कच्चा हिरवा वास त्या वातावरणांत मिसळला होता. अशा ठिकाणीं एखाद्या तरुण पुरुषाबरोबर सहल करणं कुणाहि तरुण स्त्रीला धोक्याचं वाटलं असतं. मोहनबरोबर या पाउलवाटेनं चालतांना शामाला या धोक्याची जाणीव होती. परंतु या धोक्यांत तिनं आपण होऊन उडी घेतली होती. उषेपाशी मारलेली पैज तिला जिंकायची होती. मोहनचं विरक्त मन आपण पालटवलं याचं एक तरी उदाहरण उषेला दाखल्याशिवाय पैज जिंकण्याची तिची महत्त्वाकांक्षा पुरी होणार नव्हती. शिवाय मोहन तरुण असला तरी किती विचारी; किती सच्चरित्र आणि साधुपुरुष आहे, तें गेल्या चौदा दिवसांच्या सहवासांत तिला कळून चुकलं होतं. मोहनबरोबर अशा निर्जन रानांत फिरणं म्हणजे ताडीच्या झाडाखाली बसून दूध पिण्यासारखंच होय, अशा विचारानं तिनं आपल्या मनांत डोकावणारी शंका नाहीशी केली होती आणि ती निर्धास्तपणें त्याच्याबरोबर चालली होती.

म्हणून चालतांचालतां मोहन एकदम थांबला आणि त्यानं आपले दोन्ही हात तिच्या खांद्यावर ठेवून तिला जवळ ओढलं तेव्हा ती विलक्षण दचकली, घाबरली, बावरून गेली ! प्रेमाची कल्पना करणं, चेष्टा करणं वेगळं आणि हा अनुभव वेगळा, हें प्रथमच तिच्या लक्षांत आलं. मोहनपासून दूर होण्याचा प्रयत्न करण्याइतकी तिच्या मनाला शुद्ध होती कुठं ? त्या पहिल्या स्पर्शानं तिच्या देहांतील सारी लज्जा, सारा संकोच, सारा संयम जाऊन उलट आतुर ।। एकदम उसळल्यामुळं तिच्या अंगाचा थरकांप उडाला ! तिला

आणखी छातीशी घेऊन उजव्या हातानं तिची हनुवटी वर करून मोहननं तिचं चुंबन घेतलं.

तिच्यापासून दूर झाल्यावर मोहन तिला म्हणाला, " आता झालं तुझ्या मनासारखं ? "

शामा त्याच्या या प्रश्नानं बुचकळ्यांत पडली. तिनं त्याच्या नजरेला नजर देण्याचं टाळून त्याला विचारलं, " म्हणजे ? "

" म्हणजे असं, की आज चौदा दिवस माझा जो छळ तूं चालवला होतास त्याची शिक्षा मिळाली तुला ? उषेनं सांगितलं होतं मला ... "

" काय सांगितलं होतं ? " शामानं घाबरून प्रश्न केला.

उषेनं पैजेची हकीगत तर मोहनला सांगितली नसेल ? या शंकेनं ती अस्वस्थ झाली. आपण केवळ पैजेसाठी पाठलाग केला हें सत्य मोहनला कळलं तर तो आपली काय किंमत करील या विचारानं तिला चैन पडेना. म्हणून तिनं पुन्हा त्याला विचारलं, " काय सांगितलं होतं उषेनं ?"

"की दुसऱ्याचा छळ करायची फार संवय आहे तुला."

" एवढंच ना ?" शामानं सुटकेचा निःश्वास टाकला आणि आपणहि त्याला एक चिमटा घ्यावा अशा खट्याळ हेतूनं ती त्याला म्हणाली, "मलाहि उषेनं सांगितलं होतं..."

मोहन तें ऐकतांच दचकला. तो आला त्या दिवशीं रात्रीं उषेशीं जें त्याचं बोलणं झालं त्यातील एक शब्दहि शामाच्या कानीं पडतां कामा नये असं त्यानं उषेला बजावलं होतं. उषेनं त्याचं गुपित राखण्याचं वचनहि त्याला दिलं होतं. पण बोलूनचालून स्त्रीजात ! तोंडात तीळ भिजत नाही अशी ख्याति. म्हणून त्यानं पुन्हा विचारलं, " काय, सांगत होती तरी काय ही उषा ?".

" की तुम्ही कार्तिकस्वामीचे अवतार आहात म्हणून !"

" एवढंच ना?" असं म्हणून मोहन मोठ्यांदा हसला.

कालव्याच्या काठीं, मऊमऊ हिरवळींत प्रेमाच्या गोष्टी करतांना शामाला आणि मोहनला वेळेचं भान उरलं नव्हतं. त्याचा डावा हात तिच्या गळ्याभोंवतीं होता. त्यामुळं त्याच्या मनगटावरल्या घड्याळात भराभर पुढं सरकणाऱ्या काट्याकडे तिचं लक्ष गेलं नव्हतं आणि त्याच्या दृष्टीला तर फक्त शामाच दिसत होती. स्वतःच्या बाहुपाशात तिला कायमची बंदिवान करूं पाहणारा मोहन, तिचा गुलाम झाला होता आणि ती सांगेल तसं वागण्याची तिला कबुली देत होता. तिच्या साऱ्या अटी त्यानं मान्य केल्या होत्या.

" आजपासून गांधी टोपी, नेहरू शर्ट सोडला ? " शामानं विचारलं.

" सोडला. " असं म्हणून मोहननं तिचं चुंबन घेतलं आणि प्रतिज्ञेवर अशी गोड सही केली.

" पूजाअर्चा सोडली ? "

" देवाची सोडलीं. तुझी पत्करली. " मोहननं पुन्हां सही केली.

" ज्ञानेश्वरी सोडली ? " शामानं विचारलं.

" ज्ञानेश्वरी सोडली. हृदयेश्वरी स्वीकारली. " मोहननं पुन्हां सही केली.

एकमेकांना अशी वचनं देण्यांत आणि एकमेकांचीं चुंबनं घेण्यात तासाचे सेकंद कसे वाटतात तें प्रेमिकांनाच माहीत ! क्षितिजावर उगवलेला चंद्र आपलं प्रतिबिंब कालव्याच्या पाण्यांत पाहूं लागला तेव्हां शामा-मोहन भानावर आली.

रात्रीं अकरा वाजतां मोहनबरोबर शामाहि घरी आलेली पाहून उषेला प्रथम आश्चर्य वाटलं. त्या दिवशीं संध्याकाळीं सहाला गंधर्वाचं 'स्वयंवर'

लागलं होतं; त्या नाटकाला ही दोघं गेलीं असावींत असा तर्क बांधून तिनं विचारलं, "काय, आवाज लागला का ?"

हिला वेड तर लागलं नाही, अशी त्या दोघांना शंका आली. शामानं विचारल, "आवाज ? कोणाचा ?"

"कोणाचा म्हणजे ? गंधर्वांचा. आज 'स्वयंवर' होतं ना ? तुम्ही दोघं स्वयंवराला गेलां होतां ना ?" उषेनं विचारलं.

"स्वयंवराला गेलो होतों. पण गंधर्वांच्या नाहीं, शामाच्या !" मोहननं हसत उत्तर दिलं.

शामाला तिच्या घरीं पोचवून परत आल्यावर निजण्यापूर्वी मोहन उषेला म्हणाला, "उषाताई, तुझी-माझी युक्ति सफल झाली. शामा मला मिळाली. मात्र तरीहि माझं गुपित तूं तिला कळवतां कामा नये. ज्ञानेश्वरीचा अभ्यास, खादीचे कपडे, पूजा-अर्चा वगैरे गोष्टींची बतावणी शामाला ईर्ष्या चढावी म्हणून मी करीत होतों हें तिला कळलं तर ती रागावेल आणि माझ्या हातची जाईल."

"अरे, पण हें संन्याशाचं सोंग तिच्यासाटी तूं जन्मभर करणार कसं ?' उषेनं चिंतातुर होवून विचारलं.

"या पेचप्रसंगांतून मोठ्या चमत्कारानं माझी सुटका झाली. या साऱ्या गोष्टी सोडा अशी तिनं मला अट घातली आणि मी वरकरणी विश्वामित्राच्या आविर्भावानं पण मनांतून आनंदानं तिला वचन दिलं, की 'तुझ्यासाठी ही संन्यस्त वृत्ति सोडली.' माझं सोंग उघडकीस आलं नाहीच; उलट शामाच्या दृष्टीनं मी प्रेमवीर ठरलों."

उषेनं मोहनचं गुपित राखण्याचं वचन दिलं तेव्हां तशा अपरात्रींहि मोहननं सिगारेटची केस उघडली आणि अधीरतेनं पहिला झुरका घेतला.

विरहानं प्रेमाची गोडी वाढते म्हणतात. प्रेमाची कुणास ठाऊक, पण पंधरा दिवसांच्या विरहानंतर सिगारेटची गोडी मोहनला मोठी अवर्णनीय वाटत होती !

दुसरे दिवशीं शामा उषेच्या घरीं आली आणि उषेला एकीकडे नेऊन म्हणाली, "मी पैज जिंकली तर वाटेल तें देईन म्हणाली होतीस ना ?"

"असेल." उषा चाचरत म्हणाली.

"मग मला एक वचन दे."

"माग ना."

"मी तुझ्याजवळ तशी पैज मारली होती ही गोष्ट तूं कधीहि मोहनला सांगतां कामा नये."

पैजेचा मोबदला वचनावरच भागला हें पाहून उषेचा जीव भांड्यांत पडला. तिनं तें वचन देवून टाकलं.

पण दिलेल वचन पाळण किती कठीण असतं याचा पुरा प्रत्यय उषेला आला आहे. शामा-मोहनच्या लग्नाचा विषय कुठंहि निघाला, कीं त्यामागचं दुहेरी गुपित सांगण्याचा मोह तिला अनेकदा होतो; पण तें तिला सांगतां येत नाही. 'तेरी चुप, मेरीभी चूप' अशा कटांत ती सामील आहे. आणि तो कट मोठा गोड आहे.

# पर्वतपे अपना डेरा : : १

एखादं माणूस अचानक पाय घसरून पडावं त्याप्रमाणं सीता प्रेमांत पडली होती! वास्तविक प्रेमांत पडणं म्हणजे विहिरींत पडण्याइतकी भयंकर गोष्ट थोडीच आहे? परंतु सीतेच्या बाबतीत मात्र ती तिला स्वतःला नव्हे तरी इतरांना त्याहूनहि भयंकर वाटण्यासारखी होती!

याचं पहिलं कारण असं, की तिची तिशी उलटून गेली होती. सोळा वर्षाच्याच मुलीनं प्रेम करावं आणि तिशी उलटून गेलेल्या बाईनं तसल्या भानगडींत पडूं नये असा कायदा थोडाच आहे? परंतु सीतेकडे पाहिल्यावर मात्र अशा कायद्याची आवश्यकता भासली असती. तिच्या तारुण्याचा बहर आता सुकला होता. तिच्या शरीरसौष्ठवांतला कोवळेपणा आणि गोंडसपणा नाहीसा झाला होता. तिचे केंस देखील आता निबर आणि निर्जीव दिसूं लागले होते. तिच्या गालाचीं हाडं वर आलीं होतीं, ओठांचा हसरेपणा गेला होता आणि चेहऱ्यावर अकालीं पोक्तपणाच्या रेषा अगदीं स्पष्ट उमटल्या होत्या. तिच्यासारख्या बाईनं प्रेमाचा विचार करणं देखील हास्यास्पद ठरलं असतं.

दुसरं कारण असं, की ज्याच्यावर तिचं प्रेम जडलं होतं त्या डॉ. संकेश्वरांचं आधीच लग्न झालेलं होतं आणि वर त्यांना चार मुलंहि झालीं होतीं. पूर्वी मदनाच्या हातीं धनुष्यबाण असे. त्यामुळं ऐन पंचविशींतला, स्थावरजंगम इस्टेट आणि सरकारी पेन्शनीची नोकरी असलेला असा वर पाहून बाणाचा नेम सोडतां येत असे. पण अलीकडे लढाईमुळं प्रेमाचंहि तंत्र बदललेलं असावं. प्रेमाच्या 'पॅराशूट'मधें अडकून माणूस गिरक्या खाऊं लागला कीं तें आगींत पडेल की फुपाट्यांत उतरेल, कांही सांगतां येत नाही! डॉ.

संकेश्वरांच्या प्रेमांत सीता पडली होती. तें प्रेम सफल होईल किंवा नाही, उचित आहे किंवा नाही, याचा कांही विचार तिला सुचत नव्हता. ज्योतीवर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणं तिचं मन अविचारानं डॉ. संकेश्वरांचा ध्यास घेई. आपले पंख जळतील याची तिला भीति वाटत नव्हती. तिला भीति वाटत होती ती फक्त तिच्या मावशीची. आपल्या मनातलं गुपित मावशीला कळलं तर आपली धडगत नाही हें तिला ठाऊक होतं. त्यामुळं मावशीपुढं उभं राहण्याची सुद्धा तिला अलीकडे भीति वाटूं लागली होती.

बालपणापासूनच कुणाच्यातरी धाकात तिला सतत राहावं लागलं होतं. कारण ती बालविधवा होती. लहानपणीं मुलीची जात म्हणून तिच्या आईनं तिला कडक शिस्त लावली होती. लग्नानंतर तरी आपल्याला मोकळीक मिळेल अशी तिला आशा होती. पण लग्न झाल्यावर तर तिची स्थिति आगीं-तून फुफाट्यात पडल्यासारखी झाली. जर्मनाचा कॉन्सेंट्रेशन कँपहि बरा इतका तिला सासरीं जाच होता. तिच्या सासूपुढं प्रत्यक्ष हिटलर चळचळा कापूं लागला असता! सीतेचा नवरा जेव्हा लग्नानंतर पांचसहा महिन्यांच्या आंतच प्लेगनं तडकाफडकी वारला तेव्हा तर सासूच्या जाचाचा कडेलोटच झाला! तिच्या मुंबईच्या मावशीनं तिची सुटका केली नसती, तर सीतेला जन्मभर सासूच्या त्या कॉन्सेंट्रेशन कॅंपात रखडावं लागलं असतं. 'जाऊं दे पीडा एकदाची!' असं म्हणून तिच्या सासूनं तिला मावशीच्या हवालीं केली होती आणि सासर-माहेरच्या घराण्याला कलंक लागेल असं कोणतंच कृत्य सीता कर-णार नाही याबद्दल जामीन राहून तिची मावशी तिला मुंबईला घेऊन गेली होती.

त्या गोष्टीला आतां चौदा वर्षं उलटून गेलीं होतीं. चौदा वर्षांच्या या दीर्घ-काळांत मराठी सात आणि इंग्रजी चार इयत्तांचा अभ्यास तिनं पुरा केला होता. नर्सिंगचा कोर्स घेऊन तिनं परीक्षा दिली होती आणि मावशीच्या ओळखीच्या एका डॉक्टरणीच्या मॅटर्निटी होममधें महिना पन्नास रुपयांवर ती नर्स म्हणून काम करूं लागली होती. या चौदा वर्षांत ती अशिक्षिताची सुशिक्षित झाली होती. तिच्या तारुण्याचा बहर आला तसा वायाहि गेला

होता. टाकी घालून दगडाची मूर्ति घडवावीं तशी शिकवूनसवरून तिच्या मावशीनं तिला माणसांत आणली होती.

सीता माणसांत आली होती; पण माणसाप्रमाणं वागण्याची मात्र तिला पूर्ण बंदी होती ! 'तू बालविधवा आहेस. सासर-माहेरची अब्रू तुला संभाळली पाहिजे हा तिच्या मावशीचा अब्रू-संरक्षण कायदा सरकारच्या भारत-संरक्षण कायद्यापेक्षाहि कडक होता. या कायद्याची ती अगदी गुलाम बनली होती. "रस्त्यांतून चालतांना खाली मान घालून चाल ! हां, हसूं नको ! हा, बोलूं नको !" असं आपल्या मनाला ती सदा बजावीत असे.

ती नर्सिंग शिकत होती तेव्हा तिच्या बरोबरीच्या मुलींचे चाळे तिनं पाहिले होते. परीटघडीच्या युनिफॉर्ममधें कुणाचीं पत्रं त्या लपवितात हें तिला माहीत झालं होतं. अँग्लो-इंडियन जोडपीं एकमेकांच्या कमरेभोवतीं हात टाकून फिरतांना तिनं पाहिलीं होतीं. आणि एक काळ असा होता, की असं कांही दृष्टीस पडलं की तिच्या अंतःकरणात हुरहूर उत्पन्न होई, पथ्य पाळणाराला अपथ्य खाण्याची वासना अधिक, त्याप्रमाणं वैधव्याचं खडतर व्रत पाळणाऱ्या तिच्या मनाला पुरुषाच्या स्पर्शाचा मोह अनावर होई. पण मग "हें काय पाप माझ्या मनांत आलं ?" असं म्हणून ती आपलं मन जबरीन एखाद्या कामांत गुंतवीत असे. एकदा बेड्या घालण्याची संवय झाली की लोखंड बोचेनासं होतं, त्याप्रमाण तिच्या मनाला ही बंधन हळूहळू बोचेनाशी झालीं. मोहाचे क्षण निघून गेले. तारुण्याचा बहर ओसरला. आणि ती अकाली वृद्ध-होव वृद्धच-दिसूं लागली. मॉटर्निटी होम आणि आड रस्त्यावरच्या त्या चाळींतल्या पांचव्या मजल्यावरच्या दहा नंबरच्या खोलींतलं आपलं बिऱ्हाड याखेरीज तिला इतर जग मेल्यासारखंच होतं. ती दिवसेंदिवस एकलकोंडी बनत चालली होती. अँग्लो-इंडियन नर्सेस तिला चेष्टेनं विचारीत, "सीताबाय, तुम्हांला कुणीच बॉय-फ्रेंड नाहीं ?" ती निर्विकारपणे म्हणे, "ज्या गावाला जायचं नाही ती वाट कशाला विचारायची ?"

परंतु असं म्हणणारी सीता त्या वाटेनं कुणालाहि न विचारतां जाऊं लागली ! डॉ. संकेश्वरांच्या दवाखान्याकडे ती अलीकडे वरचेवर जाऊं येऊं

लागली होती. डॉ. संकेश्वरांच्या दवाखान्याकडच्या तिच्या या खेपा मावशीच्या लक्षांत आल्यावांचून राहिल्या नाहीत. तिच्याकडे खोचक नजरेनं पाहात मावशीनं तिला विचारलं होतं, " काय ग ? अजून नाहीं तुझी दाढ बरी झाली ? एक दांत बरा करायला शंभर खेपा घालायला लावणारा तो डॉक्टर आहे कीं कोपऱ्यावरचा कारागीर आहे ? "

डॉ. संकेश्वरांना मावशीनं ' कोपऱ्यावरचा कारागीर ' ठरवावं याचा सीतेला राग आला. ती म्हणाली, " भलतंच ग काय बोलतेस मावशी ? दाताचं काम मोठं किचकट असतं. आता नुसतं दाढेंत चांदी भरायचं काम शिल्लक उरलं आहे. मी म्हणतें चांदी भरा, तर डॉक्टर सारखा आग्रह करताहेत— चांदी नको, सोनंच भरूं. "

" सोनं भरील तर काय ? त्याच्या बापाचं काय जातंय ? नसतीं सोंग काढायचीं आणि लोकांकडून पैसे उकळायचे ? "

" तसे मुळीच नाहीत बरं का डॉक्टर ! " असं सीतेनं मावशीला उत्तर दिलं आणि मग ' डॉक्टर किती गोड आहेत ' या आवडत्या विचारांत तिचं मन गुंतलं. ती प्रथम त्यांच्या दवाखान्यांत गेली तेव्हा मनाशी किती घाबरली होतीं ! दवाखान्यांतल्या आंतल्या पार्टिशनमधलीं ती अक्राळविक्राळ खुर्ची आणि कपाटांतलीं धारदार हत्यारं पाहून तिचा जीव भीतीनं अर्धमेला झाला होता. डॉक्टर जेव्हा तिच्याजवळ आले तेव्हा तर ती पुरतीच बावरली. कांही केल्या ती तोंडच उघडीना ! " अहो, अशा लाजतां काय ? " असं म्हणून डॉक्टर जेव्हा तिच्या अगदी जवळ आले आणि डाव्या हाताच्या पंजानं तिच्या मस्तकाला आधार देऊन उजव्या हातानं त्यांनी तिची हनुवटी वर उचलली तेव्हा तर सीतेच्या अंगाला दरदरून घाम सुटला !

मात्र तो भीतीनं सुटला नव्हता ! आजपर्यंत कोणीहि न अनुभवलेल्या अशा सुखाची झळ लागूनच की काय, सीता त्या क्षणीं घामाघूम झाली होती. तरुणपणीं जेव्हा जेव्हा तिच्या मनांत पुरुषाच्या स्पर्शाची, अलिंगनाची आणि

२

चुंबनाची इच्छा उत्पन्न झाली होती, तेव्हा तेव्हा ‘हें काय पाप माझ्या मनात आलं!’ म्हणून तिनं ती दृढ निश्चयानं मारून टाकली होती. पण डॉक्टरांच्या या एका स्पर्शानं जणु संजीवन मिळाल्याप्रमाणं तिच्या साऱ्या मृत इच्छा आता एकदम जिवंत झाल्या होत्या.

आधीच पुरुषाची जात थोडी निर्भीड असते. त्यांतून पुरुष डॉक्टर असला की साहजिक त्याच्या बोलण्यांत, वागण्यांत वाजवीपेक्षा अधिक मोकळेपणा येतो. नवरासुद्धा विचारणार नाही असले नाजुक प्रश्न डॉक्टर लोक अगदी खुशाल बाईला विचारतात. एखाद्या मुलीचा नुसता हात धरायचा झाला तर सामान्य पुरुष महाकाव्य तरी रचतो किंवा मार तरी खातो. पण डॉक्टरकी हा धंदाच इतका सोयिस्कर आहे, की बाईचा नुसता हातच काय, तिच्या छातीचे ठोकेसुद्धा डॉक्टर अगदी बिनदिक्कत मोजूं शकतो. आपल्या धंद्याला अनुसरूनच डॉ. संकेश्वरांनी सीतेची हनुवटी धरली होती; आणि जेव्हा जेव्हा ती ड्रेसिंगसाठी म्हणून त्यांच्या दवाखान्यांत येत असे तेव्हा तेव्हा ते तिच्या जवळ जाऊन, “पाहूं काय म्हणते दाढ तुमची?” असं म्हणून तिची हनुवटी वर करून तिला तोंड उघडायला लावीत. पण डॉक्टरांच्या या स्पर्शाचा अननुभवी सीतेवर मात्र भलताच परिणाम झाला होता! डॉक्टर ज्या अर्थी आपल्याशीं इतक्या प्रेमळपणानं वागतात, आपली हनुवटी धरतात, त्याअर्थी आपण त्यांना आवडलो असलों पाहिजे—त्यांचं आपल्यावर थोडं तरी प्रेम जडलं असलं पाहिजे, अशा कल्पना तिला सुचूं लागल्या होत्या आणि या कल्पनांमुळं तिच्यांत अंतर्बाह्य फरक पडूं लागला होता.

ती आता पहिली सीता राहिली नव्हती. अंगांत दोन-दोन डिग्री ताप असतांना मॅटर्निटी होममधे खपणारी सीता, आता साध्या दाढ दुखीचा बाऊ काय करीत होती आणि डॉ. संकेश्वराच्या दवाखान्याकडे खेपा काय घालूं लागली होती! तिच्या पोषाखांत पहिला गबाळेपणा आता पार निघून गेला होता आणि मावशीची नजर चुकवून ती थोडी फॅशनहि करूं लागली होती. तिच्या बोलण्याचालण्यांत नवीनच हसरेपणा आणि खेळकरपण आला होता.

संकेतस्थलीं प्रियकराच्या गुप्त भेटी घेणाऱ्या कावेबाज तरुणीप्रमाणं तिचा चेहरा दिसू लागला होता.

सीतेमधे झालेला हा बदल तिच्या मावशीच्या कितपत लक्षांत आला होता कुणास ठाऊक! पण तळमजल्यावरच्या चाळीच्या आफिसात मुनीमाचं काम करणाऱ्या तात्यांनीं मात्र तिचं गुपित हेरलं होतं. कारण तिची मावशी स्त्री होती; पण तात्या पुरुष होते. आणि एखादी स्त्री प्रेमांत पडली आहे की नाही तें पुरुषच अधिक लवकर ओळखू शकतात. सीता मावशीच्या घरीं राहायला आल्यापासून तात्या तिला पाहात होते. त्यांच्या देखतच तिचं शिक्षण पुरं झालं होतं आणि तिला नोकरी लागली. त्याच्या देखतच ती लहानाची मोठी झाली होती आणि त्याच्यादेखतच तिचं तारुण्य, तिचीं उमेद आणि तिचं कर्तृत्व केवळ वैधव्यामुळं वाया गेलं होतं! पहिल्या तारखेला खोलीचं भाडं चुकतं करण्यासाठी ती तळमजल्यावर तात्यांच्या ऑफिसांत आली कीं तिच्या त्या अकालीं कोमेजलेल्या देहाकडे पाहून त्यांना करुणा येई. हिनं एखाद्याचाच संसार किती उत्तम केला असता? एखाद्याचाच कशाला, आपलाच संसार हिच्या बरोबर किती निराळा झाला असता, तें मनात येऊन तात्या हळहळत. परंतु त्या वेळीं 'दात आहेत तिथं चणे नसायचेच!' असं चिडून म्हणण्यापलीकडे ते काहीच करूं शकत नव्हते!

कारण त्या वेळीं त्यांची बायको कैकेयी जिवंत होती. त्यांच्या बायकोचं खरं नांव काही कैकेयी नव्हतं. परंतु तिच्या कजाग स्वभावामुळं तात्यांनी तिला त नांव बहाल केलं होतं. साऱ्या जन्मांत देवाब्राम्हणांसमक्ष पत्करलेल्या या एकाच स्त्रीशीं त्यांची गाठ पडली होती; आणि ती स्त्री मुलुखाची भांडखोर असल्यामुळं स्त्रीच्या प्रेमळ सहवासाची त्यांची तृष्णा अतृप्तच राहिली होती. त्यांच्या डोळ्यांसमोर स्त्री—प्रेमाची सरिता दुथडी भरून वाहत होती तरी तिच्या प्रवाहांतील थेंबभर पाण्यानंदेखील ओठ ओले करण्याची त्यांना मुभा नव्हती. कारण त्यांची 'कैकेयी' जिवंत होती आणि सीता वैधव्याचं व्रत अगदी कसोशीनं पाळीत होती. प्रथम पत्नी 'हयात' असतां दुसऱ्या लग्नाचा विचार करण्याचं आणि सीतेजवळ प्रेमाच्या गोष्टी बोलण्याचं धाडस तात्यांच्या ठिकाणीं मुळी नव्हतंच!

पण तात्यांच्या सुदैवानं युद्धाचा रंग एकाएकीं पालटला होता. "मी तुम्हाला पुरून उरलं आहे!" असं त्याना वरचेवर बजावणाऱ्या कैकेयीलाच अखेर पुरून तात्या उरले होते! ती दोनचार दिवसांच्या तापानं तडकाफडकी स्वर्गस्थ झाली होती; आणि आर्मिस्टिसनंतर जें दुःखमिश्रित आनदाचं वातावरण पसरतं तसं वातावरण साऱ्या चाळींत पसरलं होतं. लोकरूढि म्हणून तात्या उदास राहिले होते; परंतु कैकेयीच्या मृत्यूनंतरच्या दिवसांत त्यांची प्रकृति सुधारली होती, त्यांचं तोंड टवटवीत दिसूं लागलं होतं. त्यांनी नवीन कपडे केले होते; त्यांच्या ठिकाणीं नवा उत्साह उत्पन्न झाला होता आणि पूर्वी कधी न वाटणारी हुरहुर त्यांना नव्यानंच वाटूं लागली होती. प्रेमळ सहचारिणीसाठी त्यांच मन ओढ घेऊं लागलं होतं. आणि बहुतांशीं यामुळच—

सीतेमधे झालेला तो विलक्षण बदल त्यांच्या लक्षांत आला. मग त्यांचं मन अधिकच धीट झालं. आणि आजवर जो विचार त्यांनी कधी मनात येऊं दिला नव्हता त्या विचाराला त्यांनी ऐसपैस जागा दिली. आज हजारो वर्षे जो नाजुक प्रश्न पुरुष स्त्रियांना विचारीत आले होते, तो प्रश्न सीतेला आपण विचारावा का? "तूं माझी होशील?" असा प्रश्न तिला विचारावा का?

आपण असा प्रश्न केला तर सीता रागावणार नाही अशी त्यांना खात्री वाटत होती. कारण ती आता पूर्वीची सीता राहिली नव्हती. सीता कुणावर तरी प्रेम करूं लागली होती. आपण प्रश्न विचारण्याची घाई केली पाहिजे हेंहि तात्या ओळखून होते. कारण क्षयाप्रमाणं प्रेमाच्या तीन 'अवस्था' असतात. पहिल्या अवस्थेंत रोगी प्रेमांत पडतो, दुसऱ्या अवस्थेंत तो प्रेमाचा ध्यास घेतो आणि तिसऱ्या अवस्थेंत तो हातचा जातो! म्हणजे अनेकांच्या हातून तो एकाच्या हातीं जातो. सीता प्रेमाच्या तिसऱ्या अवस्थेला पोचण्यापूर्वीच आपण संधि साधली पाहिजे हें तात्यांनी ओळखलं. तवा तापला होता. प्रथम पोळी टाकण्याची संधि कुणीं दुसऱ्यानं घ्यायच्या आंत त्यांना घ्यायची होती. पहिल्या तारखेला ती आपण घ्यायची असा त्यांनी बेत केला.

पहिल्या तारखेला संध्याकाळीं सीतेची चप्पल जिन्यांत वाजली तेव्हा ते नेहमी पुढच्या खोलींत बसत ते आतल्या खोलींत जाऊन बसले. जो प्रश्न ते

तिला विचारणार होते त्याला अनुकूल असं एकान्तवासाचं वातावरण त्यांना हवं होतं.

सीता 'हुश्श' करून खुर्चीवर बसली तेव्हा त्यांनी विचारलं,

"काय सीताबाई, दमलांत? म्हाताऱ्या झालांत वाटतं?"

म्हाताऱ्या झालांत वाटतं?' असं म्हणून तात्या हसले; पण त्यांचे डोळे मात्र तिच्यावर खिळून राहिले होते आणि तिला अगदी स्पष्ट सांगत होते, 'सीता, तूं किती तरुण आहेस!'

ती डोळ्याची मूक भाषा समजून सीता लाजली आणि आपली लाज लपविण्यासाठी ती खिडकींतून बाहेर पाहात म्हणाली, "तसं नाही हो. पण तळमजल्यावर वाऱ्याची झुळुक मिळेल तर शपथ! उकडून जीव जायला होतो! अन् घाण तरी किती! अन् गलगा! वरच्या मजल्यावरची एखादी खोली द्या की आम्हाला. मोकळी झाली जागा की विचार करूं म्हणालां होतांत तुम्ही."

"मोकळी आहे एक जागा. पण तुम्हाला एकट्यालांच देऊ आम्ही." असं म्हणून तात्या हसून थोडे थांबले व पुढं ते म्हणाले, "आमची पांचव्या मजल्यावरची जागा आवडेल तुम्हाला?"

सीता क्षणभर पाहातच राहिली. तात्या आपली स्वतःचीच जागा देतों म्हणतात? तात्या म्हणजे चाळीचे जवळजवळ मालक होते. श्रीमंताच्या इस्टे-टीचे मुनीम म्हणजे त्या इस्टेटीचे मालकच असतात. चाळीचं भाडं वसूल करून महिन्याच्या महिन्याला मालकाला पोंचतं करायचं काम तात्यांना करावं लागे. पण त्यांचा इतमाम मात्र मालकासारखा होता. चाळीच्या सर्वांत वरच्या मजल्यावरच्या हवाशीर चार खोल्या तात्या कडे होत्या. चाळींतलीं तरुण पोरं त्यांच्या त्या आरामशीर निवासस्थानावरून त्यांची चेष्टा करायसाठी आताशा ते दिसले की ओरडत, "पर्वतपे अपना डेरा!" तात्या चिडत नसत. तेहि उलट म्हणत, "हां हां, पर्वतपे अपना डेरा!" ही हवाशीर जागा देतों

म्हणतात तात्या ? त्यांचे आभार तरी कसे मानावे असं सीतेच्या मनांत आलं. पण " तुम्हाला एकट्यालाच देऊं आम्ही " या त्याच्या वाक्यानं ती बुचकळ्यांत पडली. त्याच्याकडे किंचित् आश्चर्यानं पाहात विचारलं, " म्हणजे ? "

आणि मग तात्यांनी आपला प्रश्न सीतेला विचारला !

सीतेला त्या रात्रीं झोप आली नाही. एकदां तिला वाटे, आपलं प्रेम डॉक्टर संकेश्वरांवर जडलं असता आपण तात्यांच्या प्रश्नाचा विचारच मुळी कशाला करायचा ? पण पुन्हा तिच्या मनात येई, ' माझं प्रेम कदाचित् डॉ. संकेश्वरांवर जडलं असेल; पण तें पत्करण्यासाठी ते स्वतंत्र आहेत कुठं ? त्यांची बायकामुलं त्यांना आहेतच की ! लवकरच बिल पाठवीन असं गेल्या खेपेला ते म्हणाले होते. म्हणजे दाढ बरी झाल्यावर माझ्या खेपा बंद होणार आणि प्रेमहि संपुष्टात येणार. तेव्हा उगीच डॉक्टरांच्या नादीं लागण्यांत काय अर्थ ?'

त्यापेक्षा तात्या " माझी होशील का ? " विचारताहेत; त्यांना " होय " म्हणावं. नाही तरी आता माझी तिशी उलटली. दुसरं कुणी असा प्रश्न विचारील अशी वाट पाहण्यात अर्थ नाही. तात्या काही वाईट नाहींत. दिसायला थोडे पोक्त आहेत खरं ! पण आपण तरी काय अशा ' षोडशवर्षा ' लागून गेलो आहोत ? स्वभावानं किती गोड आहेत ! " तूं माझी होशील का ? " हा प्रश्न त्यांनी इतक्या गोड आवाजात विचारला की तो ऐकून अंगच शहारलं !

आणि त्या भरांत उरलेली मोड आणि भाड्याची पावती तात्यांच्या खोलींत विसरूनच आपण परत आलों हें तिला आता एकदम आठवलं. सीता स्वतःशींच हसली.

दुसरे दिवशीं संध्याकाळीं पावती आणि मोड परत आणण्याच्या निमित्तानं सीता तात्यांकडे गेली. या वेळीं तात्या ऑफिस बंद करून वर आपल्या ' ब्लॉक ' मधे सापडायचे, हें तिला माहीत होतं. पांच जिने चढतांचढतां तिच्या मनांत आलं—" पर्वतपे अपना डेरा ! " ती स्वतःशींच हसली. रात्रभर विचार करून ठरविलेलं उत्तर ती त्यांना देणार होती. पुढच्या खोलींत तात्या

नव्हतेच. ती हसली आणि आंत गेली. मोड व पावती घेतल्यावर तात्यांसमोर उभं राहून किंचित् चेष्टेच्या आवाजात तिनं विचारलं, " मग ! केव्हापासून येऊं राहायला या जागेंत ? "

तिनं आपल्या प्रश्नाला इतक्या विनोदी भाषेंत होकार दिलेला ऐकून तात्यांना विलक्षण आनंद झाला. आनंदाचा अतिरेक झाला की माणसाला आपण काय करतो त्याचं भान राहात नाही ! तात्या तसेंच बेभान झाले. ते चटकन् सीतेजवळ गेले आणि तिची हनुवटी धरून तिचा लाजरा चेहरा वर करीत म्हणाले,

" दिवाळीपासून ! येणार ? "

पुरुषाचा हात हनुवटीला लागला की तिचा सारा प्रतिकार ढासळून पडावा असा सीतेच्या मनाचा कांही धर्म होता की काय, कुणास ठाऊक ! पण ती एकदम घामाघूम झाली आणि हलकेंच म्हणाली, " येणार ! "

---

# दूरचे डोंगर ! : : ३

तसं पाहिलं तर मालतीच्या संसारांत कसलीच उणीव नव्हती. राह्यला सुंदरसा बंगला, हिंडाफिरायला मोटार, दोन दंगेखोर गोंडस मुलं, आणि माधवरावासारखा धंद्यानं कॉंट्रॅक्टर, पण हाताचा सढळ आणि मनाचा प्रेमळ असा नवरा, एवढं भाग्य तिच्या वाट्याला आलं होतं. परंतु हातचं सोडून पळत्याच्या मागं लागण्याचा मानवी स्वभावाचा एक धर्म आहे. मालतीच्या

ठिकाणीं हा धर्म हिंदु धर्मापेक्षांही अधिक जागृत होता. स्वतःचं त्यामुळं संसारसुख तुच्छ मानून मालती आतां विद्येच्या वैभवाचा हेवा करूं लागली होती.

विद्या तिची बालमैत्रीण. दोघीहि एकाच शाळेंत शिकल्या. दोघींनींहि समाजकार्याच्या; सुधारणेच्या, आणि ज्ञानार्जनाच्या शपथा घेतल्या. पण मधेंच माधवरावानी मालतीला मागणी घातली. मालतीच्या वडिलांना स्थळ पसंत पडल्यामुळे त्यांनीं हें लग्न ठरवलं. आणि वडिलांचा शब्द मोडण्याचं धाडस नसल्यामुळे मालतीनं आपली शपथच मोडली. मालती संसारांत पडली. विद्या विदुषी होण्याच्या मार्गाला लागली.

प्रथम प्रथम मालती आपल्या नव्या संसारांत खूपच रमली. आपला नवरा, आपलं घरदार या पलीकडे बाहेरचं जग तिच्या दृष्टीला दिसत नव्हतं. दुसरा विचार तिच्या मनाला शिवत नव्हता. परंतु प्रथम कलेसाठी कला या ध्येयानं रंगभूमिवर पाऊल टाकणारा हौशी कलावत पुढें जसा धंदेवाईक नट बनतो त्याप्रमाणे सुरवातीला प्रेमासाठी संसारांत राबणारी मालती पुढे पुढे एक हिशोबी, व्यवहारी व थोडीशा आपमतलबी अशी गृहिणी बनत चालली. तिच्या स्वभावांतला हा बदल जसा वाढत चालला तशी आपलं सुख इतरांच्या सुखाशीं ताडून पाहण्याची तिला संवय जडली. विशेषतः, तिची मैत्रीण विद्या विलायतेहून कसलीशी पी. एच-डी. होऊन परत आल्यापासून मालतीच्या मनांत एक नवीनच असमाधान निर्माण झालं. वर्तमानपत्रांना खळबळ उड-विण्यासाठी एखादा नवा विषय हवा असतो कीं काय कोण जाणें. जर्मनीचा पराभव झाला तशी युद्धाच्या बातम्यांची वाफ गेली. सिमला परिषद भरली आणि ओसरलीही. तेव्हां विद्या विलायतेहून विदुषी होऊन परत आली हाच विषय त्यांनीं उचलून धरला. विद्येचे लेख, तिची व्याख्यानं, तिच्या मुलाखती, तिचे संदेश आणि निरनिराळ्या पवित्र्यांतलं तिचे परदेशांतले आणि स्वदेशांतले फोटो छापण्याची एक चुरशीचो चढाओढच जणुं या पत्रकारांमध्यें लागली होती. विद्येचा तो उदोउदो पाहून कोणालाही तिचा हेवा वाटला असता. मालती तर तिच्या बरोबरीची. दोघीहि एकाच शाळेंत शिकल्या. लग्नाची धोंड

मालतीच्या शिक्षणांत पडली नसती तर कदाचित् विद्येचं हें भाग्य तिच्याही वाट्याला आलं नसतं कशावरून ? निदान मालतीची तशी खात्री होती. या संसाराच्या फंदांत आपण पडलो नसतो तर आपल्या कपाळीं "चूल आणि मूल" ही गायत्री मंत्र घोकण्याची पाळी आली नसती. विद्येप्रमाणे आपणही विदुषी झालों असतो, एक विद्वान कर्तृत्ववान स्त्रीरत्न म्हणून आपलं नांव गाजलं असतं, असे घातकी विचार मालती करूं लागली. संसारांत तिचं मन रमेनासं झालं आणि तिचा चिडखोरपणा वाढूं लागला. तिचे आणि माधवरावांचे खरचेवर खटके उडूं लागले. कांही क्षुल्लक निमित्तानं मालतीनं एकदम संतापायचं आणि मग दोघांची तोंडातोंडी व्हायची हा कार्यक्रम अलिकडे अगदीं टराविक चालला होता. इतका कीं मालतीच्या भांडणाचं उकल, गुंतागुंत आणि निरगांठ, हें टेक्निक माधवरावांना अगदीं पाठ झालं होतं. आपलं सारं आयुष्य फुकट गेल असे प्रस्तावना करून मालती म्हणे, "संसारांत पडून मी काय मिळवलं कुणाला टाऊक ! चुकलच ते. त्यावेळींच मी विद्येचं ऐकलं असतं आणि पुढं शिकलें असतें तर असलं सैपाकणीच जिणं माझ्या वाट्याला कशाला आलं असतं ? तुम्हाला आणि तुमच्या मुलांना तिन्ही त्रिकाळ उकडून घालण्यांतच माझं आयुष्य वाया जायचं होतं ना ?"

मालती असं त्राग्यानं बडबडूं लागली, की माधवरावांना मनापासून हंसूं येई आणि ते म्हणत, "मालती, जें शोभेल तें बोलाव माणसान. अग त्या विद्येसारखी तू विलायतेला गेली असतीस तरी व्हायच तेंच झालं असतं. पी. एचडी. होण्याऐवजी कुणाची तरी बायकोच झाली असतीस, समजलीस ? पी. एचडी. म्हणजे काय भेंड्याची भाजी वाटते होय तुला ? अग तिथें पाहिजे जातिच."

यावर मालती ओरडून उत्तर देई, "पुरे पुरे पुरे. किती अपमान कराल माझा ?"

यानंतर हुंदके, अबोला, समजूत आणि अखेर समेट अशा क्रमानं या पतिपत्नीचं संसारचक्र फिरत होतं. स्वतः माधवराव तर या कलहाला विटले

होते. इतके कीं जिनं त्याच्या सुखी संसारात मिटांचा खडा अप्रत्यक्षपणे कां होईना टाकला होता त्या विदुषी विद्येचं नाव देखील कोणी उच्चारलेलं त्यांना खपत नसे.

एके दिवशीं ते कामावरून परत आले तेव्हां मालती लगबगीनं त्यांना सामोरी गेली. अलिकडे कितीतरी दिवसात तिनं असं हंसतमुखानं त्याचं स्वागत केलं नव्हतं. फार दिवसांनीं तिला खुशीत आलेली पाहून माधवरावांचा कामाचा सारा शीण नाहीसा झाला आणि कपडे उतरण्यापूर्वीच तिला जवळ घेऊन त्यांनी विचारलं.

" का ? आज राणीसाहेब खुशींत कां एवढ्या."

" ओळखा पाहूं ? " मालतीनं पैज लावली.

" बाबाचं पत्र आलं असेलच भेटायला येतो म्हणून " माधवरावांनी तर्क केला.

" हरलात. पुन्हां ओळखा " मालती म्हणाली.

" बिंब्याचा दांत पडला ? "

" अं हं "

" सैपाकीण मिळाली ? "

" अं हं. "

" तुझ्या क्लबचा ग्रूफ फोटो 'स्त्री'त छापून आला ? "

" अं हं. "

" मग काय बोवा ? हरलो साग बघूं. "

" ओळखाना. आपल्या विद्येसंबंधी आहे. ओळखा बघूं.

विद्येसंबंधी ? आली कां ही बाई पुन्हा रंगांत भंग करायला ? विद्येचं नांव निघालं की भांडणाला सुरवात व्हायची हा माधवरावांचा अनुभव अगदी जुना होता. त्यानी कपाळाला आठ्या घातल्या आणि विचारलं, " मेली कीं काय ही तुझी विद्या ? "

त्यांचा तो प्रश्न ऐकून मालतीनं त्यांचे हात दूर केले आणि त्यांच्या पासून दूर होत किंचित रागान ती म्हणाली, " असं काय अभद्र बोलता हो माझ्या मैत्रिणीबद्दल ? "

" अग रागावूं नकोस अशी. बरं काय केलन् काय तुझ्या या विद्येनं ? लग्न बिग्न ? "

" लग्न ? लग्न करून संसाराच्या अंधारकोठडींत पडायला विद्या काय वेडी आहे ? " मालती उपरोधानं म्हणाली.

युद्धाचा वणवा पेटण्यापूर्वीच आपण माघार घेतलेली बरी असा हिशोब करून समेटाच्या आवाजात माधवराव म्हणाले, " मग आतां तूंच सांग काय तें. "

" हरलात ना ? आनंदाची बातमी अशी कीं विद्या इथें येणार आहे. "

" इथें म्हणजे कुठें ? आपल्या घरी ? " माधवरावांनी घाबरून प्रश्न केला.

" हो हो. आपल्या घरीं. एवढं वांकडं नको तोंड करायला. विद्येसारखी विद्वान पाहुणी आपल्या घरीं येणार हें भाग्य समजलं पाहिजे. ",

" अग पण काम काय आहे तिचं इथें ? " माधवरावांनीं विचारलं.

" आमच्या महिला मंडळाचा वर्षदिन आम्हीं तिच्या अध्यक्षतेखाली साजरा करणार आहो. ' स्त्रियानों, तुम्ही चालला आहांत कुठें ? या विषयावर तिचं व्याख्यानही ठरविलं आहे आम्ही "

"बापरे! म्हणजे चांगलाच गाजणार तुमचा समारंभ" माधवराव म्हणाले.

"पैसा खर्च केला आहे आम्ही. जातायेताचं फर्स्ट क्लासचं भाडं द्यायचं कबूल केलं आहे. वाटेल तं झालं तरी विद्येला आणायची आणि इतर फडतुस वनिता समाज, मध्यवर्ती मंडळ, वगैरे सटरफटरांची एकदा कायमची खोड मोडायची या ईर्षेलाच आम्ही पेटलों आहे."

"पण हें सारं लचांड आपल्या घरीं का?" माधवरावांनीं विचारलं.

"मग? तिला काय एखाद्या हॉटेलात उतरायला सांगायचं? ती माझी बालमैत्रीण आहे. तिच्यासाठी मी तुमची माडीवरची खोली रिकामी करणार आहे. येत्या शनिवारीं ती येणार. तोपर्यंत चार खुर्च्या, एक ड्रेसिंग टेबल, कॉट, वगैरे सामान मला आणून द्या. आपल्या घरांत तिला कांही कमी वाटतां कामा नये."

मालती बोलत होती आणि माधवराव आ वासून ऐकत होते. या बाबतीत मालती त्यांचा शब्दही ऐकायला तयार नव्हती हें त्याना उघडच दिसत होत. मालती जाता जाता त्यांना बजावून गेली, "आणि हे पहा. शनिवारी सकाळीं –म्हणजे–पहांटे सहा-पंचावनच्या गाडीनं विद्या येणार आहे. तेव्हां मोटर घेऊन स्टेशनवर तुम्ही स्वतः गेलं पाहिजे."

कानाजवळ मशीनगन उडवल्यासारखा तो कर्कश आवाज ऐकतांच माधवराव जागे झाले. परंतु शरीरावर आणि मनावर पसरलेली झोपेची धुंदी त्यांना झटकून टाकतां येईना. त्यांनी प्रयासानं एक डोळा उघडला. अंगावरची उबदार दुलई खालीं सरकवली आणि मग हळूहळू त्यांच्या लक्षांत आलं, कीं आज शनिवार. आज सहा-पंचावनच्या गाडीनं विद्या येणार. या विचारानं मात्र त्यांची झोप पुरतीच उडाली. तं झटकन् उठून बसले. त्यांनी टेबलावरच्या घड्याळाचा गजर बंद केला, आणि विद्येला मनांतल्या मनांत एक संस्कृति-

विध्वंसक शिवी हांसडली. आज शनिवार. सुटीचा दिवस. पण या विद्येच्या पायीं पहांटे उठून स्टेशनवर धांवण्याची शिक्षा त्यांच्या वांट्याला आली होती. त्यांनी फर्रदिशी कपाट उघडलं आणि ते कपडे धुंडाळू लागले. प्रथम त्यांच्या मनांत आलं जावं झालं धोतरांतच. शिकलेली बाई आणि ती सुद्धा समाज-कार्यांत पडलेली. मग काय उजेडच! परंतु दुसऱ्याच क्षणी त्यांच्या मनांत आलं आपण नीटनेटका पोषाख करून जावं हेंच बरं. आपण केलेला तर्क चुकला आणि विद्या सुंदर असली तर आपला पोषाख कांहीं वाया जाणार नाहीं. एक उंचनिंच देखणा पुरुष या दृष्टीनं माधवरावाच्या मनांत हा विचार यावा हें सहाजिक होतं. परंतु मालतीचा नवरा या दृष्टीनं हा सहाजिक विचार देखील अपवित्र होता. नवरेपणा आणि पुरुषत्व या दोन गोष्टींचं, भांडवलशाही आणि समाजवाद याप्रमाणेच सख्य आहे कीं काय पुरुषच जाणे! माधवरावांनीं आपला आवडता काश्मिरी वुलनचा सूट काढला. बाथरूममधें जाऊन त्यांनी दाढी केली. सर्व जामानिमा आटोपून तें खालीं आले तीं सहा-दहा झाले होते. त्यांचा तो विशेष थाटामाटाचा पोषाख पाहून मालतीनं त्यांच्यावर आपले डोळे रोखले. आणि ती लगबगीनं घरांत निघून गेली. तिनं त्यांना चहा देखील विचारला नाहीं. माधवरावांच्या मनांत आलं. स्त्री जात किती विचित्र पहा. हिच्याच आग्रहानं हिच्याच मैत्रिणीला आणायसाठी मी जरा नीटनेटका पोषाख केला तर कशी रोखून पाहूं लागली! परंतु आपलं चुकलं तर नाहीं अशी एक शंका त्यांच्या मनाला स्पर्श करून गेली. खाणाऱ्याचा घसा खवखवतो. पण कांही न खातांच आपला घसा कां खवखवूं लागावा ते त्यांना कळेना. त्यांनी मोटार गॅरेज बाहेर काढली आणि ती सुरू करणार इतक्यांत तारवाला शिपाई त्यांच्या समोरच सायकलवरून उतरला. तार? ह्या वेळेला तार कुणाची बुवा? माधवराव आसिकपणंच मोटारींतून खाली उतरले.

विद्येनं धाडलेल्या त्या तारेचा त्या दोघांनाही अर्थच कळेना. "तुम्ही ज्या महिला मंडळासाठी येणार आहां तें मंडळ प्रातिनिधिक नाही, अशी तार आतांच मिळाली. येण्याचे रहित केले आहे. माफ करा." अशा मजकुराची ती तार वाचून माधवराव बुचकळ्यांत पडले, पण मालती मात्र एकदम भडकली.

तारेचा चोळामोळा करून ती म्हणाली, "हें कारस्थान कुणाचं तें मी ओळखलं. त्या लालबावट्यानंच हा घात केला माझा. तिनंच अशी तार धाडली असली पाहिजे विद्याला."

"कोण ग हा लालबावटा ?"

"अहो ती हाडकुळी बाई नाही का— कॉमरेड—चपला—म्हैसकर— तिचा आहे हा सारा चावटपणा. आम्ही विद्येला आणणार हे कळल्यापासून कशी लाहीसारखी तडफडत होती."

"पण या बाईचा संबंध काय ?" माधवरावांनीं विचारलं.

"तिचंही आहे ना एक महिला मंडळ. कोणाही बाईनं उठावं आणि चार बायका जमवून मंडळ स्थापावं. पण आतां या साऱ्यांच्या नाकावर टिच्चून मी विद्येला आणणार आणि माझं मंडळ–फक्त माझंच मंडळ कसं प्रातिनिधिक ठरतं तें या विघ्नसंतोषी बायकांना दाखविणार–" मालती ठांसून म्हणाली.

"तूं दाखवशील ग. पण विद्या आली पाहिजे." माधवरावांनी शंका काढली.

"असल्या शंकाकुशंका काढीत बसू नका. तुम्ही विद्येला माझ्या नांवानं तार करा कीं 'विघ्नसंतोषी लोकानीं तुमचा गैरसमज केला आहे त्यावर विश्वास ठेवूं नका. पुढच्या गाडीनं ताबडतोब निघून या' आणि हं पहा. ही दुसरी गाडी संध्याकाळीं पांच पंचेचाळीसला येते. तेव्हां तुम्ही स्टेशनवर जाऊन विद्येला घेऊन या."

इतकं बजावून मालती ताडताड स्वैंपाकघरात निघून गेली. चहाची मेजवानीची तयारी वाया गेली म्हणून ती रागावली होतीच. परंतु तिच्या वाईटावर असलेल्या बायकांनी जें हें कारस्थान रचलं त्यानं तिचा राग अधिकच भडकला होता !

" पुंडलीक वरदे हारि विठ्ठल " अशा गजरात शेंकडो खेडुत पेव फुटाव तसे पताकांसह गाडीतून खाली उतरले. त्या गर्दीत माधवराव चांगलेच घुसमटले. एवढ्या अज्ञानाच्या लोंढ्यांत आतां विद्येचा पत्ता कसा लागणार असा विचारही त्यांच्या मनांत आला. ते कसेबसे वाट काढीत सेकन्ड क्लासच्या डब्यापर्यंत गेले आणि पाहतात तो दोन्ही हातात दोन सूटकेसेस धरून एक तरूण स्त्री उभी होती. एखाद्या पाश्चात्य स्त्रीसारखी तिच्या उभी रहाण्यांत निर्भयपणाची ऐट होती. हीच विद्या यांत शंका नाहीं, असं मनाशीं ठरवीत माधवराव पुढें झाले इतक्यात ती स्त्री खाली उतरली. आणि तिनं त्यांच्याकडे पाहात प्रश्न केला, " आपण मला उतरवून घ्यायला आला आहांत काय? "

" हो ना. मी माधवराव गोडसे, आमची मालती तुमची मैत्रीण" चला ना घरीं—वाट पहात असेल ती."

" कोण म्हणालांत? विद्येनं भुवया चढवून विचारलं. तो प्रश्न ऐकून माधवराव चांगलेच गारठले. पण विदुषी बायकाही कदाचित् तऱ्हेवाईक असाव्यात अशा विचारानं ते पुन्हां म्हणाले, " मालतीबाई गोडसे. मंडळाच्या सेक्रेटरी."

" हां हां त्यांनीच पुढां तार धाडली होती खरी. बरं. पण मला आतां कुणाच्या घरीं जायला वेळ नाहीं. आताच पावणेसहा वाजले. सव्वासाताच्या गाडीनं मला परत निघालचं पाहिजे. " विद्या घाईनं चालूं देखील लागली.

" पण—" तिला कोणत्या शब्दांत आग्रह करावा तेंच माधवरावांना कळेना. विद्या सरळ स्टेशनमास्तरच्या ऑफिसांत गेली आणि 'आपली जागा रिझर्व करून आली. स्टेशनबाहेर पडल्यावर मोटा धीर करून माधवरावांनां विचारलं,

" पण आपण रात्रीं मुक्काम केला पाहिजे इथं. "

गाडींत बसतां बसतां, घड्याळांत नजर टाकून विद्या म्हणाली, " छे, छे उद्यां सकाळीं मला एका उद्‌घाटन समारंभाला हजर राहिलंच पाहिजे. पुढं दुपारी वुइमेन्स कालेजात माझं व्याख्यान आहे. नतर आमच्या शिक्षण संघाची बैठक भरेल तिलाही मी हजर राहिलच पाहिजे. आणि संध्याकाळीं तर माझी दोन व्याख्यानं ठरली आहेत. मला थांबणं अशक्य आहे."

आणि मग किंचित् अधिरपणें आणि रागानं ती म्हणाली, " मला लवकर गेलं पाहिजे लेक्चर हॉलकडे. घाई करा."

यानंतर माधवराव फारसे बोलले नाहीत. एक सुधारलेल्या सुशिक्षित स्त्रीशीं बोलायची संधी नीट साधावी म्हणून त्यांनी केवढी तयारी केलीं होती. अगदीं परवांच्या सिमला परिषदेपर्यंत राजकारण त्यांनीं चाळून ठेवलं होतं, कॅटलॉगमधून नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी मराठी कादंबऱ्यांचीं नांवं घोकलीं होतीं, विद्येचा आवडता विषय समाजशास्त्र त्यांची तोंडओळख-अर्थात् मुखपृष्ठापुरती-करून घेतली होती. वाघाच्या शिकारीची तयारी त्यांनी केली होती. मात्र न जाणो, वाघाऐवजी कवडा समोर आला तर त्याचीही तयारी असावी म्हणून त्यांनीं एकदोन नाखवागीतें, चालू सिनेमाच्या जाहिराती व पांच-सहा हास्यकथा लक्षांत ठेवल्या होत्या.

परंतु ही सारी तयारी वाया गेली होती. सुशिक्षित आणि ती देखील स्त्री भेटल्याचा कोणताच आनंद त्यांना घेतां आला नव्हता. किंबहुना सुशिक्षित स्त्री या शब्दाची व्याख्याच काय करावी हा प्रश्न त्यांना पडला होता. डिक्शनरीला पुलिंगी म्हणता येत नाहीं म्हणूनच केवळ स्त्रीलिंगी म्हणणं भाग आहे. तीच कथा या सुशिक्षित स्त्रियांची!

विद्येला लेक्चरहालमध्यें सोडून माधवराव घरीं परतले ते अशा अपेक्षा-भंगाचे विचार करीतच. मालती आणि इतर महिलामंडळी दारांतच विद्येच्या स्वागतासाठी उभी होती. परंतु माधवराव एकटेच खालीं उतरलेले पाहून

मालती घाबरली. ती पुढें झाली आणि तिनं त्यांना हलक्या आवाजांत विचारलं, " म्हणजे ?–विद्या आली नाहीं ? "

" आली आहे ना. ती सरळ व्याख्यानाच्या जागीं गेली. तुम्ही बायकाही लवकर जा. सव्वासहाला ती व्याख्यान सुरु करणार आहे.–झटपट आवरा बर का.–विद्येशीं गांठ आहे. "

मालती व्याख्यानाच्या जागीं गेली तेव्हां सव्वासहाला पांच मिनिट अवकाश होता. हॉलमधं बायका बऱ्याच जमल्या होत्या. पिंजऱ्यातल्या वाघाला पहात रहावं त्याप्रमाणे खुर्चीवर बसून कागदावर कांहीतरी लिहीत असलेल्या विद्येकडे त्या बायका टकमका पहात होत्या. विद्येला पाहतांच मालती एकदम आनंदली. जं ध्येय साधण्याची आपली इच्छा केवळ लग्नाची बेडी पायात पडल्यामुळे धुळीला मिळाली तें ध्येयच विद्येच्या रुपानं आपल्यासमोर उभं आहे असं तिला वाटलं. शिवाय विद्या मोठी विदुषी असली तरी आपली परकरी मैत्रीण आहे ही गोष्ट या शेकडो बायकांना दाखविण्याची संधि मालती कशी दवडेल ? मालती हंसत हंसत विद्येजवळ गेली आणि तिच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली. " काय विद्ये—"

पण विद्या चटकन् बाजूला झाली आणि अनोळखी माणसानं सलगी करतांच दाखवावा तसा तिरस्कार दाखवून म्हणाली, " आपण कोण ? "

" मला ओळखलं नाहींत तुम्ही ? " मालती म्हणाली. राग अपमान, दुःख, काय आवरावं तेंच तिला कळेनासं झाल होतं. परंतु वेळ मारुन नेलीच पाहिजे असा विचार करून ती म्हणाली.

" मी मालती गोडसे, म्हणजे पूर्वीची अंबू देसाई. "

" आणि आतांच्या महिला मंडळाच्या सेक्रेटरी, होय ना ? मग तर सभा सुरू करूं या. अहवाल वाचन वगैरे सर्व गोष्टी पांच दहा मिनिटांत आटोपून

घ्या. मला अर्धा तास वेळ आहे. नंतर साताच्या गाडीनं गेलंच पाहिजे—चला आटपा."

मालती कांही बोलणार तोंच विद्या व्यासपीठावर चढली देखील. सेक्रेटरी या नात्यानं मालती प्रास्ताविक भाषण करण्यासाठी उभी राहिली. परंतु पंधरा दिवस पाठ केलेल्या त्या वीस पानी भाषणापैकीं फार तर चारपांचच वाक्यं बोलून तिला आपलं भाषण आटोपतं घ्यावं लागलं. इतर मंडळांची खरड-पट्टी काढण्याची व आपल्या स्तुतीचा डांगोरा पिटण्याची ही सार्वजनिक सुसंधि तिला दवडावी लागली आणि अहवालांतसुद्धां मंडळाच्या स्थापनेचं साल आणि हळदीकुंकू समारंभाचे आंकडे या पलिकडे ती कांही सांगूं शकली नाहीं.

साडेसहाच्या ठोक्याला विद्या व्याख्यान देण्यासाठी उभी राहिली. अर्धा तासपर्यंत ती खाडखाड बोलत होती. तिच्या स्पष्ट, सुसंस्कृत वाणीचा आणि उच्च विचारसरणीचा ओघ समोर आ वासून बसलेल्या शेंकडों बायकांच्या डोक्यावरून अस्खलित चालला होता. या अर्धा तासांत सबंध स्त्रीजीवनाचा अगदीं 'व्होल्गा ते गंगा' आढावा काढून राजकीय, समाजिक, आणि वैयक्तिक क्षेत्रांत देखील हिंदी बायका दुबळ्या कां याचं अत्यंत वास्तव असं विवेचन तिनं केलं आणि अखेर समारोप करतांना तिनं बजावलं.

"तुम्हां स्त्रियांना आतां स्वतःचा उद्धार स्वतःच करून घेतला पाहिजे. बौद्धिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या तुम्हीं जोंपर्यंत अज्ञानी आहां, परावलंबी आहां तोंपर्यंत दुसरी कोणतीही शक्ति तुमचं रक्षण करूं शकणार नाहीं, समाजाचा, कायद्याचा नीतीचा आधार घेऊनही तुमचा बचाव होणार नाहीं. स्त्रियांचं दुःख नाहीसें करण्याची शक्ति समाजाच्या अंगी नाहीं. कायद्याच्या हाती नाहीं. देव, धर्म, पावित्र्य पुण्याई यांपैकी एकही गोष्ट तुमचं दुःख घालवूं शकत नाही. जग बदलत चाललं आहे. पण स्त्रिया अजून जुन्या काळांतच आहेत. आणि म्हणूनच अंधारांत आहेत. देव, धर्म, नीति अनीति, पाप पुण्य, पतिपत्नी, या गोष्टींना नवे अर्थ आले आहेत. ते अर्थ समजून घ्या. आंधळ्या श्रद्धेनं स्वतःचा घात करून घेऊं नका. आपली ज्ञानलालसा वाढावी, बौद्धिक उन्नति

व्हावी म्हणून जगांतील प्रत्येक सामाजिक आणि राजकीय आंदोलनाचा, प्रगतीचा, क्रांतीचा अभ्यास करा. त्याविषयीं जिज्ञासा बाळगा. स्वावलंबन ही आपल्या उद्धाराची पहिली पायरी आहे, हें लक्षांत घेऊन कोणत्याना कोणत्या उद्योगांत किंवा व्यवसायांत प्राविण्य मिळवा. बौद्धिक आणि आर्थिकदृष्ट्या जोंपर्यंत तुम्ही दुबळ्या आहांत तोंपर्यंत तुम्ही अबलाच राहणार. लग्न करून स्वतःच नाव बदलून घेणं सोपं आहे परन्तु स्वतःच्या पराक्रमानं अबलेची सबला होण्याची आणि स्वतंत्र नांव मिळविण्याची महत्वाकांक्षा तुमच्यांपैकी प्रत्येकीनं बाळगली पाहिजे."

प्रवासाच्या आणि व्याख्यानाच्या दगदगीमुळे विद्या थकली होती. मोटर स्टेशनच्या रस्याला लागताच तिनं मागे गादीवर मान टाकली आणि डोळे मिटून घेतले. शेजारींच बसलेल्या मालतीशी आणि माधवरावांशी एकदोन औपचारिक शब्द बोलणही तिच्या जिवावर आल होतं. उद्या सकाळीं पुन्हां व्याख्यानं, चर्चा, ठराव, वगैरे कार्यक्रमाच्या चक्रांत तिचा सारा दिवस भरडून निघायचा होता. परन्तु आतापासूनच तिचं मन त्या विचाराच्या फेऱ्यांत सापडलं होतं.

मोटारीची गती थांबलेली लक्षांत येतांच तिनं डोळे उघडले. रेल्वेचं फाटक बद होतं आणि तें उघडेपर्यंत वाट पाहाणं भाग होतं. विद्येनं घड्याळांत पाहिल तों गाडी सुटायला पांच मिनिटच अवकाश होता. ती माधवरावांना म्हणाली,

"दुसरा रस्ता नाहीं का? फाटक उघडण्याची वाट पहात बसलों तर गाडी चुकेल."

"दुसरा रस्ता आहे. पण लांबचा आहे." माधवराव म्हणाले.

"हा कोणता रस्ता काढला तुम्ही?" मालतीनं विचारलं.

"पहा तर खरा." असं म्हणत माधवरावांनीं मोटर वळवून त्या दुसऱ्या रस्त्यानं घेतली.

विद्येच्या मनांत आलं. रस्ता पाहण्यासारखा आहे खरा. हा रस्ता स्टेशनकडे जातो हे खरं देखील वाटणार नाहीं. स्वर्गाची वाट देखील इतकी सुंदर नसेल. प्रेमिकानीं एकमेकांच्या हातांत हाताचीं बोटं गुंतवावीं त्याप्रमाणे रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या वृक्षाच्या फांद्या एकमेकांत गुंतलेल्या पाहतांना तिला किती आनंद वाटला.

परंतु तिचा हा आनंद फार वेळ टिकला नाहीं. स्टेशनच्या आवारांत मोटार शिरते न शिरते इतक्यांत स्टेशनांतून गाडी निघाली सुद्धां. अखेर विद्येची गाडी चुकलीच !

विद्या स्वतःशीं चडफडत कांही वेळ घोटाळली, पण मग लगेच "गाडी चुकली. उद्यांचे कार्यक्रम रद्द करा." अशा तारा करण्यासाठी ती स्टेशनवरच्या तार ऑफिसांत गेली तेव्हां मालतीनं माधवरावांना विचारलं.

"तुम्ही घोटाळा केलात सगळा. जाणून बुजून लांबच्या रस्त्यानं मोटार घेतलीत आणि गाडी चुकवलीत. काय साधलंत ?"

"तुझ्या मनांत जें साधायचं होतं तेच साधलं. विद्या पाहुणी यायची म्हणून चहा फराळ मेजवानीचा बेत केलास. तिला अप-टू-डेट खोली पाहिजे म्हणून तुझ्या आग्रहाखातर पडेल तें भाडं भरून मी फर्निचर आणवलं. तें काय उगीच ? शिवाय आणखी काय साधलं तें मग सांगेन."

विद्या परत आली आणि मोठ्यानं हंसून म्हणाली, "सुटलें एकदाची."

"म्हणजे–? स्पेशल ट्रेन सोडणार कीं काय ?" माधवरावांनी विचारलं. पांच दहा मिनिटांपूर्वीच जी विद्या गाडी साधावी म्हणून अधीर झाली होती तीच आतां गाडी चुकल्याचा आनंद मानीत असलेली पाहून मालतीलाही मोठं नवल वाटलं.

माधवरावांचा तो मिस्किल प्रश्न ऐकून विद्या आणखीच हंसूं लागली. म्हणाली, "स्पेशल ट्रेन ? अहो ही गाडी चुकली याचाच मला आनंद

झाला आहे. चला आतां घरी चला. मालती, मघाशी राहिलेला चहा फराळ मी केव्हां वसूल करीन असं झालं आहे मला."

आतापर्यंत उदास असलेली... मालती विद्येचे ते शब्द ऐकून एकदम खुलली. कुणालाहि खाऊपिऊ घालण्याची मालतीला मोठी हौस. घरी पोचल्यावर तिनं विद्येसाठी फक्कड चहा बनविला आणि आग्रहानं तिला फराळाचे जिन्नस खाऊं घातले. माधवरावांनी चहा घेतां घेतां समाजवादाचा विषय काढला तेव्हा विद्या म्हणाली, "माधवराव चहा कसा सुंदर झाला आहे. अशा वेळीं असले कंटाळवाणे विषय नकोत. ए मालती ही बदामाची केक कशी ग साधली तुला? सांग तरी."

"अग त्यात काय साधायचं —"

अशी सुरवात करून मालतीनं, बदामाच्या केकचीच काय, परन्तु अनेक पदार्थांची पाकक्रिया तिला समजावून सांगितली. विद्येचं आणि तिचं संभाषण आतां चांगलंच रंगलं. स्वछंदी फुलपांखरांनीं या फुलावरून त्या फुलावर लीलेनं उड्या माराव्या त्याप्रमाणे त्या दोघां मैत्रीणींची आनंदलेली मनं अनेक साध्या घरगुती विषयाचा आस्वाद घेत होतीं. कितीतरी विषय त्यांच्या बोलण्यांत येऊन गेले. स्वैपाकावरून सुइणीवर जेव्हां संभाषणाची मजल पोचली तेव्हां माधवराव तेथून उठले. मालती बिंबाच्या तोंडांत शिऱ्याचा घास भरवीत, त्या गोष्टी ऐकत होती.

विद्येच्या त्यावेळच्या त्या मुद्रेकडे पाहून माधवरावांच्या मनांत आलं, तीन तासांपूर्वी गाडींतून उतरलेली विदुषी विद्या ती हीच काय? बरोबर हाच विचार मालतीच्याही मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

रात्रीं जेवणं खाणं झाल्यावर तीं तिघजणं बोलत बसलीं तेव्हां विद्या एकदम गंभीर होऊन मालतीला म्हणाली.

"मालती, तूं भाग्यवान आहेस. तुझी मुलं, तुझे माधवराव आणि तुझा संसार या तुझ्या सुखाचा कुणालाही हेवा वाटेल."

" छे, छे, भलतंच काय बोलतां विद्याबाई. मालती तर आपल्या संसारावर नाराज आहे. ती नेहमीं चरफडते कीं आपलं लग्न झालं नसतं तर आपणही पी. एच. डी. होऊन व्याख्यानं दिलीं असतीं. मी तिच्या करीअरचं वाटोळं केलं असंही म्हणते ती. "

" असं म्हणते मालती ? काय वेडी आहे !" विद्या तिच्या गालावर चापट मारून पुढे म्हणाली, " ए मालती, कांही चमत्कारानं माझं आयुष्य तुला आणि तुझं मला, अशी अदलाबदल करता आली तर ती करायला मी तावडतोब तयार आहे. खरं म्हणशील तर मला विद्वत्तेचा व्याप आणि प्रसिद्धी हें नेहमींच सुखाचं वाटतं असं नाहीं. व्याख्यानं, चर्चा वगैरे कार्यक्रमाच्या चक्रांत जोपर्यंत मन फिरत असतं तोपर्यंत इतर कसलाही विचार मनात येत नाहीं. परंतु आजच्यासारखी सक्तीची सुटी मिळाली कीं फार एकटं एकटं वाटतं. आणि आतां तुझा गोड संसार पाहून तर फार वाटतं मला, कीं माझी गाडी चुकलीच-"

भावनेच्या आहारी चाललेल्या विद्येला कुठल्यातरी बौद्धिक विषयांत गुंतवावी या हेतूनं माधवरावांनी तिला विचारलं,

" काय हो विद्याबाई, चर्चिलचं प्रधानमंडळ गडगडलं त्याचा हिंदुस्थानच्या राजकारणावर काय परिणाम होईल असें वाटतं तुम्हाला ?"

गप्प बसायला काय घ्याल ? अशा अर्थानं मालतीनं माधवरावांकडं रोखून पाहिलं. लाखो प्रेक्षकांना हंसविणारा कोणतासा विनोदी नट स्वतःच्या अंतर्यामी मात्र दुःखांत चूर असतो ही गोष्ट तिनं ऐकली होती. परंतु जिच्या विद्वत्तेचा, गौरवाचा आपण हेवा केला आणि आपलं स्वतःचं सुख तुच्छ मानलं त्या विद्येच्या अंतःकरणांत अशातऱ्हेचं असमाधान असावं ही शंका येतांच ती अस्वस्थ झाली होती आणि विद्येचं हृद्गत समजून घेण्यासाठी आधीरही झाली होती. तिनं विद्येला विचारलं,

" गाडी चुकली ? म्हणजे काय विद्ये ?"

विद्या म्हणाली, " नांव आणि कीर्ति मिळविण्यांत जसा आनंद आहे तसाच सुखाच्या संसारांतही आहे. आपल्यापैकीं बहुतेकांच्या आयुष्यांची गाडी कुठल्यातरी एका मार्गानं जाते, आणि मग जें आपल्याला मिळालं नाहीं तें दुसरीला मिळालेलं पाहूनःआपल्याला वाटतं, अरे, तें मिळायला हवं होतं. ज्यांना दोन्ही गोष्टी साधल्या अशा भाग्यवान स्त्रिया फार विरळा. माझ्या बोलण्याचा अर्थ असा कीं, तुला जसा माझ्याबद्दल तसाच मला तुझ्याबद्दल हेवा वाटण्यासारखा आहे. तुला जे मिळालं आहे तें सुद्धां फार मोलाचं आहे. माझ्याबद्दल तुला हेवा वाटला तरी तो क्षणापुरताच असावा. त्यामुळे तुझ्या वाट्याला आलेलं सुख तुला दिसेनासं होऊं नये."

सकाळीं विद्या निघून गेली. परंतु तिचं हें बोलणं मात्र मालतीच्या अंतःकरणांत कायमचं राहिलं. नंतरच्या दिवसांत मालती आपल्या संसारांत रंगलेली पाहून माधवराव मनाशी म्हणत देखील, " विद्येची गाडी मी चुकवली, परंतु त्यामुळे माझ्या संसाराची गाडी रुळावर आली— !"

---

# माझा बजरंग ! ४

एखाद्या माणसाचा लागावा ना, तसा मला माझ्या लहानग्या खेडेगांवाचा लळा लागून राहिला आहे. पुण्या-मुंबईच्या माझ्या मैत्रिणी मला नेहमीं म्हणतात कीं, त्या खेडेगांवांत तुझं मन रमतं तरी कसं? रमतं खरं! इथें शहरांत मला कांही कमी नाहीं. वेळ थोडा आणि करमणुकी फार, असाच माझा कार्यक्रम आहे. परंतु अगदीं ऐषआरामाच्या क्षणींसुद्धां माझ्या मनाला

एकदम विषाद वाटतो. वाटतं कीं, मी परक्या ठिकाणीं आहे. माझ्या गांवाची मला तीव्रपणें आठवण होते. "टर्फ क्लब" च्या व्हऱ्हांड्यांत, त्या शांत धुंद वातावरणांतसुद्धां माझा सरबताचा ग्लास तसाच हातीं राहतो आणि क्षितिजरेषेवरच्या अस्पष्ट नागमोडी डोंगरांच्या ओळीवर माझी नजर खिळून राहते. अशाच एका डोंगरमाथ्यावर बसलेल्या माझ्या लहानग्या गांवाचं चित्र अगदीं माझ्या दृष्टीला स्पष्ट दिसूं लागतं.

नागमोडी वळणं घेत घेत एक अरुंद पाऊलवाट डोंगरावर गेली आहे. या पाऊलवाटेनं अडखळत, धापा टाकीत मी कितीदा तरी डोंगर चढून गेलें आहे. गावाच्या वेशीपाशीं आल्यावर लक्ष्मीच्या देवळांतील परिचित आणि म्हणूनच मंजुळ वाटणारा घंटानाद कानीं पडला, वेशीवरील वडाच्या पारावर बागडणारीं करडीं-पांढरीं कोकरं पाहिलीं, डरकाळ्या फोडीत पाणोठ्यावरून परतणाऱ्या बैलाच्या जोड्या आणि त्यामागून रमतगमत जाणाऱ्या रयतांचा, "ताई, केव्हां आला?" हा स्वागताचा शब्द ऐकला, कीं माझे श्रम नाहींसे झाल्यासारखे मला वाटतात.

खाचखळग्यांनीं भरलेले रस्ते, मोडकळीस आलेली चंद्रमौळी झोपडीवजा घरं, आणि त्यांतच कोंड्याचा मांडा करून सुखानं संसार करणारे माझे गांव-करी, हें सर्व कांही मला प्रिय आहे. आणि म्हणून मी माझ्या गांवीं आलें कीं इतर सर्व गोष्टींचा मला विसर पडतो. कांही दिवस तरी शिष्टाचाराची बंधनं तोडून मनमोकळं वागण्याची हौस मी माझ्या मुक्कामांत पुरी करून घेतें.

अशाच एका मुक्कामांत मला माझा आवडता 'बजरंग' मिळाला. ती हकीगत मोठी मनोरंजक आहे.

उन्हं कमी झालीं कीं मग मला घरांत चैन पडत नाहीं. माझ्या खिड-कींतून बाहेर पाहिलं कीं दऱ्याखोऱ्यांवर मावळत्या उन्हाचा छायाप्रकाशाचा मोठा गमतीदार खेळ चाललेला दिसतो. शहरगांवच्या डांबरी रस्त्यांच्या वेड्यातून मुक्त झालेल्या माझ्या पायांना ती दऱ्याखोऱ्यांची हिरवळ तुडविण्याचा

अनिवार मोह होतो आणि वारा पिऊन वासरू मोकाट सुटावं त्याप्रमाणे माझ्या हिंडण्याला मर्यादा रहात नाहीं. अस्वलखोऱ्यांत डोंगराच्या उतरणीवर उंच उंच वाळूच्या घळणी आहेत.. तेथे मनमुराद घसरगुंडीचा खेळ खेळावा, दूरवर खालीं घाटांतल्या नागमोडी सडकेवरून टूरिंग गाडी जाऊं लागली कीं साद घालून तिची चेष्टा करावी. मुरमुगाचे वेल उपटून खांद्यावर टाकावे आणि ते कोवळे गर खात खात शेतात मधेच आगंतुक उभ्या असणाऱ्या काटेरी बाभळीचे पिवळे धमक सुगंधी बुंद कुणाला तरी लिहून ठेवलेल्या पत्रांत घालण्यासाठीं गोळा करावे आणि अशा नादांत तिन्हीसांजा झाल्या कीं, ठरल्याप्रमाणे गांवच्या उत्तरेकडील दरडीवरच्या 'बजरंगा'च्या देवळांत दाखल व्हावं असा माझा कार्यक्रम ठरलेला असे. मी बजरंगाच्या देवळांत अशी न चुकतां हजर होई ती दमूनभागून विश्रांतीसाठी नव्हे किंवा मी मोठी भाविक म्हणून तर नव्हेच नव्हे. एवढ्यासाठींच, कीं बजरंगाचं देऊळ म्हणजे मी व माझे गांवकरी यामधला दुवा होता. बजरंगाच्या देवळांत माझ्या गांवकऱ्यांची अनेक सुखदुःखं मीं पाहिली आहेत, ऐकलीं आहेत. या सुखदुःखांचा मला जिव्हाळा वाटतो. माझ्या गांवकऱ्यामध्ये आणि माझ्यामधे जें अंतर उत्पन्न झालें आहे तें इथं या देवळांत नाहींसं होतं. हें अंतर कशानं उत्पन्न झालं त्याचं उत्तर दोन ध्रुव, दोन जगं, दोन मनं, दोन भुका अशा बेच्या पाढ्यांत देतां येईल. पण तो 'पेट' फॉर्म्युला माझ्या बाबतींत लागू पडत नाही. हें अंतर दोन जगांतलं नाही. दोन ध्रुवांतलं नाहीं. गरीब–श्रीमंतीमधील तर नाहीच नाहीं. माझे गावकरी गवत तर मी झाड, ते शेळ्या तर मी सिंह–असा विनोद मी कधी कधी करीत असते. पण भिन्न व्यवसायांमुळे दोन जिव्हाळ्याच्या मित्रांतही जे अंतर उत्पन्न होईल त्या प्रकारें मी व माझे गांवकरी एकमेकांना दुरावलों आहों हीच गोष्ट खरी. हें अंतर नाहींसं होण्याचं एक साधन, एक ठिकाण—याच एका दृष्टीनं बजरंगाच्या देवळांत रोज घटका दीड घटका मी काढीत असे.

बजरंगाचं देऊळ फार जुनं होतं. उन्हा-पावसानं त्याच्या शिखराचं बांधकाम काळवंडलं असलं तरी शिखरावरचा सोन्याचा कळस नेहमीं चमकत राही. गांवच्या इनामदारांना अनेक वर्षांनी मुलगा झाला–वंशवेल नवसा-सा–

सांनी फुलली-छोटा बजरंग नवसाला पावला म्हणून इनामदारांनीं बजरंगाच्या देवळावर सोन्याचा कळस चढवला होता.

तेव्हांपासून छोटा बजरंग नवसाला पावतो अशी त्याची ख्याति झाली होती.

छोटाच बजरंग ! देवळाचा गाभारा ऐसपैस असला तरी गाभाऱ्यांतली बजरंगाची मूर्ति फार तर वीतभर उंचीची भरली असती. त्यांतून एक गुडघा जमिनीवर टेकून बजरंगानं आपली खास 'पोझ' घेतल्यामुळे तो अधिकच बुटका दिसे. बजरंगाची टेंगणी मूर्ति म्हणजे शिल्पकृतीचा विनोदी नमुनाच !

you are a fool [illegible]

शनिवारीं बजरंगाचा 'गाला डे' असे. धूपदीप, आरत्या, उदबत्त्या, फुलें, रुईच्या माळा आणि शेंदूर—! थाट कांही विचारूं नका. नटीचा ऑटोग्राफ घ्यायला जमणार नाही इतकी गर्दी देवळाच्या सभामडपांत जमत असे. खरंच, नट्यांनीं हेवा करावा असाच बजरंग आहे-किंवा होता वाटलं तर. नारळ किती फुटत, गणना नाहीं. धूपआरतीच्या घमघमाटांत आणि घंटानादाच्या खणखणाटांत "जय बजरंग" "जय बजरंग" अशा घोषानं बजरंगाचा गाभाराच काय, पण देवळाच्या आवारांतल्या दीपमाळेखालीं पसरलेली दरीसुद्धां घुमून जाई.

सुवासिक उदकाचं-दुधाचं स्नान, धूपाची आरती, पारिजातकाच्या फुलांचे भरघोस आणि शीतल हार, पंचपक्वान्नांचा नैवेद्य आणि शेकडों भक्तगणांचा 'जय बजरंग' असा जयघोष-असा माझ्या बजरंगाचा थाट होता. आणि या थाटाला शोभेल असाच त्याचा अधिकारही होता. गांवांतल्या लहान मोठ्या, गरीब-श्रीमंत प्रत्येक व्यक्तीचं सुखदुःख बजरंगाच्या हातीं होतं.

जवळच्या तालुक्याहून जरीचा रुमाल बांधणारे, लांब कोट घालणारे "दिपोटी" गांवांत आले कीं, शाळेंतल्या सगळ्या चिमण्या, मेंढपाळ, विद्यार्थ्यांच्या तोंडचं पाणी पळे. परीक्षा पास व्हावी म्हणून बजरंगाला पैशाच्या

खडीसाखरेचे नवस करायचा असा त्यांचा रिवाजच होता. सासुरवासणींचा तर बजरंग मोटाच आधार ! सासूच्या जाचाला, नवऱ्याच्या व्यसनाला आणि पोटच्या वांझपणाला कातावलेल्या किती तरी सासुरवासणी बजरंगाच्या छोट्या मूर्तिपुढें मळवटानं भरलेलं कपाळ टेकीत, नवस मागून घेत, उपवास करीत. शेताच्या बाधावर मारामारी करण्यापूर्वी डोळ्यांत खून चढलेले आडदाड शेतकरी आधीं बजरंगाचा कौल घेत.

इतकंच काय, पण मृत्यूचा अखेरचा सौदाही बजरंगाच्या हातीं होता. तापानं तडफडणारं पोर घरांत एकटं अंथरुणावर टाकून घरचीं सारीं माणसं बजरंगाच्या गाभाऱ्यापाशीं धरणं धरून बसत.

अशा तऱ्हेनं माझ्या गांवकऱ्यांची सारी सुखदुःखं बजरंगाच्या हवालीं होतीं. बजरंगाची कीर्ति माझ्या गावाच्या लहान चतुःसीमेबाहेरही पसरली होती. विशेषतः हनुमान-जयंतीचा वार्षिक महोत्सव म्हणजे मोठी जत्राच ! पट्टणकुडी, शिपूर, गवानी ही गांवं माझ्या गांवाशी पाठच्या भावंडाप्रमाणे बिलगून बसलेली आहेत. या साऱ्या गांवांतून जत्रेला लोटावे तसे महोत्सवाला लोक जमत. त्या त्या गांवचे भटजी पडश्या खांद्यावर टाकून आपापल्या तट्टावर बसून येत. त्यांचा–म्हणजे भटजींचा आणि त्या तट्टांचाही–मुक्काम आमच्या वाड्यांतच असे. भटजी तंबाखूचा आणि तट्टं हरभऱ्यांचा तोबरा भरीत. डोंगराखालच्या जैनांच्या देवळांतला पांढरा शुभ्र घोडा मुद्दाम शृंगारून जयंतीसाठी वर आणीत असत. तो तर वाड्यापुढें खूर उडवीत, लचकत आला कीं, या शिंगराना पाहून खिंकाळू लागे. मला वाटत त्यालाही हसू येत असावं. जणू कांही तो स्वतःला "टायरोन पावर"च समजत होता !

एकीकडे जयंतीच्या उत्सवाखातर माझे गांवकरी पै-पाहुण्यांसकट मौज-मजा लुटीत प्रसाद म्हणून पुरणाच्या पोळ्यांचा गोड सैंपाक करीत, कधी नव्हे ते चुरलेले पण ठेवणीचे नवे कपडे पेहरत आणि नेहमीं पै-पैशाचा हिशोब करणारे ते शेतकरी, मुलांना खेळणीं घेण्यासाठी, घोड्यावर बसवण्यासाठी,

त्यांना ताईत बांधण्यासाठी इथं एक पैसा, तिथं दोन पैसे असे पैसे मुक्त-हस्तानं खर्चीत.

दुसरीकडे देवळांत नुसता गजर चालू असे. गर्दी इतकी कीं, त्या छोट्या बजरंगाचं शेपूटही दृष्टीस पडत नसे. घटानाद आणि जयघोष यांनीं कानठळ्या बसत आणि धूपाचा, बुक्क्याचा आणि घामाचा इतका दर्प सुटे कीं त्या गर्दीत जीव गुदमरून जाई.

ही लग्नघाई संपली कीं मग पाहुणे निरोप घेत. जुन्या ओळखी, लागेबांधे दृढ करून तीं माणसं परत जात आणि मग हळूहळू सारीच जत्रा उठून जाई. जैनांचा पांढरा शुभ्र, मस्त घोडा आपले शृंगारसाज वाजवीत, डोंगराळ वाटेतले दगड-गोटे टापानं उडवीत डोंगर उतरून निघून जाई—आणि मग जवळचं माणूस गांवी गेल्यावर कष्टी व्हावा तसा चेहरा करून सगळीं माणसं आपापल्या कामाला लागत. जयंतीच्या उत्सवांत चार दिवस मजा झाली चला !

उत्सव समाप्तीनंतर बजरंगाला सुवासिक उदकानं न्हाऊं घालून, त्याच्या पायांशी पडलेला तेल-शेंदराचा ढिगारा दीपमाळेपुढच्या दरींत टाकून द्यायचा अशी गुरवाची चाल होती आणि गुरवाच्या या चालीमुळे एकदां एक विलक्षण घटना घडून बजरंगाच्या नशिबाचं पारडं अगदीं 'रोमेल'प्रमाणे तिरपागडं फिरलं.

एकदां अशाच उत्सवाच्या गर्दीत नजर-चुकीनं मोकळी सुटलेली इनाम-दारांची हरिणी कालवड डोंगरांत मनमुराद हिंडत होती. चरतां चरतां ती दीपमाळेखालच्या दरींमध्यें आली. डोंगराळ रानांत चारा तो काय मिळणार ? आणि शास्त्रीय तऱ्हेनं मीठ घालून तयार केलेल्या विलायतीं दुर्वांपुढें हरिणीला डोंगराळ कांटेरी गवत काय रुचणार ? पण हरिणी उगीच खेळ करीत, हे कुरतड, तें कुरतड असे करीत चालली होती. नुकतीच गाभाला गेल्यामुळे तिची तांबूस अंगकांति अधिकच गडद दिसूं लागली होती. नाजूक काळेभोर खूर, गोंड्याला कुरळें मऊ केस असलेली लांबसडक शेपूट, थोडीशी अपरिचित अशीं तीं आखुड पुढें झुकलेली विलायती शिंगं, आणि पाहतांना प्रेमळ

पणाचा वर्षाव करणारे, हरणालाही लाजवतील असे शिपांएवढे मोठे काळेभोर डोळे, अशा देखण्या रूपाची, पुष्ट बांध्याची हरिणी कधीं नव्हे ती उन्हातान्हांत हिंडत होती. इतर हाडकुळ्या कजाग गाईंची गोष्ट वेगळी. हरिणीची वेगळी. डोंगर तुडवून जे चार घास मिळतील त्यावर भूक भागविण्यासाठीं ऊन पावसाचा विचार त्या गाईंना बाजूला ठेवावा लागत असे. पण हरिणी ! तिला कुठली असली सवय ? उन्हानं तिच्या तोंडाला कोरड पडली आणि मालकाच्या हातून भुइमुगाची आणि कुसुंब्याची पेंड खाणाऱ्या हरिणीनं अधाशीपणें जिभेला लागला तो तेल-शेंदराचा खडा मटकन् खाऊन टाकला. हरिणीन ती प्राणघातक मिटाई आणखी आणखी खाऊन टाकली !

हरिणी घरीं परतली ती थोडी झिंगूनच. तिच्या नाकपुड्या फुकल्या होत्या, श्वास विस्तवासारखा कढत झाला होता–आणि ते निष्पाप सुंदर डोळे तारवटले होते. शेंदूर काळजाला लागल्यामुळे हरिणीचा जीव तळमळत होता. दुसऱ्या दिवशीं गुरांचा डॉक्टर आणला. उपचार केले. पण हरिणी बरी व्हायची नव्हती ! दावणीला ती सारखे हिसके देत असे. आपल्या खुरांनीं ती जमीन उखणत असे--कुटूनही त्या आंतडां तोडणाऱ्या यातना थांबाव्या म्हणून तिची धडपड चालू होती. पण ती निष्फळ होती. पोटांतल्या वेदना असह्य झाल्या कीं हरिणी मान वर करून पाणी भरल्या डोळ्यांनीं इनामदारांकडे पाही आणि मोठ्यांदा हंबरडा फोडी. तिचं तें हंबरणं ऐकवेना म्हणून आसपास कुणी राहिलं नव्हतं! फक्त तिचा मालक आणि ती. एका हातानं आसवं पुशीत दुसऱ्या हातांनीं इनामदार हरिणीला कुरवाळीत–गोंजारीत, धीराचे शब्द बोलत उभे होते. पण अखेर तीन चार तासांत हरणी मान कोलमडून खालीं पडली. तिचा घसा, आंतडीं सारं कांही सुजून सोलून निघालं होतं आणि अशा यातनांतच नाजुक हरिणी दुवेतली. हरिणीनं मालकाकडे पहात प्राण सोडला. जणूं ती शेवटीं म्हणत होती–" हें असं काय झालं–मला समजत नाहीं–मला तर मीं जें खाल्लं तें गोड लागलं !–"

इनामदारांची लाडकी हरिणी बजरंगाचा शेंदूर खाऊन मेल्याची बातमी गांवभर पसरली आणि गांवकऱ्यांमध्यें खळबळ सुरू झाली. बोलायला धीर होऊ

नये पण मनांतून मात्र गरीब गाईची अशी हकनाक हत्या बजरंगाच्या देवळा-समोर—बजरंगाचा शेंदूर खाऊन व्हावी ही गोष्ट माझ्या गांवकऱ्यांच्या भोळ्या मनाला पटेना. ज्या देवाला अशा गोष्टी पाहवतात तो देव कसला ! असा विचार त्यांच्या मनाचा गोंधळ करी. पण तो ते भाबडे लोक मनावेगळा करीत.

इनामदारांनीं मात्र बजरंगाच्या देवळांत जाणंयेणं बंद केलं. त्यांच्या घरून बजरंगाच्या नंदादीपासाटीं तेल येई तेंही बंद झाल, आणि नैवेद्यही.

एका प्रसिद्ध गवयाचा गळा त्याला शेंदूर खायला घालून त्याच्या वैऱ्यांनीं बिघडवला असं मी ऐकतें. पण माझ्या बजरंगाचा गळा तर या शेंदरानं सपशेल कापला !

बजरंगाच्या अप्रियतेला अशी सुरवात झाली ती वाढतच गेली. संकटं आलीं कीं मिळून येतात ना, तसंच झालं. हरिणीच्या मृत्यूनंतर महिन्या दीड महिन्यांतच गांवांत गुरांच्या रोगाची सांथ पसरली. प्रथम वेशीवरल्या पाटलाची राम-लक्ष्मणाची जोडी बळी पडली. तें ऐकून ज्याच्या त्याच्या हृदयांत भीतीचं कापरं भरून गेलं. संध्याकाळी औत ओढून थकलेल्या बैलांना चारा-पाणी करतांना शंकाकुशंकांनी शेतकऱ्यांचा जीव बेजार होई. ते बजरंगाचा धावा करू लागत. पण लवकरच साथ उसळली आणि ताजेतवाने बैल दोन दिवसांत गुडघे दुमडून पटापट मरूं लागले.

या सांथीची लाट ओसरली तेव्हां साऱ्या गांवांत केवढी अवकळा पसरली. माझ्या गांवकऱ्यांची ग्रहदशाच फिरली होती. एका संकटांतून हात धुऊन दरिद्री होऊन मोकळ व्हावं तों दुसऱ्याच संकटानं मस्तकावर आघात करावा तसं माझ्या गांवकऱ्यांचं झालं. आजूबाजूच्या खेड्यांत कॉलऱ्याची साथ एखाद्या मोकाट सुटलेल्या वणव्याप्रमाणे पेट घेत होती. माझ्या लहानग्या गांवालाहि तिच्या झळा लागूं लागल्या.

घरांत दावणी मोकळ्या आणि शरीरं आजारानं ग्रासलेलीं ! अशा परिस्थितींत माझ्या गांवकऱ्यांचा आधार बजरंग ! बजरंगाला रोज एकादशी सुरू

होती. रोज नवे नवस चालू होते. बजरंगाच्या गाभाऱ्याभोंवतालचा लांकडी कटडा नवसाचें रुपये ठोकल्यामुळे भरून गेला होता. पण बजरंगाच्या पाषाण-हृदयाला पाझर फुटेना.

चावडींतल्या शेकोटीभोंवतीं फाटक्या चादरी पांघरून, तंबाखू ओढतां ओढता माझे गांवकरी एकमेकांना म्हणत " बजरंगाचा अवतार संपला. त्याचं देवपण गेलं ! तो आतां नवसाला पावत नाहीं."

गांवांतली परिस्थिति अधिक बिकट होत चालली तशी बजरंगाविषयींच्या अप्रियतेची लाट अधिकच उसळली. हरिणी मेल्यापासून बजरंगाच्या वैभवाला उतरती कळा लागली ती लागलीच ! नंदादीप बंद झाला, नैवेद्य बंद झाला, हळूहळू साऱ्याच गोष्टी बंद होत चालल्या आणि नेहमी गांवकऱ्यांनीं गजबजलेलं तें देऊळ आतां अगदीं ओसाड दिसूं लागलं.

बजरंगाला गोष्टी कळत नव्हत्या असं नाहीं. धूपआरतीनं दरवळणाऱ्या त्याच्या गाभाऱ्यांत आतां चिमण्या घरटीं बांधूं लागल्या होत्या आणि जिथं " जय बजरंग" असा जयघोष घुमून जात असे, त्या सभामंडपांत एखादं मरतुकडं कुत्रं अवेळींच गळा काढून रडूं लागे. या हालअपेष्टांत आणखी मानहानीची भर पडायची होती.

एके दिवशीं गांवांत कुणी दवंडी पिटली कीं इनामदार बजरंगाच्या देव-ळांत एका जागृत देवतेची प्राणप्रतिष्ठा करणार आहेत.

बजरंगाचं देऊळ पुन्हा झाडून सारवून स्वच्छ करण्यांत आलं. इनाम-दारांनीं आपल्या खर्चानं देवळाला रंग दिला. आणि लवकरच बजरंगाच्या देवळांत पुन्हा पहिल्याप्रमाणे धूपदीप, घंटानाद सारं कांही सुरू झालं. पण हें सारं वैभव बजरंगासाठीं नव्हतं. बजरंगाच्या शेजारीं संगमरवरी चौरंगावर मांडीवर मांडी घालून एका हातांत मोदक आणि दुसरा हात विनीत-मस्तकांना आशीर्वाद देण्यासाठीं उचललेला, अशा देखण्या, उजव्या सोंडेच्या जागृत

देवतेसाठीं–गजाननासाठी–ही सारी पूजाअर्चा चालली होती. विघ्नहर्त्या गजाननाच्या कृपेनं गांवावर ओढवलेलं संकट दूर व्हावं म्हणून गांवकऱ्यांनीं सेवेची शिकस्त चालविली होती. इनामदारांच्या घरून तर रोज दुपारीं भरउन्हांत दंडावर आणि कपाळावर भस्माचे पट्टे ओढलेला भटजी, एका हातानं नेसलेलं सोवळं संभाळीत, दुसऱ्या हातांत ओल्या नारळाच्या रसरशीत मोदकांचं ताट घेऊन, रस्त्यावरच्या अर्धपोटी आणि व्याधिग्रस्त शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या पोराबाळांच्या आधाशी नजरा चुकवीत, लगबगा गजाननाच्या देवळाकडे जातांना दिसे.

तें देऊळ आतां बजरंगाचं राहिलं नव्हतं. येथे आतां जय बजरंग असा घोष ऐकूं येत नसे. ती जागा आतां गजाननानं घेतली होती. गजाननाचा गाभारा नेहमीं प्रार्थनेच्या गाऱ्हाण्यांनीं घुमून जात असे. "विघ्नहर्त्या गजानना ! आमच्यावर दया कर. आमचं रक्षण कर. आमच्या गोठ्यांत पुन्हा घुंगूर वाजूं देत. आमच्या झोपडींत पुन्हा आनंद खेळूं दे. आमच्या शेतांत अंकुर उगवूं दे. आम्हा गरिबांवर अशी आग पाखडूं नको. तूं जागृत देवस्थान आहेस—!"

माझ्या गांवकऱ्यांचा हा धांवा ऐकून बजरंग मनांतल्या मनांत हसे. गजानन म्हणे जागृत देवस्थान ! जागृत देवस्थान म्हजे काय पोरचेष्टा आहे ? मोदक खाऊन तुंदिलतनु बनलेला हा बनिया गजानन, काय या मूर्ख लोकांचं रक्षण करणार ! बजरंग मनांतल्या मनांत खूप जळफळे ! त्याचं स्वतःचं वैभव नाहींसं झालं त्याचं त्याला फारसं वाईट वाटत नसे. पण गजाननाच्याजागृतीचं स्तोम माजलेलं पाहून त्याच्या शेपटीवर पाय पडल्याइतपत त्याला वेदना होत. म्हणे विघ्नहर्ता गजानन ! आणि असा संताप झाला कीं मग, आपला उगारलेला हात आवरणं बजरंगाला कठीण जाई.

रात्रीं गाभाऱ्यांत सामसूम झाली कीं बजरंगाचा राग उसळून बाहेर पडे. पण बोलून चालून पडत्याचा राग तो. त्याचा जळफळाट पाहून गजानन सोंडेंतल्या सोंडेंत हसून त्याला म्हणे, "अरे बस कर ना. बोलून चालून नकली माकड तूं ! तुझ्यांत देवपण असतं तर असा धूळ खात का पडला असतास ?"

बजरंग उत्तर देई, "अरे हत्तीच्या पिल्ला, उगीच कां गमजा मारतोस? तुझं देवस्थान जागृत आहे ना? मग दाखव कीं एखादा चमत्कार! गांवांत दुखण्यानं प्रलय माडला आहे. दाखव तुझा प्रताप! का मोदक खाण्यापुरताच तूं जागृत आहेस?"

गजाननाचं आणि बजरंगाचं असं द्वंद्वयुद्ध रात्रीच्या शांत प्रहरीं मुक्या देवनागरी भाषेत चालू राही.

गजाननाची पहाटेची काकडआरती सुरू झाली कीं अर्थात् हें युद्ध थांबत असे; पण गजाननाच्या आणि बजरंगाच्या मनात चालू असलेला जळफळाट थांबत नसे. एकमेकांना वंगवण्यासाठीं ते अनेक युक्त्याप्रयुक्त्या मनाशीं योजीत रहात. बजरंगाला आपलं सामर्थ्य दाखविण्यासाठीं आपल्याला झेपेलसा कांही चमत्कार करून दाखवावा अशी ईर्षा गजाननाच्या मनात आता पुरती पेटली होती; आणि गजाननाच्या जागृत देवपणाचं हें नकली सोंग उघडकीला आणण्यासाठीं, आपण एखादा छोटासा कांहीं चमत्कार करावा असा ध्यास बजरंगानं घेतला होता.

पण त्या दोन देवतांमधील युद्धाला चमत्काराचं तोंड फुटण्याच्या आधींच निसर्गानंच मोठा चमत्कार अकस्मात् करून दाखविला!

एके दिवशीं संध्याकाळच्या सुमाराला निरभ्र असलेल्या आकाशांत राक्षसासारखे काळेभोर ढग धुमाकूळ घालूं लागले. वव्हाऱ्यातून वावटळी उठूं लागल्या, आणि थोड्याच अवकाशांत वादळ सुरू झालं. या वादळानं माझ्या लहानग्या गांवाची पुरती दुर्दशा उडून गेली. गावकऱ्यांच्या चंद्रमौळी झोंपड्या पावसाच्या तडाख्याखालीं पार चिंबून गेल्या. आमच्या घरावरचे पत्रे तर मैलभर उडून लांब अस्वलखोऱ्यांत जाऊन पडले.

दुसरे दिवशीं सकाळीं वादळ निवळलं होतं. मी माझा 'फर कोट' घातला आणि बाहेर पडलें. कोवळीं उन्हं पडलीं होतीं, पण रस्ते पाणथळच

होते. मी बजरंगाच्या देवळापाशीं गेलें तों जिकडे तिकडे दगड माती झाली होती. कळस कसाबसा उभा होता. पण दरडीखालची भिंत पार आंतल्या बाजूस कोसळली होती. कशीबशी वाट काढीत मी आत गाभाऱ्यांत जाऊन पाहतें तो तेथें भला मोठा ढीग पडला होता. गजाननाच्या मूर्तीचा कोठें पत्ता नव्हता. त्या ढिगाऱ्याखालींच स्वारी गडप झाली असावी. मी बजरंगासाठी आजूबाजूला पाहिलं तों, एका कोपऱ्यांतल्या दगडावर बिचारा बजरंग उताणा पडला होता! मला एकदम गहिंवर आला. मीं हलकेंच त्याला उचलून रुमालानं कोरडा केला आणि कोटाआड धरून घरी आणला.

तेव्हांपासून बजरंग माझ्यापाशींच आहे. त्याची ती ठेंगणी आणि एखाद्या पहिलवानाची पोझ घेतलेली मूर्ति पाहून, माझ्या मैत्रिणी हसतात, चेष्टा करतात. नाहीं तरी कुणीही चेष्टा करावी असाच माझ्या बजरंगाचा एकंदर नूर आहे. पण बजरंग जागृत दैवत आहे याची माझ्या मैत्रिणींना कल्पना नाहीं.—त्याची त्याला सुद्धां आतां उरली नसेल!

पण मला मात्र त्याच्या जागृतपणाविषयीं पूर्वी नसेल इतका जबर विश्वास वाटूं लागला आहे.

कारण तो माझ्याकडे आल्यापासून माझी एकही गोष्ट साभार परत आलेली नाहीं.

# इंफाळचा राजा ! : : ६

'चिरंजीव' विमा कंपनीच्या ऑफिसांतून त्रिंबकराव बाहेर पडले ते अगदीं चिडूनच. नांवानं 'चिरंजीव' पण परिस्थितीनं केव्हां आटपेल नियम नाहीं, अशा या मरतुकड्या कंपनींत महिना पाऊणशें रुपयावर खर्डेघाशी करणाऱ्या त्रिंबकरावासारख्या कारकुनाला 'गावठी' साहेबाच्या शिव्यांखेरीज चिडायला दुसरं कारण तं कोणतं असणार? पण गंमत अशी कीं, त्रिंबक-रावाच्या मनस्तापाचं कारण असं धंदेवाईक नसून, अगदीं घरगुती होतं.

अलिकडे—म्हणजे बिंबाशीं लग्न केल्यापासून—त्रिंबकराव बरेंच चिंताग्रस्त दिसूं लागले होते. विशेषतः महिन्याची दहापंधरा तारीख उलटली कीं त्यांच्या या गुप्त मनस्तापाची झळ त्यांच्या आजूबाजूच्या मंडळींना देखील लागल्या-शिवाय रहात नसे. त्यांचा चिडखोरपणा वाढत जाई, आणि कामाच्या फायली बाजूला सारून आणि तिरसट चेहरा करून ते कागदाच्या एकाद्या चतकोरावर आंकडे मांडून कसला तरी हिशोब करींत रहात. नेहमीं मधल्या सुटींत त्यांच्या पाठीवर थाप मारून त्यांच्याकडून चहा उकळणाऱ्या लोचट रानडे कारकुनाची-सुद्धां अशावेळीं त्यांच्याजवळ जाण्याची छाती होत नसे. त्रिंबकरावाचा तो तिरसट चेहरा आणि कागदावरची त्याची ती आंकडेमोड पाहून रानडेला आज कित्येक दिवस एक विचित्र संशय येऊं लागला होता. सट्टयाचं किंवा रेसचं दुष्ट व्यसन त्रिंबकरावाला लागलं असलं पाहिजे अशी कुजबुज सांपडेल त्या कारकुनाच्या कानांत रानडे करूं लागला होता. एके दिवशीं मात्र त्रिंबक-रावांच्या त्या रहस्याचा उलगडा व्हावा असा एक कागदाचा तुकडा त्यांच्या टेबलावर रानडेला आढळला आणि त्रिंबकराव ऑफिसातून बाहेर पडल्यावर आपल्या दोस्तांना जमवून त्यानं कागदावरच्या त्या हिशोबाचं सामुदायिक

वाचन केलं. हिशोबाच्या तो तपशील ऐकून त्या साऱ्या कारकूनमंडळीची हंसता हंसता मुरकुंडी वळली होती.

एकाचं अन्न दुसऱ्याला विषसमान वाटावं, किंवा कांहींचं हास्य दुसऱ्यांचे अश्रू ठरावे असा मानवी जीविताचा विरोधी संकेतच असला पाहिजे. ज्या चतकोर कागदावरचा मजकूर वाचून 'चिरंजीव' कंपनीच्या कारकून मंडळींत अनावर हंशा पिकला होता त्याच मजकुरानं त्रिंबकरावाचं सारं मनःस्वास्थ्य हिरावून घेतलं होतं. ऑफिसांतून बाहेर पडल्यावरदेखील त्या चतकोर कागदावरचे ते हिशोबाचे आकडे त्यांच्या मस्तकांत फिरत होते. साडेतीन रुपयांचं गंगावन! हवं होतं कशाला? साडेतीन रुपयाला ग्यार लावून लाव सडक शेपटा घालून मिरवण्यापेक्षा बायकोला टक्कल पडलं तरी पुरवलं! त्या शेपट्यानंच गळफास लावून घ्यावा झालं आतां! साडेसात रुपयाचा टेबल क्लॉथ! आज सहा महिने आपण एका धोतरावर दिवस काढतो आहों आणि टेबल झांकायला बायको साडेसात रुपयाचा टेबल क्लॉथ खरेदी करते आहे! पाकशास्त्रावरचं पुस्तक–'गृहिणीमित्र'–व्ही. पी. सह चार रुपये!' 'गृहिणी-मित्र' नवऱ्याचा शत्रूच म्हणायचा! या चार रुपयाचे रेशनचे जाधळे आणले असते तर महिन्याची ददाद मिटली असती. आता मात्र 'गृहिणीमित्रा'तलेच मांडे खात बसण्याची पाळी आली आहे. गेल्या महिन्यांत एकंदर पंधरा रुपये केवळ चैनीखातर बिंबानं उडवले होते म्हणायचे. आणि या हिशोबानं लग्न झाल्यापासून दोन वर्षांत तिनं आपल्याला चारशें साडेचारशें रुपयाला तरी गंडवलं असलं पाहिजे. पंच्याहत्तर रुपये पगारांत बायको अशी उधळपट्टी करूं लागली तर लवकरच भीक मागण्याची पाळी यायची. तें कांहीं नाहीं. आतां अगदीं 'अखेरचं बंड' करून, वाटेल तो कठोर उपाय योजून या उधळ्या बिंबाचा पक्काच बंदोबस्त केला पाहिजे.'

त्रिंबकराव घरांत शिरले ते असा निश्चय करून आणि चढाईची योजना आंखूनच. आजवर कधीं प्रेमळपणानं, कधीं सामोपचारानं तर कधीं अबोला धरून, बिंबाच्या उधळपट्टीला पायबंद घालण्याचा प्रयत्न त्यानीं अनेकदां

केला होता, पण तो तात्पुरताच टरला होता. आतां मात्र संसाराच्या या आघाडीवर आर्थिक सकटाचा कडेलोट झाला होता. इंफाळ हातातून जाण्याची पाळी आली होती, ' लुई माउंटबॅटन–की जय ' अस स्मरण करून त्रिंबकराव उंबरा चढले आणि तडक माडीवर जाऊन शत्रू मैदानात कधीं उतरतो त्याची वाट पाहूं लागले.

शत्रू मैदानांत उतरला तो अगदीं गालाला खळ्या पाडून हंसतहंसतच. पण त्रिंबकराव लुई माउंटबॅटनपेक्षा फसव्या लढाईत तयार होते. हिरव्या वनश्रींत भयंकर तोफा दडलेल्या असतात. मऊ हिरवळीखालीं स्फोटक सुरुंग पेरलेले असतात. हा लुई माउंटबॅटनचा अनुभव नवाच असेल. पण त्रिंबक-रावाचा अनुभव जुना होता, आणि अशी फसवी लढाई खेळण्यात त्याचा शत्रू जपान्यापेक्षाही दोन बोट उंच होता. बिंबाच्या त्या गोड हंसण्यामागें कोणत्या खर्चाचा सुरुंग दडलेला असेल कोण जाणे, या भीतीनं त्रिंबकरावांनी मोर्चा रोखला आणि लढाईची तयारी केली. बिंबान टॉवेलनं झाकलेला ट्रे टेबलावर ठेवला आणि ती लाडिकपणं म्हणाली, " आज अगदीं स्पेशल चहा आणला आहे. पाहूनच तुमचं पोट भरेल. "

" तशी पाळी आणली आहेस खरी. " त्रिंबकराव टोंचून म्हणाले.

बिंबा एक मुरका मारून म्हणाली, " ही काय सदा न् कदा कुजकीं बोलणीं. पहा तर खरा चहा. "

असं म्हणून बिंबानं ट्रेवरचा टॉवेल काढला तेव्हां त्रिंबकरावांच्या डोळ्यां-समोर एकदम काजवेच चमकले. दुसऱ्याच क्षणीं तामू–टिडिम येथें चालू नसेल इतका भयंकर संग्राम त्या दोघा नवरा–बायकोंत सुरू झाला. त्रिंबक-रावांनीं धुमसत विचारलं, " कुणी बक्षीस दिला आहे वाटतं हा कपबशांचा सेट तुला ? "

बिंबा आपलं लांडं नाक वर चढवून म्हणाली, " असला उंची सेट बक्षिस मिळायला भाग्य लागतं. पण ज्यानीं द्यायचा ते देताहेतना कुजक्या बोलण्याचे अहेर ! "

"एवढा भारी सेट बक्षीस द्यायला तू मला कोण समजलीस? बडोद्याचा गायकवाड? आणि तूं तरी कोण अशी सीतादेवी लागून गेली आहेस?"

"अहो, मी एका कारकुनाची बायको आहे हें मला पक्कं माहीत आहे कीं."

"होय ना? मग ज्यानंत्यानं आपल्या पायरीनं वागावं. तुला असले श्रीमंती चोचले हवेत ग कशाला? आठ तास हमाली करून मी पैसे मिळवतो ते असे उधळायला शरम नाहीं वाटत तुला?"

"पण कपबशा मी माझ्या पैशांतून आणल्या आहेत."

"अस्सं काय? मग सगळाच खर्च तुझ्या पैशातनं चालव कीं. हा पांढरा हत्ती मला पोसायला तरी नको."

"काही वाटत नाहीं माझं अन्न काढतां तें?"

"उगीच काढतों आहे का? माझे पैसे खर्च होतात. तुझा बाप नाहीं पाठवत दीड दमडी."

"प्रथम माझं अन्न आणि आतां माझा बाप काढलात. जरा विचार करून बोला."

"आजपर्यंत पुष्कळ विचारानं बोललो. त्याचा तुझ्यावर काय झाला परिणाम? आता तुझी चांगली खरडपट्टी काढल्याशिवाय तुझा मूर्खपणा थांबायचा नाहीं."

"अस्सं होय? मग चालूं दे बडबड. तुमच्या खरडपट्टीला मी कवडी-इतकी किंमत देत नाहीं समजलांत?" बिंबा दुष्टपणें म्हणाली.

बिंबाचं तें निगरगट्टपणाचं उत्तर ऐकून त्रिंबकरावांच्या तळपायाची आग मस्तकाला पोंचली. ते ताडकन् उभे राहिले आणि ओरडले.

"मग मी नुसता बडबडत नाही, करूनच दाखवितो."

असं म्हणून त्यांनीं ट्रेमधली नाजुक किटली उचलली आणि समोरच्या भिंतीवर एखादा हँडग्रेनेड फेकावा तशी फेकली. बिंबा एकदम चमकली. किटलीचा तो खळकन् झालेला आवाज ऐकून आणि खोलीभर पसरलेले ते असंख्य तुकडे पाहून तिच्या अंतःकरणाचे तुकडे तुकडे झाल्यासारखं तिला वाटलं रागानं कीं दुःखानं तें तिचं तिलाच समजेना. तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. परंतु त्यांनीं तिच्या मनाची आग विझण्याऐवजी उलट भडकली मात्र. ती बेभान झाली आणि ट्रेमधली एकेक कपबशी उचलून वाटेल त्या दिशेनं फेकू लागली. " आई ग " असा आर्त स्वर तिच्या कानात शिरला. त्रिंबकरावांनीं आपला हात कपाळावर धरलेला तिनं पाहिला. परंतु वाताचा यावा तसा संतापाचा विलक्षण झटका तिला आला होता. ती जागची हालली नाहीं.

त्या विचित्र अवस्थेंत ती किती वेळ होती तें तिला समजलं नाहीं. अखेर ती भानावर आली तेव्हा खोलींत अंधार पडला होता. कपबशांचे तुकडे जिकडेतिकडे पसरले होते. चहाच्या ओघळानं गालिचा भिजून ओला झाला होता आणि न्हाणीघरात कोणीतरी नळ सोडल्याचा आवाज तिला ऐकूं येत होता. एक विचित्र शंका मनांत येऊन ती झटकन न्हाणीघरांत गेली. आंत नळ वहात होता, आणि कपाळावर ओलं फडकं धरून त्रिंबकराव खाली फरशीवरच बसून राहिले होते. बिंबानं कसाबसा आपला अभिमान गिळला आणि आवाजांतला कडवटपणा शक्य तो काढून टाकीत तिनं विचारलं, " फार लागलं आहे ? "

त्रिंबकरावांनीं तिच्याकडे तिरस्कारानं पाहिलं आणि ते म्हणाले, "मला मारून टाकायचाच बेत होतां तुझा ! "

" मारून टाकायचा बेत ? हूंः !" बिंबा कुत्सितपणं हंसून म्हणाली, " अहो तुम्हांला मारून मला काय फायदा ? तुम्हीं काय लाखाचे धनी आहांत ते तुमच्यामागें मी इस्टेटीची मालकीण होणार ? "

" असं बोलणाऱ्या उलट्या काळजाच्या बाईशीं मी कां लग्न केलं कुणाला ठाऊक ! " त्रिंबकराव वैतागानं म्हणाले.

" मी तरी तुमच्यासारख्या कद्रू कवडीचुंबक पुरुषावर कां भाळले हेंच मला आता समजेनासं झालं आहे. पण आता बोलून काय उपयोग? झाल्या गोष्टीला इलाज नाहीं." बिंबा गंभीरपणं म्हणाली.

" इलाज नसायला काय झालं? दुसरा एखादा नवरा असता तर असल्या उधळ्या भांडकुदळ बायकोला ताबडतोब सोडचिठ्ठी दिली असती आणि झाला असता मोकळा."

" काय म्हणालात?" बिंबा वाघिणीसारखी चवताळून म्हणाली. 'पुरुषजात तेवढी सारी निमकहराम!' हे फशी पडलेल्या बायकांचे उद्‌गार तिला त्रिंबकरावांचीं ती मुक्ताफळं ऐकून पुरते पटले, आणि अंगात अनेक भगिनी समाजाचा, महिला मंडळाचा, किंबहुना प्रत्यक्ष अखिल भारतीय महिला परिषदेचा संचार झाल्याप्रमाणं, कडकलक्ष्मीचा अवतार घेऊन हातवारे करीत बिंबा

म्हणाली, "खुशाल द्या मला सोडचिठ्ठी. तुम्ही पुरुष किती बेइमानी असता तें मी पुरतं ओळखून आहे, समजलात? आजवर पुरुषांनीं बायकांना छळलं, गांजलं आणि तें त्या बिचाऱ्यांनीं निमूटपणं सोसलं. तोच प्रयोग तुम्ही माझ्यावर करूं पहात असाल तर खबरदार. मी कांहीं एखादी अबला नाहीं, कीं मंगळसूत्राचा फांस बसला तरी नवऱ्याला देव मानणारी रागणेकराची नायिका नाहीं. तुम्हाला मोकळं व्हायचं आहे ना? मग इथं कोणी बांधून ठेवलं आहे? खुशाल द्या सोडचिठ्ठी आणि व्हा मोकळे."

" अगदीं एका पायावर तुला सोडचिठ्ठी देतों. जन्मभर तुझी बिळं भागवीत बसण्यापेक्षां तुला एकादा सोडचिठ्ठी दिलेली पत्करली. पण पहां बरं! मग माझ्या नांवानं ओरडतां कामा नये. तुम्हीं बायका मोठ्या दुतोंडी असतां. आज मी तुला सोडचिठ्ठी दिली कीं आज वाघिणीसारखी मला फाडून खाते आहेस, ती उद्यां समाजाच्या दृष्टीनं तू शेळी ठरशील. आज राक्षसीण आहेस ती उद्यां गोगलगाय होशील. बारकोंसारखीं महिलामंडळं आणि भगिनीसमाज तुझं दुःख वेशीवर टांगून स्वतःची टिमकी वाजवून घेतील, आणि अखिल

भारतीय महिला परिषद माझा गरिबाचा निषेध करून माझ्यावर विनाकारण आग पाखडील. बाकी या तादळाच्या रेशनिंगच्या दिवसात महिलानी आगीच पाखडायच्या. तेव्हां आता म्हणते आहेस सोडचिठ्ठी द्या म्हणून, पण मग तूंच माझ्या नावानं जन्मभर ओरडशील."

बिंबा तिरस्कारानं हंसून म्हणाली,

"भ्रम आहे तुमचा. तुमच्यासारख्या कवडीचुंबक नवऱ्यासाठीं ऊर बडवायला अडलं नाहीं खेटर !"

बिंबाचं तें अपमानकारक उत्तर ऐकतांच त्रिंबकराव ताडकन् उभे राहिले आणि हातवारे करीत बिंबाला म्हणाले,

"खेटरदेखील अडत नाहीं ना ? मग मी आत्तां या क्षणाला घराबाहेर पडतो, पण पुन्हां या घरात पाऊल नाहीं टाकणार. तूं मात्र मग पायां पडत आलीस तर खबरदार."

"अहो कोण कुणाच्या पाया पडतं तेंच पाह्यचं आहे मला. धमकी कशाला घालता ? तुम्हाला घराबाहेर पडायचं आहे ना ? दार उघड आहे. या क्षणीं चालते व्हा. माझं मी पाहून घेईन." बिंबा तिरस्कारानं म्हणाली.

"अस्सं काय ?" एवढाच कसाबसा उद्गार काढून त्रिंबकरावांनीं खुंटी-वरचा कोट ओढून खांद्यावर टाकला, टोपी कशीबशी डोक्यावर ठेवली आणि कोपऱ्यांतल्या वहाणा पायांत सरकवून ते खरोखरच घराबाहेर पडले.

बिंबा कांहीं वेळ अगदी गोंधळून गेली. त्रिंबकराव घराबाहेर पडले यावर तिचा विश्वास बसेना. चेंडू म्हणून आपटून उडवून खेळायला जावं आणि त्या चेंडूचा बॉंबगोळा ठरून दोन्ही हात जायबंदी व्हावे तशी तिची अवस्था झाली. परंतु नवरा घराबाहेर पडला म्हणून डगमगायला ती काय एखादी दुबळी स्त्री होती ? बायकांचे समाज, मंडळं स्थापून आणि परिषदा भरवून पुरुषी अन्यायाचा व जुलमाचा मुलुखमैदान निषेध करणारे विसाव्या

शतकातली ती एक बंडखोर महिला होती. त्रिंबकरावांच्या नाकावर टिच्चून आपल्या संसाराच्या पुरुषपात्रविरहित नाटिकेचा प्रयोग यशस्वी करून दाखविण्याची ईर्षा हटकून बिंबाच्या मनात उत्पन्न झाली आणि ती त्या तयारीलाही लागली.

पुढचं दार धाडदिशी लावून घेऊन त्रिंबकराव घराबाहेर पडले. बाहेरचा गार वारा मस्तकाला लागला तेव्हा ते भानावर आले. त्यांनी वर पाहिलं तो काळ्याकुट्ट ढगांनीं आकाश भरून गेलं होतं आणि मधूनच चारदोन टपोरे थेंबही पडत होते. मुसळधार पाऊस पडणार यांत शंका नव्हती. घरात जाऊन छत्री आणावी असा विचार त्रिंबकरावांच्या मनात आला. परंतु घरांत परत पाऊलही न टाकण्याच्या त्यांच्या प्रतिज्ञेची त्यांना आठवण झाली आणि त्यानी तो विचार मनावेगळा केला. अपरात्रीं भांडण काढून बाहेर पडण्यापेक्षां सकाळची वेळ भांडणाला अधिक सोयिस्कर झाली असती. रात्रीच्या वेळीं, बाहेर पावसाची स्पष्ट लक्षणं दिसत असताना रिकाम्या खिशानं आणि पोटानं ‘ घरांत पुन्हा पाऊल टाकणार नाहीं ’ अशी प्रतिज्ञा करून आपण घराबाहेर पडलों तें आपलं चुकलंच, असंही त्याना वाटलं. परंतु शेंडी तुटो कीं पारबी तुटो आतां माघार घ्यायची नाही असं मनाशीं ठरवून, एकदाही मागं वळून न पाहतां ते झपाझप चालूं लागले. ‘ संकटाच्या वेळीं उपयोगी पडतो तोच खरा मित्र ’ असं सुभाषित कुठंतरी भिंतीवर टांगलेलं वाचल्याचं आठवलं आणि ते बंडोपंतांच्या घराकडे वळले. बंडोपंतांचं घर गांठीपर्यंत त्यांची कोण त्रेधातिरपिट उडून गेली. अंगावर मुसळधार पाऊस झेलीत आणि रस्त्यांतला चिखल तुडवीत ते कसेबसे बंडोपंताच्या दारांत पोंचले आणि त्यांनी ‘ बंडोपंत ’ अशी जोरानं आरोळी ठोकली.

अशा अपरात्रीं आणि घाबऱ्या आवाजांत मारलेली हांक म्हणजे कोणाच्या तरी प्रेतयात्रेचंच निमंत्रण असायचं असा अनुभव असल्यामुळे बंडोपंत बराच वेळ बाहेरच आले नाहीत. अखेर दाराच्या आणखी खिडकीच्या फटींतून तसं कांहीं नाहीं अशी खात्री करून घेतल्यावर त्यानीं दार उघडलं आणि ‘ या या त्रिंबकराव ’ असं तोंड पसरून हंसून म्हणत भिजून चिंब झालेल्या

त्रिंबकरावाला घरांत घेतलं. फार दिवसांनीं वाट चुकलांत, बसा घटकाभर, पाऊस थांबल्यावर जा परत ' अशी ठराविक सांच्याची लाघवी भाषा ऐकून घेतल्यावर अखेर त्रिंबकराव म्हणाले, " अरे घटकाभर कां, मी चांगला कांहीं दिवसच तुझ्या घरीं मुक्काम ठोकायला आलों आहे." त्रिंबकरावांचे ते शब्द ऐकतांच बंडोपंतांच्या चेहऱ्यावरचं तें लाघवी हास्य पार मावळून गेलं आणि गवळयाचा किंवा वाण्याचा हिशोब भागवतांना व्हावा तसा त्याचा चेहरा तिरसट आणि कवडीचुंबक दिसूं लागला. रेशनिंगच्या दुष्काळांत पाहुणा म्हणजे एक संकटच. त्रिंबकराव मुक्काम ठोकणार ही बातमी कानीं पडली तेव्हा तर मुंबईच्या गोदीला स्फोटानं बसला नसेल एवढा धक्का दाराआड उभ्या राहिलेल्या बंडोपंतांच्या गोदूबाईंना बसला. त्रिंबकरावांच्या गृहत्यागाची हकीगत ऐकल्यावर हा आगंतुक पाहुणा उडवून लावण्याची एक युक्ति गोदूबाईंना सुचली व त्या उंबऱ्यापाशी येऊन म्हणाल्या, " ते सारं खरं त्रिंबक भाऊजी, पण आम्ही तुम्हाला थारा दिला तरविंबावैनी आम्हाला काय म्हणतील ? नवराबायकोच्या भांडणाच्या आगींत तेल ओतण्याचं पाप आमच्या माथ्यावर नको. तुम्ही आपले निमूटपणें घरी जा कसे. बिंबावैनीसारखी साध्वी बायको मिळायची नाहीं."

बंडोपंतांनीं दुसऱ्या बाजूनें हल्ला चढवला. ते म्हणाले, " त्यातूनही मी तुला रहा म्हटल असत तिंबू, पण सरकारनंच आमचा नाइलाज करून ठेवला आहे. अरे आठवड्याला रेशनचं धान्य आणतो मी, आम्हा नवराबायकोंना आणि सात पोरांनां कसंबसं पांच दिवस पुरतं. साखर तर तोंडची पेरूं तेवढीच. अशा हाल-अपेष्टांत रहा असं तरी कसं म्हणूं. अरे तूं केव्हाचा असा निथळत उभा आहेस, पण चहा द्यायचा मनांत असूनही मळा तो देता येत नाहीं—"

" पण मला चहा नको देऊं, जेवायला नको घालूं, एक पंचा आणि सतरंजी तर दे रात्रीपुरती. उद्याचं उद्यां पाहूं."

असं निगरगट्टपणें उत्तर देऊन, बंडोपंतांचा पंचा नेसून बाहेरच्या टीच भर गॅलरींत मच्छराच्या जाळींत, गटाराची घाण घेत आणि सात पोरांचा

बेंडबाजा ऐकत त्रिंबकरावांनीं उभी रात्र तळमळून काढली. दुसरे दिवशीं ते जागे झाले, आणि डोक्यावर थंड पाण्याची बादली ओतून घेऊन आणि आपले वाळलेले कपडे अंगावर चढवून ते बडोपंतांच्या घराबाहेर पडले.

नंतरच्या चारपांच दिवसांत 'जो संकटाच्या वेळीं उपयोगी पडतो तो खरा मित्र' हे सुभाषित फक्त भिंतीवर टांगण्याच्याच उपयोगाचं असतं हें त्यांना अनुभवानं करून चुकलं होतं. ज्या ज्या मित्राकडे ते गेले त्या त्या मित्रानं रेशनिंगचं रडगाणं निरनिराळ्या रागात त्याच्यापुढें गाइलं होतं. आणि अखेर सरकारला भरपूर शिव्याही मोजल्या होत्या. या साऱ्यांना भारतसरक्षण कायद्याखालीं कां अटक करूं नये असा सूडाचा विचार त्रिंबकरावाच्या मनांत अनेकदा येऊन गेला. कोणाकडून तरी चारआठ आणे उसने काढावे, कोठल्या तरी भिकार खानावळींत जेवण करावं, ऑफिसांतली हमाली आटोपावी, आणि रात्रीं एखाद्या फकिराप्रमाणें बडोपंताच्या धर्मार्थ गॅलरींत येऊन पडावं असं सात-आठ दिवस त्रिंबकरावांनीं घालवले.

'पण पुढें पुढें त्यांना सारखी घराची आठवण होऊ लागली. बिंबाची आठवण होते असं कबूल करायला ते तयार नव्हते. पण बिंबानं घातलेल्या मऊ बिछान्याची, तिच्या हातच्या गरम चहाची आणि खमंग सैंपाकाची त्यांना वरचेवर आठवण होत होती. आठ–दहा दिवस गॅलरींत फरशीवर पडून आणि खाणावळीचं भिकार अन्न अर्धपोटी जेऊन त्रिंबकरावाचा 'बंगाल' होऊन गेला होता. आठ दिवसात त्याना तीनदा बद्धकोष्ट आणि पांचदां अतिसार झाला होता. बायका घर सोडून गेल्या तर मुलाच्या ओढीन त्या परत घराकडे वळतात म्हणे. परंतु 'घराबाहेर' पडलेला पुरुष फक्त जेवणाच्या ओढीनंच परत येण्याची शक्यता आहे. प्रेम, कर्तव्य यासारख्या उच्च भावनांमुळें नव्हे, परंतु या 'तिसऱ्या भुके'साठी तरी सारी ईर्षा सोडून घरीं बिंबाकडे जावं असा विचार हळूच त्रिंबकरावांच्या डोक्यांत घोळूं लागला. प्रतिज्ञाभंग करून दातीं तृण धरून आपण बिंबाकडे जाण्यापेक्षा युक्तीप्रयुक्तीनें बिंबाकडूनच बोलावणें आणवून मग उजळ माथ्यानें 'यशस्वी माघार' घ्यावी असं त्यांनीं मनाशीं ठरवलं आणि बिंबाची पतिनिष्ठा जागृत करण्यासाठीं एक योजनादेखील आंखली.

बिंबाच्या नात्य.गोत्याच किंवा ओळखीचें कोणी माणूस दृष्टीस पडलं कीं त्याला वाटेतच आडवून धरून आपल्या गृहत्यागाची सारी हकीकत त्रिंबकराव सुनावीत आणि मग आर्जवानं विनवीत, 'आतां तुम्ही तरी शिकवा बिंबाला, कीं नवऱ्याला अग कचऱ्यासारखं लेखूं नये म्हणून.' बिंबाच्या भगिनी समाजाच्या चिटणीशीण टमाकाकू यानादेखील एकदां रस्त्यांत गाठून त्रिंबकराव म्हणाले, "आता तुम्हीच सांगा टमाकाकू, प्रत्यक्ष नवऱ्याशीं इतक्या बेपर्वाईनं वागणं बिंबाला शोभत का ? बिंबाला म्हणावं मनाची नाहीं तरी जनाची लाज बाळग आणि नवऱ्याची विचारपूस कर. अहो तिनं शब्द टाकायचा अवकाश तिचे सारे अपराध पोटात घालून मी एका पायावर तिच्याकडे धाव घेईन."

पण टमाकाकूंनीं उत्तर दिलं होतं,—"बिंबाला तसा उपदेश करायला मी कांही आतां पहिली टमाकाकू राहिलें नाही. मी आतां भगिनी समाजाची चिटणिशीण आहें, लक्षांत ठेवा. तुमच्यासारखे पुरुष आम्ही बिंबासारख्या अबलांचे वैरी समजतो. परवा आम्ही बडोदेकरांचा जाहीर निषेध केला तिथं तुमची काय कथा ? तुम्हीं निमूटपणं बिंबाकडे परत जा आणि तिचे पाय धरा. नाहींतर पुढच्या आमच्या सभेत तुमच्या निषेधाचा ठराव मांडतं."

बिंबाच्या मामेभावाच्या मेहुण्याला वाटेंत गाठून त्रिंबकरावांनीं एकदां तोच प्रयोग केला होता. त्रिंबकरावांनीं धरलेलं आपल्या कोटाचं बटन हिसकून घेत आणि त्यांच्याकडे एखाद्या किड्याकडे पहावें तसं पहात तो म्हणत होता,— "अहो, तुम्हीं आमच्या बिंबाचे नवरे असलांत तरी स्वतःला समजलांत कोण ? पतौडीचे नवाब ? तुमच्यासारख्या कवडीचुंबक नवऱ्याशिवाय तिचं खेटरदेखील अडत नाहीं. मोठी धडाडीची आणि स्वावलंबी बाई आहे आमची बिंबा. परवांच आमचे गगूनाना सांगत होते, कीं बिंबानं घराचा पुढचा भाग भाड्यानं द्यायचं ठरवलं आहे म्हणून."

बिंबाच्या मामेभावाचा तो मेहुणा निघून गेल्यावर कितीतरी वेळ त्रिंबकराव अस्वस्थ होते. एकदरींत बिंबाची मजल राहतं घर भाड्यानं देण्यापर्यंत पोंचली होती म्हणायची. तिच्या या वागण्याचा अर्थ उघडच होता आणि त्याच अनर्थाच्या भीतीनं त्रिंबकरावांचं मनःस्वास्थ्य नाहींसं झालं होतं.

त्या रात्रीं त्यांना नीट झोप आली नाहीं. पहांटे एक विचित्र स्वप्न पडून ते दचकून जागे झाले. त्यांच्या राहत्या घरावर पाटी लावलेली होती आणि तीवर स्पष्ट अक्षरात लिहिलं होतं. ' विद्यार्थ्यांसाठीं खोल्या भाड्यानं देणें आहे.'

संध्याकाळीं ऑफिस सुटल्यावर त्रिंबकराव तडक आपल्या घराकडे निघाले. ' माझी गल्ली ' म्हणून ज्या रस्त्याला ते मानत आले होते त्याच रस्त्यानं ते एकाद्या मुशाफिराप्रमाणें चालले होते. ' आमचं घर ' म्हणून ज्या घरांत बिंबासह त्यांनीं संसार केला होता त्या घराकडे मुंबईच्या आशाळभूत भाडेकरूप्रमाणं ते पहात होते आणि स्वतःच्या बायकोला एक गरजू भाडेकरू या विचित्र भूमिकेंत ते भेटणार होते. घरावरून दोनचार फेऱ्या मारून दुसऱ्या मजल्यावरच्या गॅलरींतली ती पाटी त्यांनीं पुन्हा वाचली तरी तीवर त्याचा विश्वास बसेना. अखेर मनाचा हिय्या करून मनाशीं जुळविलेल्या बिंबाच्या मुलाखतीची त्यांनी पुन्हा एकदां उजळणी केली आणि दारापाशीं जाऊन कडी वाजवली.

त्रिंबकरावांना दारांत पाहतांच प्रथम आश्चर्यानं आणि मग रागानं बिंबाचा चेहरा गोरामोरा झाला. आवाजांत शक्य तितका कटोरपणा आणून तिनं विचारलं, " काय काम आहे तुमचं ? "

" तसं कांहीं खांजगी काम नाहीं. वर पाटी वाचली, खोल्या भाड्यानं द्यायच्या आहेत म्हणून. त्यासाठीं भेटावं म्हणून आलो. "

" पाटी नीट वाचलीत काय ? खोल्या विद्यार्थ्यांना भाड्यानं द्यायच्या आहेत. लग्न झालेल्यांना खोली मिळायची नाहीं. " बिंबानं उत्तर दिलं.

" अहो, पण माझं लग्न झालं असून नसल्यासारखंच आहे. बायकोची कटकट, संसाराचं लटांबर या सगळ्यांतनं सहीसलामत सुटलों आहे मी. तेव्हां खोली दाखवा पाहूं. "

" पण आम्हांला मुळीं खोली द्यायचीच नाहीं तुम्हांला भाड्यानं. "

" मग पाटी कशाला लावलीत ? "

" पाटी लावली म्हणजे तुम्हांलाच ती भाड्यानं द्यावी हा काय जुलूम ? आम्ही दुसऱ्या भाडेकरूंना देऊं. "

" मला भाड्यानं खोली द्यायचीं नाहीं, या मागं तसंच कांहीं नाजुक कारण असलं तर जातों मी बापडा. "

" नाजुक कारण ? " बिंबानं चमकून विचारलं.

" होय, म्हणजे असं, नवरा-बायको कितीही भांडली, विभक्त झाली तरी एकत्र आल्यावर मेलेली प्रेमभावना जिवंत होण्याची भीति असते. तशी भीति तुम्हाला वाटणं साहजिकच आहे—"

" कोण नवराबायको ?-कसलं प्रेम आणि कसली भीति ? " बिंबा एकदम चवताळून म्हणाली. " एक भांडेकरू यापलिकडे मला तुमची कांहीं किंमत नाही. महिना पंधराप्रमाणें दोन महिन्याचं तीस रुपये भाडं आगाऊ द्यायची तुमची ऐपत आणि तयारी असेल तर खुशाल खोलींत भाड्यानं रहा. "

" महिना पंधरा रुपये भाडं ? आणि दोन महिन्यांचं आगाऊ ? " त्रिंबकरावांनीं दचकून विचारलं.

" अहो कवडीचुंबक माणसांसाठीं नाहीं कांहीं ठेवल्या मी खोल्या भाड्यानं. महिना पंधरा आणि आगाऊ तीस. वाटेल तर घ्या, नाहींतर दुसरी जागा पहा. परवडत नाही तर चौकशी कशाला करावी ! "

" जास्ती बोलण्यापूर्वी तुमची खोली तर दाखवाल ? " त्रिंबकराव चिडून म्हणाले.

बिंबा माडीवर गेली आणि त्रिंबकरावांच्या निजायच्या खोलीचं दार सताड उघडं टाकून म्हणाली, " पहा. "

त्रिंबकराव कपाळाला आठ्या घालीत म्हणाले, "जरा कोंदट आहे तुमची खोली आणि हा केर काय ? ही जळमटं काय ?"

बिंबा फणकाऱ्यानं म्हणाली, "हवी असली तर घ्या."

"बरं, मग आजपासूनच राह्यला येतों मी. आज एक तारीख आहे."

"पण भाड आगाऊ टाका. मगच खोली ताब्यांत मिळेल." बिंबा रोखठोकपणं म्हणाली.

त्रिंबकरावांनीं आंबट तोंड करून खिशांतून पाकिट काढलं, दहा दहाच्या तीन नोटा बिंबाच्या हातावर ठेवल्या आणि खोलीची किल्ली खिशात घालून ते जिना उतरले. दाराशीं त्यांना थांबवून बिंबानं बजावलं, "आजपासून तुम्हांला खोली वापरायला मिळेल. पण एक गोष्ट मात्र लक्षात ठेवा कीं,एक भाडेकरू म्हणूनच तुम्हांला इथं राह्यलं पाहिजे."

"मग मी काय मालक म्हणून इथं राह्यला येणार आहे कीं काय ?"

"नाही, पण आधी ताकीद केलेली बरी."

"तें कांही खोट नाहीं. आधीं कडू आणि मग—"

पण त्यांनीं 'गोड' हा शब्द उच्चारण्याच्या आंतच बिंबानं धाडकन् दार लावून घेतलं.

भाडेकरूच्या या नवीन भूमिकेंत वावरणं त्रिंबकरावांना अतिशयच अवघड जाऊ लागलं. त्यांच्या हातून होऊं नयेत तसल्या चुका होत. बिऱ्हाड थाटल्याच्या दुसऱ्याच दिवशी ते ऑफिसांतून परत आले, आणि दारांत पाऊल टाकतात तोच त्यांच्या नाकांत भजी तळल्याचा खमंग वास शिरला. पोटांत भुकेची कोल्हेकुई चालू असतांना आणि स्वतःची बायको भजी तळत असतांना मालक—भाडेकरू हें नवीन नात त्रिंबकरावांच्या लक्षांत कोठून राहणार ?

ते तडक सैपाकघरांत गेले. बिंबापुढच्या बशींतलीं चार भजीं त्यांनीं निमिषार्धांत फस्त केलीं, आणि खूप होऊन ते म्हणाले, " शाबास बिंबा, भजीं खावीं तर तुझ्या हातचीं." बिंबानं कडकलक्ष्मीचा अवतार धारण केला तेव्हां कुठें त्रिंबकराव भानावर आले आणि त्यांनीं धांवतच आपल्या खोलीचा रस्ता सुधारला. बिंबा खोलीच्या दाराशी येऊन कडाडली, " भाडेकरूच्या पायरीनं राह्यचं असेल तर रहा. नाहीतर या क्षणीं खोली खालीं करून चालते व्हा."

" तुम्ही चालते व्हा म्हणाल खुशाल. पण आम्हीं दोन महिन्याचे तीस रुपये आगाऊ टिकवलेत त्याची वाट काय ?" त्रिंबकरावांनीं सडेतोडपणानं प्रश्न केला.

" वाट काय ? बुडाले असं समजा."

असं उत्तर देऊन तणतणत बिंबा खालीं चालती झाली होती. पण दुसऱ्याच दिवशीं त्रिबकरावानीं खाणावळीचा डबा उघडला तेव्हां वरच्याच डब्यांत त्यांना त्यांच्या आवडीचीं कढत कढत भजीं आढळलीं. बिंबाच्या हातच्या भज्यांना कांही विलक्षणच गोडी होती खरी ! तीं खातांना त्यांना गहिंवरून आलें. बिंबाच्या वज्रासारख्या कठोर अंतःकरणात मायेचा थोडा तरी ओलावा होता म्हणायचा.

आणि त्यानंतर त्रिंबकरावांचा हा संशय अधिकच दृढ व्हावा असे प्रसंग वरचेवर घडूं लागले.

एकदां रात्रीं नऊदहाच्या सुमाराला शेजारच्या बिंबाच्या खोलींतून बिंबाची किंकाळी ऐकून ते ताडकन् उठले आणि दोन खोल्यांच्या मधें अलिकडेच बंद असलेल्या दारावर ठोठावून म्हणाले, " काय झालं हो ? मी येऊं काय ?"

बिंबा ' उई उई ' असं ओरडत धाडकन् दार उघडून त्रिंबकरावांच्या खोलींत शिरून म्हणाली, " आंत झुरळ घिरट्या घालूं लागलं आहे, त्याला आधी मारून टाका. माझी कोण गाळण उडवलीन मेल्यानं."

त्रिंबकराव हंसले आणि कोपऱ्यांतली केरसुणी घेऊन एका फटकाऱ्यांत त्यांनीं तें झुरळ जमीनदोस्त करून टाकलं. शकुंतलेच्या मुखकमलाभोंवतीं गुंजारव करणाऱ्या भृंगापेक्षां हें झुरळ त्यांना अधिक काव्यमय वाटलं होतं.

नंतर बिंबा मधलं दार लावून घेऊं लागली तेव्हां ते म्हणाले, " अहो, झुरळं आणि जपानी पुन्हा केव्हां हल्ला करतील नियम नाही. असूं दे कीं दार उघडं. "

पण बिंबानं डोळे वटारलेले पाहून ते गप्प बसले आणि मग कितीतरी वेळ त्या मधल्या बंद दाराकडे शून्य नजरेनं पहात राहिले. या प्रसंगानंतर कुठंही कानाकोपऱ्यांत झुरळ आढळलं कीं ते त्याच्या मिशीला धरून बंद दाराच्या फटींतून त्याला बिंबाच्या खोलींत सोडत आणि बिंबाच्या किंचाळण्याची अगदीं अधीरपणें वाट पहात बसत. असा सुरुंग लावून बसतांबसतां एके दिवशीं त्यांच्या डोक्यांत एक विचित्र कल्पना आली.

दुसरे दिवशीं ऑफिसांतून परत आल्यावर खोलीकडे जातांजातां ते बिंबाला म्हणाले, " अहो मालकीणबाई, गल्लींत एक वेडा हिंडतो आहे म्हणे, तुम्हीं जरा जपूनच रहा बरं का. "

त्या रात्रीं बिंबाच्या खोलींत रात्रभर दिवा जळत होता. आणि दुसरे दिवशीं ती घरांत वावरत होती ती एखाद्या भेदरलेल्या हरिणीप्रमाणें. नंतर दोन-तीन दिवस त्रिंबकराव नेमानं रात्रीं दीड दोन वाजून गेल्यावर घरीं परत आले. तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं त्यांना बिंबानं विचारलं,

" आजही रात्रीं तुम्हीं उशीर करणार काय ?"

" म्हणजे ? तुम्हीं कोण मला विचारणार ? मी रात्रीं वाटेल तेव्हां परत येईन. वाटेल तें करीन. " त्रिंबकराव म्हणाले.

" तुम्हीं काय वाटेल तें करा. मी विचारलं अशासाठीं कीं तो मेला वेडा आज दोन तीन दिवस मला सारखी भीति दाखवतो आहे. तेव्हां अपरात्रीं पुरुषमाणूस घरांत असलं म्हणजे बरं. "

" पण मी बोलून चालून भाडेकरू. शिवाय पुरुषाशिवाय खेटरसुद्धां न अडणाऱ्या बाईच्या तोंडां ही काय भाषा ? "

पण बिंबाचा चेहरा गोरामोरा झालेला पाहून ते म्हणाले, " बरं आज लवकर येईन खोलीवर परत. "

त्रिबकराव रात्रीं नऊदहाच्या सुमाराला आले आणि वर खोलींत जाऊन कपडे काढतात तोंच सैपाकघरात एकच हलकल्लोळ उडाल्याचा गोंधळ त्यांच्या कानीं आला. कोणी तरी सैपाकघराच्या फरशीवर काठी आपटून पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणं हेल काढून ओरडत होतं आणि वर बिंबा किंचाळत होती, " धांवा हो धावा. "

त्रिबकराव जिन्याच्या तोंडाशीं आले इतक्यांत घाबरलेली बिंबा ' अहो, अहो ' करीत जी वर आली ती तिनं ते भेटतांच त्यांच्या गळ्यात मुळीं मिठीच मारली आणि रडत म्हणाली, "प्राण गेला तरी मी आतां खालीं जाणार नाहीं. हा काय वेडा, कीं राक्षस, कीं पिशाच !" तिचा श्वास जोरजोरानं होत होता आणि सारं अंग लटलट कांपत होतं.

एकीकडे आपलं हंसू आवरीत त्रिबकराव म्हणाले, "अहो, झालं काय ?"

" अहो, आणखी व्हायचं काय ? मी तुमच्याकडे धाव घेतली नसती तर त्या मेल्यानं माझे प्राणच घेतले असते."

" त्या मेल्यानं ? कोण तो मेला ? "

" गल्लींत वेडा सुटला आहे म्हणून तुम्हीच मला सांगितलंत ना ? तो एकदम मघाशीं घरात शिरला आणि नाहीं नाहीं तें बडबडूं लागला. आधीं खालीं जा आणि त्याला हाकून काढा पाहूं."

त्रिबकराव म्हणाले, " मी कांहीं तुमच्या घराचा रखवालदार भय्या नाहीं. दोन महिन्याचं भाडं आगाऊ देणारा भाडेकरू आहे मी. आधीं माझ्या गळ्यांतले हात काढा पाहूं. "

बिंबा रडकुंडीस येऊन म्हणाली, " मी तुमच्या पाया पडतें. या वेळेस चेष्टा करूं नका. खालीं तें पिशाच्च आलं आहे त्याला आधीं घराबाहेर काढा."

" पण तुझ्या अंगातलं पिशाच्च आधीं पुरतं निघालं का सांग. माझ्या-वांचून राहाच्या हट्टानं तुला पछाडलं होतं तो तुझा हट्ट संपला का बोल ?"

" अहो संपला–संपला–संपला ! माझ्या मूर्खपणाबद्दल वाटलं तर माझ्या दोन तोंडांत द्या पण आपल्या घरांत तो इंफाळचा राजा शिरला आहे–"

" इंफाळचा राजा ?" त्रिंबकरावांनीं आश्चर्यानं विचारलं.

" बिंबा म्हणाली "अहो तो वेडा म्हणजेच इंफाळचा राजा. तो सैपाक-घरांत शिरला तो कांहीं विचित्र ललकाऱ्या देत स्टुलावर बसला आणि म्हणतो काय, 'मी इंफाळचा राजा आलो आहें. जगली लढाई संपवून आता मैदानावर उतरलों आहें.' एखाद्या सर्कशींतल्या विदूषका-सारखा त्यानं पोषाख केला आहे आणि डोक्यावर शिखरासारखी टोपी घातली आहे. आणखी सारखं ओरडतो आहे मेला कीं, 'मला मुजरा कर. माझ्यापुढें मणिपुरी नृत्य कर. वरच्या भाडेकरूला बोलाव आणि त्याला म्हणावें तबला वाजव.' "

खरं म्हणजे खूप मोठमोठ्यांदा हंसावं असं त्रिंबकरावाना वाटलं. पण राणा भीमदेवी आवाज काढून ते म्हणाले, " असं काय? बिंबा सोड मला. हातोडी काढतों आणि त्याचा बिघडलेला तबला चांगला सुरांत मिळवतो. "

त्यांनी स्वतःला बिंबाच्या मिठींतून सोडवून घेतलं आणि खाडखाड जिन्याच्या पायऱ्या उतरून ते सैपाकघरांत गेले. बिंबानं खोलींतला पलंग गांठला आणि तोंडावरून पांघरूण ओढून घेऊन ती अंथरुणांत पडली. तिला वाटलं वेड्याच्या डोक्यांत आतां त्रिंबकराव काठ्या घालतील त्या आपल्याला ऐकू येणार; परंतु तसले कांही अत्याचारी आवाज तिला ऐकू आले नाहींत.

त्रिंबकरावांना पाहतांच ' इंफाळचा राजा ' आपला रस्ता सुधारूं लागला होता. सैपाकघराचं दार लोटून घेण्याच्या आधीं इंफाळच्या राजानं हात पुढं केला आणि त्रिंबकरावांनीं मोठ्या आनंदानं त्याच्याशीं हस्तांदोलन केलं. ते कानांत कुजबुजले, " इंफाळच्या राजाचा विजय असो ! " आणि आवाज आणखी हलका करून ते म्हणाले, "दोस्त, तुझे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. पण काय रे, तूं अगदी खरोखरीचा वेडा आहेस अशी बिंबाची खरंच का समजूत झाली ? "

इंफाळचा राजा त्रिंबकरावांच्या कानांत कुजबुजला.

" अरे, झाली कीं झाल्यासारखं तिनं नाटक केलं तें एक देव जाणे. ती निमित्तालाच टेंकली होती तुझ्या गळ्यात मिठी मारून पडायला. "

त्रिंबकराव वर आले तों बिंबा पांघरूण तोंडावरून घेऊन पलंगावर त्यांना आढळली. ते म्हणाले, "अहो मालकीणबाई, घालवला हं त्या वेड्याला. आतां निमूटपणें आपल्या खोलींत परत जा कशा. "

बिंबानं पांघरूण दूर केलं आणि " अंऽहं, मी नाहीं जा." असं म्हणून ती मोटमोठ्यानं हंसूं लागली.

# बायकांनीं सिगरेट्स ओढाव्या काय ? : : ६

तसं पाहिलं तर प्रमिलेच्या मनांत शंका उत्पन्न व्हावी असं कोणतच वर्तन श्रीनिवासच्या हातून घडलं नव्हत.

श्रीनिवास लेखक होता. आपल्या कथा–कादंबऱ्यांतील पात्रं शक्य तितकीं वैचित्र्यपूर्ण आणि वास्तव वाटावीं म्हणून त्याला भेटलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या स्वभावाचा तो बारकाईनं अभ्यास करी. लेखकानं असा अभ्यास केला पाहिजे हें न कळण्याइतकी कांहीं प्रमिला असमंजस नव्हती. परंतु अभ्यासाचा विषय एखादी लाघट आणि फॅशनेबल मुलगी असली आणि अशा सुंदर विषयांत श्रीनिवास अधिक लक्ष घालूं लागला कीं मनांतल्या मनात ती साशंक होई. एकदा तिनं आपली शंका बोलून दाखवली तेव्हा श्रीनिवास हंसत हसत म्हणाला,

" लेखकाची बायको झालीस पण एवढंही कळूं नये ना तुला ? अग या तरुण मंडळींशीं जर मी फटकून वागूं लागलो तर मला त्यांच्या सुखदुःखा-विषयीं लिहितां कसं येणार ? मी साऱ्या जगापासून दूर रहावं हा तुझा आग्रह वेडेपणाचाच म्हटला पाहिजे ! हः ! "

" दूर रहा असं कधीं म्हटलं मी ? " प्रमिला घाईनं म्हणाली, " तसा आग्रह धरायला मी वेडी नाहीं. शिवाय बायको असून तुमच्यावर मी कधींच अधिकार चालविला नाहीं आजपर्यंत. पण जेव्हां दुसरीं माणसं तो चालवितात तेव्हां मला बोलल्याखेरीज राहवत नाहीं."

" दुसरीं माणसं तीं कोण ? मीनाक्षीबद्दलच बोलते आहेस ना तूं ? कमाल आहे तुझ्यापुढें. कित्ती जगाच्या मागं आहेस ! अग अलिकडे सगळ्या मुली मीनाक्षीसारख्याच वागतात. समजलीस ? ती फॅशन आहे. त्याचा भलताच अर्थ नको करूंस."

" फॅशन ? सोइस्कर आहे कीं ही फॅशन. केस काय कापते, ओट काय रंगवते, पुरुषासारख्या सिगारेटी काय ओढते. बाकी तिनं केस कापले किंवा सिगारेट ओढली तरी मला काय करायचं आहे म्हणा. पण तुमच्या दंडाला धरून आणि खांद्यावर हात ठेवून ती गप्पा मारूं लागली, कीं माझ्या तळ-पायाची आग मस्तकाला जाते. फॅशनच्या नांवाखालीं वाटेल तें करतात या शिकलेल्या बाया."

" उगीच वाटेल तें बोलूं नको. आपल्याला ज्याची पुरती माहिती नाहीं, अशा माणसाविषयीं कधीं वाईट बोलूं नये. तुला माहीत आहे मीनाक्षीचा स्वभाव ?"

" मला माहीत असायचं कारण ? तिची–माझी काय ओळख आहे ? " प्रमिला टसक्यान म्हणाली.

" मग ते ओळख करून आणि मगच बोल." असं म्हणून श्रीनिवासनं पुन्हा एकदा आरशांत बघितलं, कानशिलावरच्या केसावरून जोरजोरानं ब्रश फिरविला आणि 'जातो ग' असं ओरडून तो जिन्यापाशीं गेला. पण मागं वळून तो प्रमिलेला म्हणाला,

" मी चहाला येणार नाही बरं का, आज फार काम आहे."

" म्हणजे चहाशिवाय राहणार दुपारीं ?"

प्रमिलेनं चमकून विचारलं.

" मिळाली फुरसत तर मागवीन चहा कारखान्यांतच, पण मला अगदीं सवड नाहीं तेवढी देखील. या चार दिवसांत कादंबरी हातावेगळी केलीच पाहिजे मला."

असं बोलून तोंडानं कसल्या तरी इंग्रजी गाण्याची शीळ घालीत श्रीनिवास निघून गेला.

श्रीनिवास निघून गेल्यावर नेहमींच्या उद्योगाला न लागतां प्रमिला कितीतरी वेळ तशीच विचार करीत बसली. मीनाक्षीबद्दल ती जें बोलली त्याचा श्रीनिवासला राग आला होता हें तिनं ओळखलं होतं. कांही झालं

तरी तिनं आज दहा वर्षं त्याच्याशीं संसार केला होता. या दहा वर्षांच्या सहवासांत ती पुष्कळ गोष्टी शिकली होती. श्रीनिवासच्या रागा–लोभाचे आडाखे तिला माहीत झाले होते, किंबहुना त्याच्या लहानसहान शब्दावरून किंवा कृतीवरून त्याच्या मनांतले बरेवाईट गुप्त विचारही ती ओळखूं शकत होती. हा मनकवडेपणा पुष्कळदां तिला जाचक झाला होता. तिला अप्रिय अशा गोष्टी कळल्या होत्या. पण जाणूनबुजून तिन त्याकडे दुर्लक्ष केलं होतं. एक तर गेलीं दहा वर्षं श्रीनिवासबरोबर तिनं मोठ्या सुखांत घालविलीं होतीं. आणि दुसरं असं कीं, नाही त्या शंका काढून श्रीनिवासचं आणि आपलं जीवित गढूळ करण्याला ती तयार नव्हती. अधूनमधून त्याच्या प्रेमाची शंका येऊन ती थोडी बेचैन होई. पण त्या शंकेचा खरेखोटेपणा सिद्ध करण्याचं धाडस तिच्यानं करवत नसे. या शंकांकडे दुर्लक्ष केल्यामुळे तिचं संसारसुख अभंग राहिलं होतं, आणि यांतच तिला मोठं समाधान होतं. 'तुझा नवरा किती प्रेमळ आहे' असं जेव्हां तिच्या मैत्रीणी तिच्याजवळ बोलून दाखवीत, तेव्हां तर अधूनमधून बोचणाऱ्या या शकेचं शल्य ती पार विसरून जाई.

श्रीनिवासच्या प्रेमळ वागण्यामुळे आपल्या मनांतली शंका त्याच्यापाशीं उघड बोलून दाखविण्यास तिला धीर होत नव्हता. तिनं अशी शंका घेतलेली त्याला आवडली नसती आणि असल्या शंकाकुशंकांनीं घरांतलं शांत वातावरण बिघडलेलं तर त्याला मुळींच खपलं नसतं. त्याची आवडनिवड, त्याचा रागलोभ तिनं संभाळावा अशी त्याची अपेक्षा असे. अशी त्यानं अपेक्षा करावी यांत त्याचा कांहींच दोष नव्हता. स्वतः प्रमिलेनंच त्याला ती संवय लावली होती. तिनंच त्याला लाडावून ठेवलं होतं आणि एखाद्या लाडावलेल्या मुलानं आईची भीति पार टाकून द्यावी तशी श्रीनिवासनं तिची भीति टाकून दिली होती. आपणही कोणी तरी आहों असा त्याला एकदां स्पष्ट समज द्यावा, असं तिला फार वाटे. आपल्या मनांत कित्येकदां जीं असंतोषाचीं, असूयेचीं आणि संशयाचीं शल्यं टोचूं लागतात तीं त्याला अगदीं निर्भीडपणें बोलून दाखवावीं अशी तिला अनावर तळमळ लागून राही. पण मनांतली सारी खळबळ दाबून ती वरवर आनंदांत राही. आपली शंका बोलून दाखविण्यांत कमीपणा आहे असं

तिला वाटे. शिवाय त्याच्यावर मनांतल्या मनांत ती जो आरोप करीत होती तो सिद्ध करण्याइतपत पुरावा तिच्याजवळ होता कुठें ?

तिची आणि मीनाक्षीची धड ओळखसुद्धां नव्हती. आपल्या शंकेचा खरेखोटेपणा पडताळून पाहायचा असेल तर आपण मीनाक्षीची ओळख करून घेतली पाहिजे अशी कल्पना तिच्या मनांत आली. एवढी साधी गोष्ट आपल्याला यापूर्वींच कशी सुचली नाहीं याचं तिला नवल वाटलं. आज सावासारखी दिसणारी मीनाक्षी उद्या सवत कशावरून होणार नाहीं ? त्या दृष्टीनं मीनाक्षी तिची शत्रू होती. युद्धाचा रंग दिसूं लागतांच राष्ट्रं एकमेकांचं सामर्थ्य अजमावतात. शत्रूची तयारी कितपत आहे, त्याच्यापाशीं दारुगोळा किती आहे, त्यानं मोर्चे कुठे कुठे बांधले आहेत आणि तो युद्धासाठीं कोणकोणत्या नवीन अस्त्रांचा उपयोग करणार आहे, याची बित्तंबातमी तीं काढीत असतात. प्रमिलेला आपल्या शत्रूची सारी माहिती अगदीं सोप्या रीतीनं मिळण्यासारखी होती. ती चटकन् उठली. कागदपेन्सील घेऊन तिनं चार ओळी खरडल्या आणि गड्याकरवीं तें पाकीट मीनाक्षीच्या घरीं धाडून दिलं.

' मी चार वाजतां चहाला येईन. '–असं जेव्हां मीनाक्षीनं उलट उत्तर धाडलं तेव्हां प्रमिलेच्या पोटात धडकी भरली. क्षणभर तिला वाटलं आपण उगीचच या फंदांत पडलों. आतां मीनाक्षी चार वाजतां आली म्हणजे तिच्याशी बोलायचं कसं, वागायचं कसं, चहाला काय द्यायच वगैरे विचारांनीं प्रमिला गडबडून गेली. मीनाक्षीसारख्या फॅशनेबल बाईचं आगतस्वागत करणं आपल्याला कितपत जमेल याची तिला शंका वाटूं लागली. मीनाक्षीला आपली टर उडविण्याची संधि मात्र आपण देऊन बसलों अशा विचारान तिला पश्चात्ताप झाला. परंतु ती आमंत्रण देऊन बसली होती. प्रेमाच्या सामन्यांत माघार घेणं स्त्रीला अपमानास्पद वाटतं. कांही झालं तरी सामना लढवायचा अशा ईर्षेनं प्रमिला उठली आणि आपलं साड्यांचं कपाट धुंडाळूं लागली.

श्रीनिवासच्या आग्रहासाठीं तिनं कितीतरी रंगीबेरंगी अगदीं अलिकडल्या पद्धतीचीं पातळं घेतलीं होतीं. ती कधीं नेसत नसे, पण केवळ त्याची हौस म्हणून चारदोन पांचशारी साड्याही तिनं घेतल्या होत्या, आणि मोठ्या गळ्याचीं

पोलकीं शिवलीं होतीं. पण आपण असा एखाद्या छचोर पोरीसारखा पोषाख करावा हें तिच्या मनाला पटेना शिवाय फॅशनच्या बाबतींत प्रमिलेला मीनाक्षी-पुढें हारच खावी लागली असती. मीनाक्षीला लाजवायचं असेल, तिच्या मनावर आपली छाप पाडायची असेल तर आपण अगदीं निराळ्या तऱ्हेन पोषाख केला पाहिजे, निराळ्या तऱ्हेनं वागलं पाहिजे, किंबहुना फराळासाटीं जे पदार्थ करायचे तेसुद्धा अगदीं निराळे असं मनांत येऊन प्रमिलेनं कपाटाचा खालचा खण खसकन् उघडला. त्यातलं कोणीतरी लग्नात अहेर म्हणून केलेल जरीकाठी काळं लुगडं काढलं, जरीकाठाचा आणि आत जरीच्या काजू भरलेला बनारसी खणाचा ब्लाऊज काढला, आणि मग कसलीतरी आठवण होऊन तिनं आपली दागिन्याची चंदनाची पेटी उघडली. भटाच वर्म जानव्यांत तसं बायकांचं वर्म मंगळसूत्रात असतं कीं काय कुणाला माहीत ! जानव्याची ब्रम्हगांठ दाखवितांच भुत पळून जातात म्हणे तसं मंगळसूत्र दाखवितांच मीनाक्षीसारख्या बायका पळून गेल्या पाहिजेत असा विचार मनांत येऊन प्रमिला हंसली देखील. पण पेटीतल मंगळसूत्र फार दिवसांनीं पुन्हा गळ्यांत बांधतांना तिच्या मनांत आलं, 'श्रीनिवास माझा आहे. हें एवढं शस्त्र माझ्या-पाशी असताना काय बिशाद त्याला कोणी माझ्यापासून हिरावून नेईल...'

परंतु चार वाजता जेव्हां मीनाक्षी तिच्या दारात उभी राहिली तेव्हां तिला पाहताच प्रमिलेच्या या आत्मविश्वासाला मोटाच धक्का बसला. एक-मेकांना अचानक भेटलेलीं दोन मांजरं आपण शत्रू आहों कीं मित्र हें ठर-विण्यासाटीं ज्या विवक्षित तऱ्हेनं एकमेकांकडे टवकारून पाहतात त्याप्रमाणें त्या दोघी क्षणभर एकमेकांकडे पहात राहिल्या. मॅकलीन टूथ पेस्टच्या जाहि-रातीवरील बाईप्रमाणें मीनाक्षी हंसत होती. पण तिच्या नजरेंतील ईर्षेची चमक प्रमिलेला अगदीं स्पष्ट दिसली.

प्रमिलेनं दाखविलेल्या कोचांत अलगद अंग टाकून मीनाक्षीनं आपल्या धनुष्याकृती भुंवया वर चढविल्या, ओटाचा चंबू करून श्वास सोडला आणि मनीबॅग उघडून एक लांब नाज़ूक सिगरेट काढली, सिगरेट ओटांमध्यें ठेवीत किंचित् बोबडे उच्चार करीत तिनं प्रमिलेला विचारलं, " हरकत नाहीं ना ?"

प्रमिला दुबळेपणानं हंसली, मीनाक्षीच्या धूम्रपानानं ती थोडी गोंधळून गेली होती. पण आपण गोंधळून जाण्यात आपला केवढा कमीपणा आहे हें लक्षांत येऊन ती एकदम सावध झाली. मीनाक्षीला कांहीतरी खरमरीत बोलून आपला गोंधळ आपण लपवला पाहिजे अशा विचारानं तिनं प्रश्न केला.

" हरकत कसली ? पण रागावणार नसाल तर एक विचारूं का ? बायकांनीं सिगरेट ओढणं थोड चमत्कारिक दिसतं, नाहीं ?"

यावर मीनाक्षी मोठ्यानं हंसली. 'किती मूर्ख आहां हो तुम्हीं ' असंच जणूं तिला म्हणायच होतं. पण मग हसूं आवरून किलकिले डोळे करून प्रमिलेला निरखून पहात ती म्हणाली,

" मग माझ्याविषयीं तुमचं अगदीं वाईट मत झालं असेल, नाहीं ?"

प्रमिला पुन्हा एकदां गोंधळली. मीनाक्षीच्या प्रश्नाला उत्तर न देतां ती म्हणाली, " जुन्या चालीरीती अगदींच सोडूं नयेत असं मला वाटतं. नाहीं तरी अलीकडच्या नवमतवादी लोकांना देवाची, धर्माची, फार काय लग्नाची देखील चाड उरली नाही. लग्नच त्याना मुळी मान्य नाही. मग त्याच्या पावित्र्याची गोष्ट तर बोलायलाच नको."

" भ्रमांत आहा तुम्ही प्रमिलाबाई. लग्न पावित्र्य, देव, धर्म हा नुसता शब्दांचा सनातनी बाजार आहे आणि या बाजारात जितका 'काळा बाजार' चालतो तितका सरकारी अन्नखात्यातदेखील चालत नसेल. अशा पोकळ शब्दावर जगायला आम्ही नवमतवादी स्त्री-पुरुष तयार नसतो. आंधळ्या श्रद्धेपेक्षां डोळस बुद्धीनंच आम्ही विचार करतो—"

" बुद्धीच नांव कशाला घेतां ? मन मानेल तसं नवमतवादी वागतात, त्यांना बंधनं नको–"

" होय. नवमतवाद्यांना मार्गदर्शक बंधनांची खरोखरीच जरूर नाहीं. श्रद्धा लंगडी म्हणून सनातन्यांना रूढीचं बंधन हवं. लग्नसंस्था अपुरी म्हणून तेंही बंधन मानलं पाहिजे. बुद्धीला श्रद्धेची आणि प्रेमाला लग्नाच्या बंधनाची गरज आहे असं निदान मला तरी वाटत नाहीं."

असं बोलून मीनाक्षी पुढें वांकली आणि टेबलावरच्या ट्रेमध्यें तिनं आपली सिगारेट चुरगळली. तिच बोलणं संपलं याची ती खूण लक्षांत येऊन प्रमिला उठली आणि 'चला आतां चहा घेऊं या' असं म्हणून आंतल्या खोली-कडे वळली.

चहाचा थाट अगदीं पेशवाई होता. एखादी युगेनिअन बाई बसेल तशी अवघडून बसत मीनाक्षीसुद्धा म्हणाली, "वाः, आज तर अगदीं पेशवाई थाट आहे." चिवड्यांतला काजूगर तोंडात टाकून तिनं मग विचारलं,

"खरंच प्रमिलाबाई, एवढ्या मोठ्या लेखकाची बायको होणं कसं काय हो वाटतं तुम्हाला?"

"एक मोठा तोटा आहे त्यांत."

"तो कोणता?"

"अहो नवरा मोठा असला कीं तो क्वचितच बायकोच्या वांट्याला येतो. लोक त्याच्या बायकोचा अधिकार विसरतात आणि त्याला अगदीं 'सार्वजनिक' करून टाकतात."

"पण 'सार्वजनिक' होणं न होणं नवऱ्याच्या हातचंच असतं कीं."

"नाहीं हो. पुष्कळदां लोक अगदीं सतावून सोडतात. आणि मग ह्यांना भीड पडते."

"पण एखाद्याचं बायकोवर खरंखुरं प्रेम असेल तर तो दुसऱ्या कोणा-चीही भीड बाळगणार नाहीं."

"हो ना. कादंबरी पुरी करायची घाई झाली कीं मग ते कोणाचीदेखील भीड बाळगत नाहींत. रात्रंदिवस लिहीत बसतात."

"आपल्या त्या छोट्या 'कारखान्यां'त ना?"

मीनाक्षीनं असावधपणें विचारलं आणि मग आपण कोणता प्रश्न केला तें लक्षांत येतांच ती निगरगट्ट मुलगी एकदम गोरीमोरी झाली. तिनं चटकन् विषय बदलला.

परंतु तिच्या बोलण्याकडे प्रमिलेचं लक्षच नव्हतं. 'आपल्या त्या छोट्या 'कारखान्या'त ना ?' या मीनाक्षीच्या प्रश्नानं तिला धक्का बसला आणि नंतर मीनाक्षीनं असं गोरंमोरं का व्हावं याचा तर्क करूं लागताच ती अधिकच अस्वस्थ झाली. वरवर ती 'हूं हूं' म्हणत होती. पण अंतर्यामीं तिचं मन निराळेच तर्क करण्यात गुंतलं होतं. श्रीनिवास आपल्या लिहिण्याच्या खोलीला 'कारखाना' म्हणतो हें या मीनाक्षीला कसं कळलं ? हें नाव तर ती दोघंच खाजगी संभाषणांत वापरत असत. 'कारखान्या' ची ती गुप्त जागाही फक्त तिलाच माहीत होती. श्रीनिवासनं अशी एखादी निराळी खोली घ्यावी आणि तिच्याबद्दल एवढी गुप्तता राखावी हें तिला पसंत नव्हतं. पण लेखकाला एकांताची किती गरज असते ते श्रीनिवासनं तिला पटवून दिलं होतं आणि अखेर तीही कबूल झाली होती. श्रीनिवास तिला म्हणाला होता,

'मला निवांतपणं काम करतां यावं म्हणून मी एखादी चांगली जागा पाहणार आहें. जागा मिळाली तर तिसऱ्या कोणाला तिचा पत्ता लागूं देणार नाहीं मी—फक्त तूं आणि मी—दोघांपुरतंच हें गुपित राखलं पाहिजे.'

श्रीनिवासनं अशी एक खोली मिळवली तेव्हां ती स्वतः तेथें गेली होती आणि त्याचं सामान लावण्यांत तिनं मदतही केली होती. त्यानंतर मात्र ती त्या खोलीकडे कधीं फिरकली नव्हती. श्रीनिवासनंही तिला कधीं आग्रह केला नव्हता. पण आतां मीनाक्षीनं जेव्हां त्या खोलीचा उल्लेख केला तेव्हां तिचं मन एकदम बिथरून गेलं. श्रीनिवासच्या खोलीचा उल्लेख ज्या अर्थी मीनाक्षीनं केला त्या अर्थीं ती खोली तिला माहीत होती. श्रीनिवास तास न् तास तेथें काम करीत बसतो हेंही तिला माहीत होतं !

मीनाक्षी इतकी गोरीमोरी झाली व तिनं चटकन् विषय बदलला तें उगीच नव्हे ! आपल्याला कळूं नये असं कोणतं तरी गुपित ती लपवूं पहात होती !

मीनाक्षी निरोप घेऊं लागली तशी हे त्रासदायक विचार प्रमिलेनं मनावेगळे केले. मीनाक्षी म्हणत होती, 'आतां तुम्हीं एकदां माझ्या घरीं आलं पाहिजे ' प्रमिला फक्त हंसली. मीनाक्षीनं आपली अखेरची सिगरेट ' ट्रे ' मधं चुरगळली, मनीबॅगमधल्या छोट्या आरशांत बघत ओठावरून रंगाची कांडी फिरवली आणि तिनं निरोप घेतला.

नंतर कितीतरी वेळ मीनाक्षीनं चुरगळून टाकलेल्या त्या सिगारेटकडे प्रमिला खिन्न नजरेनं पहात राहिली. अर्धवट ओढून टाकलेल्या आणखी पांचसहा सिगरेटस् त्या ट्रेंत होत्या. आणि त्याच्या ओठांत धरलेल्या टोकाला मीनाक्षीच्या ओठाचा लाल रंग लागलेला होता. मीनाक्षी सिगरेट म्हणजे एक खेळच समजत होती. लहर लागेल तेव्हां आणि तितकी ओढावी आणि मग अशी राखेच्या भांड्यांत चुरगळून टाकावी. प्रमिलेच्या डोळयांत आसवं उभीं राहिलीं. तीं आसवं दुःखाचीं होतीं, कीं अपमानाच्या जाणिवेचीं होतीं तें तिचं तिलादेखील ठरवितां येईना.

घरांत चैन पडेना म्हणून प्रमिला घराबाहेर पडली. रस्त्यांत संध्याकाळची रहदारी सुरू झाली होती. लोक मोठ्या लगबगीन कुठेंतरी जात होते, कोठून तरी येत होते. ती कोठें जाणार होती ? प्रमिलेचा गळा दाटून आला घरांत चैन पडेना म्हणून ती घराबाहेर पडली होती. पण जिथं चैन पडेल, मनाचा हा असह्य भार हलका होईल अशी एक तरी जागा तिला होती काय ? आणि मग श्रीनिवासच्या खोलीवर जावं अन् आपल्या मनांत आलेली शंका फेडून घ्यावी असा विचार तिच्या मनांत एकदम आला. ' मी श्रीनिवासची बायको आहें. मला त्या खोलीवर जाण्याचा हक्कच आहे. मी कां जाऊं नये ? माझ्या येण्यानं त्याच्या कामांत व्यत्यय येईल आणि तें त्याला मुळींच खपणार नाहीं. पण सदान्‌कदा त्याचीच आवड मी कां संभाळावी? मलाही मन आहे. यापुढें माझ्या मनाची तळमळ मी दडपूं शकत नाहीं. माझं मन मी ठार करूं शकत नाहीं. इतके दिवस तो सांगेल ती पूर्व दिशा मी मानली. तो सांगेल तसलों पातळ नेसलें, तो सांगेल त्या माणसाशीं मनांत नसताना गोडीगुलाबीनें वागलें आणि मनांतली टोचणी बाजूला सारून, प्रसंगों डोळ्यावर कातडं

ओढून माझ्या संसारसुखांत कांहींच वैगुण्य नाहीं अशी मनाची समजूत घातली. पण यापुढं माझ्या मनाला मी फसवणार नाहीं. श्रीनिवासचं प्रेम खरं आहे कीं, मृगजळासारखा तो एक भ्रम आहे याचा तलास मला लावलाच पाहिजे......'

तिच्या मनांतल्या असंतोषाची ठिणगी अशी भडकली आणि त्या आवेगांत श्रीनिवासच्या खोलीबाहेर ती केव्हां येऊन ऊभी राहिली तें तिला समजलं नाहीं. दाराची कडी वाजविण्याचा धीर तिच्यानं होईना. या ठिकाणीं मीनाक्षीच आपल्या दृष्टीस पडून आपली शंका खरी तर ठरणार नाहीं ना या भीतीनं ती व्याकुळ झाली. दार ढकलण्यासाठीं तिनं हात उचलला तो थरथर कांपत होता आणि तिची छाती धडधडत होती.

श्रीनिवास आंत एकटाच असेल काय ? का...?

सुखदुःखामधलं अंतर एवढ्या क्षुल्लक गोष्टींनीं ठरत असतं हें तिला त्या क्षणीं समजलं.

हलकेच दार उघडून ती खोलींत गेली आणि तिनं खोलीभर भिरत्या नजरेनं पाहिलं. खोलींत दुसरं कोणीच नव्हतं ! मग तिची नजर टेबलाकडे वळली. श्रीनिवास लिहिण्यांत गुंतला होता,

श्रीनिवास एकटा होता, आणि त्याला एकटा पाहून तिच्या मनांतल्या साऱ्या शंकाकुशंका आतां पळून पहात होत्या. ज्या आवेगान ती खोलीवर आली होती तो आवेगच असा नाहींसा झाल्यामुळें ती थोडी गोंधळली होती.

तिची चाहूल लागतांच मान वर करून श्रीनिवासनं तिच्याकडे पाहिलं. तिला आलेली पाहून त्याला प्रथम आश्चर्य वाटलं. मग राग आला. कपाळाला आंठ्या घालून त्यानं विचारलं,

“ कां आलीस ? ”

काय उत्तर द्यावं तें तिला सुचेना. जो हेतु धरून ती त्याच्या खोलीकडे निघाली होती, त्या हेतूची त्याला खोलींत एकटा पाहिल्यावर आता तिला शरम वाटूं लागली होती. स्त्रियांच्या हातीं दोन रामबाण शस्त्रं असतात. एक रागाचं आणि दुसरं अनुरागाचं. प्रमिलेच रागाचं अस्त्र एकदम गळून पडलं होतं. त्याच्या कादंबरींतल्या एका नायिकेप्रमाणें खालीं मान घालून वर पहात ती लटक्या रागांत म्हणाली,

" तुम्हांला भेटावंसं वाटलं म्हणून. आम्हीं येऊं नये वाटतं इथं ? "

" कां येऊं नये माहीत आहे तुला. माझ्या कामांत व्यत्यय येतो. "

" एखादवेळीं आला व्यत्यय म्हणून कुठं बिघडलं? आम्ही आलं म्हणजे तेवढा व्यत्यय येतो होय? "

आतां मात्र श्रीनिवास खरोखरच रागावला.

" आली आहेस खरी. तेव्हां सरळ काय सांगायचं तें सांगून टाक बघूं. "

" मी कधीं म्हटलं मला कांहीं सांगायचं आहे म्हणून ? मी आपली उगीच आलें. "

" उगीच बरी येशील. तूं कां आलीस मी ओळखलं. माझ्याविषयीं भलत्या शंका घेणं शोभत नाहीं तुला प्रमिले. "

प्रमिलेला काय बोलावं तें सुचेना. पुराव्याच्या अभावीं गुन्हेगार शिरसलामत सुटावा तसा श्रीनिवास सुटला होता म्हणायचा. पण पुराव्याच्या अभावीं असं ती कसं म्हणत होती ? श्रीनिवासला मुद्देमालासकट पकडण्याच्या हेतूनं ती त्याच्या खोलीवर आली होती, पण तो तिचा हेतु मूर्खपणाचा ठरला होता. तिची शंका निराधार ठरली होती आणि म्हणून आतां तिलाच एखाद्या अपराध्याप्रमाणें खालीं मान घालून उभं राहणं भाग होतं.

तिला तशी उभी राहिलेली पाहून श्रीनिवास उठला आणि तिच्याजवळ गेला. तिच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवीत तो तिला म्हणाला, " प्रमिले, इतकीं वर्षं माझ्याबरोबर काढलींस, पण तुला अक्कल कधीं ग येणार ? "

सूर्यकिरणांनीं धुकं वितळून जावं त्याप्रमाणें श्रीनिवासच्या त्या स्पर्शानं प्रमिलेच्या अंतःकरणांतील संशयाची छाया पार नाहींशी झाली. त्या एका क्षणांत श्रीनिवासच्या सहवासांत घालविलेलीं दहा वर्षे तिला अगदीं स्पष्ट आठवलीं. या दहा वर्षांत तिला दुःख व्हावं असं एकही कृत्य त्याच्या हातून घडलं नव्हतं, एकही कठोर शब्द त्याच्या तोंडावाटे बाहेर पडला नव्हता. तिच्या मैत्रिणीदेखील उघड उघड तिच्या सुखाचा हेवा करीत. इतकं असूनही केवळ एका छचोर मुलीवरून तिनं त्याच्या प्रेमाची शंका घेतली होती. तरी बरं, तिच्या तोंडून कांही भलते शब्द बाहेर पडले नव्हते.

प्रमिलेला पश्चात्ताप झाला—आपण विनाकारण शंका घेतली म्हणून. श्रीनिवासच्या मानी मनाला केवढी जखम झाली असेल हें मनांत येऊन तिला वाईट वाटलं. आपण यापुढें अशी शंका बाळगतां कामा नये, आणि वेड्या-सारखी त्याच्यावर पाळतही ठेवतां कामा नये असा तिनं मनाशीं दृढनिश्चय केला. त्याच्या छातीशीं बिलगून तिनं विचारलं,

" माझ्यावर रागावणार नाहीं ना ? "

" मी फार रागावलों आहें तुझ्यावर. कित्येकदां तूं अगदीं विनाकारण माझा छळ करतेस. अशी शंका पुन्हा कधीं घेणार नाहीं असं तूं वचन दिल्या-शिवाय तुझ्यावरचा माझा राग जायचा नाहीं. "

" मी खरंच पुन्हा असं वागायची नाहीं. "

" असं शहाणपणानं वागायला शीक थोडी. "—असं म्हणून श्री-निवासनं तिच्या गालावर हलकेच चापट मारली. " आतां यानंतर मला काय सुचतं आहे म्हणा लिहायला. घरीं जाऊं आणि चहा घेऊं. असा फक्कड चहा बनव कीं ज्याचं नांव तें. "

श्रीनिवास तिच्यापासून दूर झाला. त्यानं तिला कोचावर बसायची खूण केली आणि ' आलोंच हं पांच मिनिटांत ' असा उद्गार काढून तो आंतल्या बाथरूमकडे वळला. जातां जातां ' बिल पोचलं ना ? ' असं निर्भीड आणि रोखठोक आवाजांत एखाद्या वाण्याला बजावावं तसं त्यानं तिला विचारलं, " पटली ना तुझी खात्री ? आतां नाहीं ना उरली कांही तक्रार ? "

"नाहीं—नाहीं" असं ती मोठ्यानं म्हणाली आणि त्याच्याकडे किंचित् रोषाच्या, किंचित् कौतुकाच्या नजरेनं पहात ती कोचाकडे वळली. बसतां बसतां चहाच्या टेबलाला तिचा खसकन धक्का लागला.

टेबलावरून कांही तरी पडल्याचा खळकन् आवाज झाला. ती वांकली आणि जं तिच्या दृष्टीस पडलं तें पाहून तिला प्रथम आश्चर्याचा आणि मग दुःखाचा केवढा तरी धक्का बसला. अति रक्तस्रावानं चेहरा फिका आणि कळाहीन दिसावा तसा तिचा चेहरा दिसूं लागला.

टेबलावरचा काचेचा 'ट्रे' फुटला होता आणि विखुरलेल्या राखेंत अर्धवट ओढून टाकलेल्या किती तरी लांब, नाजुक सिगरेट्स पडल्या होत्या ! त्यांच्या ओठांत धरलेल्या बाजूवर लाल रंग लागलेला होता ! ज्या ओठांनी ओढल्या ते ओठ रंगविलेले असले पाहिजेत !

'काय झालं ग ?' असं बाथरूम मधून श्रीनिवासनं तिला विचारलं तें प्रमिलेला ऐकूं आलं नाहीं. त्या सिगरेट्च्या तुकड्याकडे ती अत्यंत खिन्न नजरेनं पहात राहिली.

# जावें त्याच्या वंशा— : : ७

मुंबईत आम्ही ज्या ठिकाणीं बिऱ्हाड थाटलं होतं तें ठिकाण 'दाऊद-अल्लीची चाळ' या नावानं ओळखलं जात असे. दाऊदअल्ली कर्जबाजारी झाला होता. त्यामुळें काप जाऊन फक्त भोकं रहावीं तशीच इमारत साव-काराच्या घशांत जाऊन 'दाऊदअल्लीची चाळ' हें नांव मात्र शिल्लक राहिलं होतं. नाहीं म्हणायला चाळीच्या मागच्या बाजूची एक पडकी शेड किंवा आडोशाची जागा दाऊदअल्लीकडे उरली होती. याच जागेंत आम्ही चौघेजण रहात होतों.

या जागेचं वर्णन तें मी काय करणार ? जागा हवाशीर होती. उजेड भरपूर होता. कारण दारं किंवा खिडक्या अजिबातच नव्हत्या. आमच्या बिऱ्हाडाला पुढच दार देखील नव्हतं. बिऱ्हाडात प्रवेश करायचा तो पुढच्या रस्त्याकडल्या बाजूस असलेल्या एका न्हाव्याच्या मोडकळीस आलेल्या दुकानातून करावा लागे. निवारा म्हणून डोक्यावर पत्र्याचं टेंपररी छप्पर सुद्धा उचलून न्यायला दाऊदअल्लीचा सावकार टपलेला असे. प्रथम प्रथम रोज रात्रीं दाऊदअल्ली छपरावर बसलेला पाहून मी मनाशीं तर्क केला होता कीं हा माणूस कर्जबाजारी असला तरी 'पत्र्यावरचा' रसिक आहे. नतर कधीं मधीं दिवसा जेव्हा छपराला लोंबकळताना तो मला दिसला तेव्हा मी त्याला दारूबाज ठरविलं होत. पण माझे दोन्ही तर्क चुकले होते. दाऊद रसिक नव्हता. नशेबाजी करण्याइतपत त्याच्या खिशात पैसेहि कधीं नसत. तो व्यवहारी होता. सावकाराच्या तावडींतून अखेरचे चार पत्रे तरी वाचवावे म्हणून तो सदा पत्र्यावर बसून राही, आणि बसून कटाळा आला कीं लोंबकळे.

आमच्या बिऱ्हाडाची ही अवस्था. मग आम्ही बिऱ्हाडकरू कोणत्या प्रकारचे असूं तें काय सांगायला पाहिजे. त्या भागांत 'खालच्या थरा'ची वस्ती असे. आम्हीही त्या थरांतलेच होतों, एवढ सांगितलं म्हणजे मग आमच्या दारिद्र्याचं, गलिच्छपणाचं जीवनकलहाचं वर्णन करायला नको. वर्णन करतांना देखील लाज वाटावी, अशी आमची राहणी होती. आमच्यांतले बहुतेक सारे चोर खिसेकापू, पण वेळीं अवेळीं केव्हाहि आमची झडती घेतली तर चोरीचा काय पण ताब्याचा पैसादेखील कधीं आमच्या अंगावर सापडायचा नाहीं. पुष्कळदा माझ्या मनात येई कीं अशा खडतर दारिद्र्यांत आम्हीं आजवर दिवस काढले कसे ? जिवंत राहिलो कसे ? उद्यांचा दिवस कसा जाईल असा चिमटा जिवाला लागला असताना कालचा दिवस कसा घालविला ? बाकी आमच्यासारख्यांनीं असले विचार करून फायदा काय ?

असो सांगायची मुख्य गोष्ट अशी कीं या बिऱ्हाडांत आम्हीं चौघेजण रहात असूं. आम्हां चौघांपैकीं काळेला किडकिडीत आणि केरसुणीसारख्या

मिश्या ठेवलेला माणूस म्हणजे यशवंत. नांव यशवंत असलं तरी हा अगदीं अपेशी चेहऱ्याचा माणूस. आम्ही त्याला येशा म्हणत असूं. बारीक सारीक चोऱ्या आणि शेवग्याच्या शेंगांची आमटी करण्यांत पोलीस देखील त्याचा हात धरूं शकत नसे.

आमच्यापैकीं भला गलेलठ्ठ असा जो गृहस्थ होता त्याचं नांव पिलू असं होतं. पिलूचा देह जसा प्रचंड तशी त्याची शक्तीही प्रचंड होती. बायाबापड्यांना एकीकडे गाठून त्यांच्या डबोली लांबविण्याचा पिलूचा आवडता धंदा होता. तसेंच मारामारी करण्याचं देखील त्याला वेड होतं. कधीं कधीं नशा करून पिलू बिन्हार्डा आला कीं स्वतःलाच मारपीट करीत असे. स्वतःचे पैसे देखील असते तर त्यानं चोरले असते. पण स्वारी पडली कफल्लक !

आमच्यापैकीं तिसऱ्या गृहस्थाचं नांव गुरुजी होतं. नांव त्याच्या आईनं काय ठेवलं असेल बाप जाणे. परंतु आम्ही त्याला गुरुजी म्हणत असूं. कारण धंदा चोरट्याचा आणि वेष बावळटाचा असला तरी त्यांचा चेहरा एखाद्या साधुपुरुपासारखा होता.

आणि चौथा मी. माझ्याबद्दल मीच काय सांगूं ? माझ्या दोस्तामध्यं आणि माझ्यामधं कांही फरक नव्हता. तसेच फाटके कपडे, तशीच गबाळी वागणूक आणि तोच धंदा. आम्ही चौघांनीं मिळून कितीतरी घरं फोडलीं होतीं. खिसे कापले होते. डबोली लुबाडलीं होतीं. आम्ही भांडत असूं. शिव्यागाळी करीत असूं तरीही आमची दोस्ती शाबूत राहिली होती. पुढेही कदाचित् राहिली असती. पण असा एक प्रसंग घडला कीं त्यामुळं दाऊद-अल्लीची चाळ सोडणं आम्हा चौघानांही भाग पडल. एरवीं माझ्यांत आणि माझ्या दोस्तांत कांही फरक नव्हता. एकच होता तो असा कीं कोकणांत माझ्या मालकीची थोडी जमीन आणि थोडी सावकारी असल्यामुळे दाऊदअल्लीच्या छपराखालीं राहण्याची मला तशी गरज नव्हती. मी राहिलों होतों तें फक्त एका कारणासाठीं, खालच्या थरांतील लोकांवर मला एक वास्तवपूर्ण कादंबरी लिहायची होती. वेश्याजीवनावर कादंबरी लिहिण्यासाठी म्हणून एका पाश्चात्य

लेखिकेनं तें जीवन पत्करलं. देहविक्रय केला असं मी ऐकलं होतं. खालच्या थरांत मिसळल्याशिवाय त्या समाजाचीं सुखदुःखं तुम्हाला रंगवितां येणार नाहींत. जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे, असं माझे शत्रू, टीकाकार आणि वाचक माझ्या कानीं कपाळीं ओरडतच होते. तेव्हा 'खालच्या थरात' जाऊन तें जीवन जगल्यावर कादंबरी लिहावयाची असा मी निश्चय केला आणि एके दिवशीं अल्लाऊदअल्लीच्या चाळींत वेशा, पिलू आणि गुरुजी या मुरब्यांच्या कळपांत शिरलों.

तो प्रसंग घडला नसता तर कदाचित् आमची फाटाफूट पडली नसती. आणि नतर ज्या आश्चर्यकारक गोष्टी उजेडात आल्या त्या अंधारातच राहिल्या असत्या. परंतु योगायोग तसाच होता म्हणूनच कीं काय मी एके दिवशीं भरदुपारीं बिऱ्हाडाबाहेर पडलों. हेतु मनांत असा कीं कुठल्याही बसच्या किंवा ट्रॅमच्या नाक्यावर उभं रहावं आणि कांही लग्गा साधला तर पहावा. जवळच्याच नाक्यावर गर्दी जमली होती. मी गर्दीत शिरलों. लोकांचे चेहरे पाहण्यापेक्षा त्यांच्या खिशाकडे किंवा मनगटाकडे मी प्रथम पहात असे. माझ्या समोरच एक नाजुक हात मला दिसला. हात दिसला म्हणण्यापेक्षा त्या हातांतल्या मनगटावर सोन्याच्या साखळीनं बांधलेलं उंची घड्याळ दिसलं. मी शिताफीनं मनगटाभोंवतालच्या साखळीची कळ दाबली आणि घड्याळ काढून घेऊन मागच्या मागे निसटूं लागलों. पण इतक्यांत माझा कोट धरून मला कोणी खेचलं. मी पाहतां तो तीच घड्याळवाली मुलगी. स्त्रियांच्या पकडीत सांपडलेला चोर देखील सुटणं अशक्य असतं. हां हां म्हणता गर्दी जमली. पोलिस आले आणि आमची वरात पोलिस नाक्यावर गेली.

घड्याळाची मालकीण मला बदमाष हरामखोर, चोर अशा संभावित शिव्या मोजीत होती. घड्याळाच्या चोरीपेक्षां माझ्यासारख्या भणंग चोरट्यानं आपला हात धरावा याच गोष्टीचा तिला संताप आला असावा. पोलीस तर शिव्याबरोबर मला गुद्दहि देत होते. मी सांगितलं, " माझ्याजवळ घड्याळ नाहीं चोरीचा आरोप उगाच कां घालतां. फार तर या बाईचा हात धरल्याबद्दल विनयभंगाचा गुन्हा कबूल करतों. "

" शट अप " असें ओरडत फौजदारानीं माझ्या खिशांत हात घातला तो आरपार बाहेर पडला. माझ्या कपड्यात त्याना घड्याळ कुठलं मिळणार ? परंतु ते फाटके कपडे धुंडाळून निराशा झाल्यामुळे त्याच्या रागाचा मात्र पारा एकदम वर चढला आणि उजव्या हाताने माझ्या डोक्यावरच्या जटा पकडून डाव्या बुटाने माझ्या बरगडीवर लाथ मारीत ते ओरडले—

पण तोंडातली शिवी पुरी न देताच ते चकित होऊन थांबले. माझ्या केसाच्या झुलपात अडकलेली बोटं त्यानी खसकन् ओढली, आणि मी केसात लपविलेलं घड्याळ बाहेर काढलं.

पोलीस माझ्या दंडांना काढण्या बांधू लागले तेव्हा मात्र मला राहवेना. मी फौजदारसाहेबाना म्हणालो, ' साहेब मी चोर नाही. मी एक नामांकित साहित्यिक आहे. माझं नाव–'

माझं नाव ऐकताच ती घड्याळवाली मुलगी; तो फौजदार आणि ते पोलीसही चपापले पण त्या मुलीला काही शंका येऊन ती म्हणाली,

" पण मी तुमचा फोटो पाहिला आहे तो किती निराळा आहे. आणि तुम्ही तर–"

" बरोबर आहे " फौजदारसाहेब म्हणाले, "वर्तमानपत्रांत किंवा तुमच्या पुस्तकावर जे तुमचे म्हणून फोटो येतात ते काहीं तुमच्या या खापरतोंडासारखे नाहींत. अरे आवळा रे काढण्या. हा नुसता चोरच नाहीं. तोतयाही आहे. मोठ्या लेखकाच्या नावावर निसटू पहातो आहे हा बदमाष. "

" फौजदारसाहेब, " मी गयावया करून म्हणालो, " अहो माझा आहे, तसा फोटो छापला नाहीं तर माझीं पुस्तकं खपायचीं कशीं ? म्हणून फोटो सुधारून छापतों. मी मीच आहे हो. माझी वाटेल ती परीक्षा घ्या. माझा संदेश घ्या. मला व्याख्यान द्यायला सांगा. लघुकथा लिहून घ्या, लघुनिबंध लिहून घ्या. रूपककथा लिहायला सांगा. मी साहित्यिक आहे, चोर नाहीं. खालच्या

थरावर कादंबरी लिहिण्यासाठीं म्हणून मी खालच्या थरात मिसळलो आहे. वेश्याजीवनावर कादंबरी लिहिण्यासाठीं एक कुलीन लेखिका वेश्या झाली. तसाच दलितवर्गासंबंधीं, पतितासंबंधीं, कादंबरी लिहिण्यासाठीं टीकाकाराच्या आग्रहाला बळी पडून मी पतित झालो आहें. खालच्या थरात मिसळलों आहे. चोराचं जिणं कंठतो आहे-माझा उदात्त हेतु लक्षांत घ्या-"

"बस करा बडबड" फौजदार ओरडले, "देशभक्ताप्रमाणें तुम्ही साहित्यिक देखील आता दरोडे घालूं लागलात काय? असे उदात्त हेतु आम्ही लक्षात घेऊं लागलो तर सगळेच गुन्हेगार निरपराध ठरतील. शिवाय साहित्य-सेवेसाठीं चोरी केलीत तसा खडी फोडायचा देखील अनुभव हवा कीं तुम्हाला."

असं म्हणून फौजदारानीं मला एक धक्का दिला. साहित्यिकाला धक्के मारण्याची संधी मिळाल्याचा पुरा फायदा तो घेत होता. इतक्यांत ती घड्याळ-वाली मुलगी मध्ये आली आणि फौजदाराला म्हणाली,

"फौजदारसाहेब, हात मागे घ्या. तेच ते हे अशी माझी खात्री पटली आहे. तुम्हा पुरुषापेक्षां आम्ही स्त्रिया साहित्यिकाना जवळून ओळखतों. यांच्या-वरचा चोरीचा आरोप परत घ्यायला मी तयार आहें. मात्र एका अटीवर."

"ती कोणती अट?" मी घाबरून विचारलं. लग्नविग्न करा म्हणाली तर सरळ चोरी कबूल करून तुरूंगवास पत्करून खडी फोडायची माझी तयारी होती.

"खालच्या थरावर जी कादंबरी हे लिहितील ती त्यांनीं मला अर्पण करावी." ती मुलगी म्हणाली.

"ठरलं" मी एकदम ओरडलों. तिनं चोरीचा आरोप आणि घड्याळ परत घेतलं आणि फौजदार साहेबांना आगामी कादंबरीची एक प्रत पाठवि-ण्याच कबूल करून मी ठाण्याबाहेर पडलों.

बिऱ्हाडी पोचलों तेव्हां दोस्तांपैकीं घरीं कोणीच नव्हतं. ते एका अर्थी बरेंच होतं. फौजदारानं ज्या ठिकाणीं लाथा मारल्या होत्या ती जागा सारखी

टकणत होती. ती चोळण्यासाठी आणि झाल्या प्रकारावर विचार करण्यासाठी मला एकांतवास हवाच होता.

" तुम्ही साहित्यिकही दरोडे घालूं लागलांत ना ? " हा त्या फौजदाराचा प्रश्न आठवतांच माझ्या मनात एक भयंकर शंका उत्पन्न झाली आणि विचारासरशी ती वळावत चालली. माझ्यासारखे आणखी दरवडेखोराचा बुरखा घेतलेले साहित्यिक असतील कीं काय ? असले तर आपल्या दोस्तापैकीं तर कोणी नसतील ? येश्या, पिलू, गुरुजी हे मूळचे साहित्यिक तर नव्हेत ?

ही शंका जशी दृढ होत चालली तसा मला पुष्कळच गोष्टींचा उलगडा झाला.

येश्या सारखा विड्या कां ओढतो ? आणि विड्या ओढतांना पत्र्यांकडे का पाहतो ? खात्रीनं तो कोणी लेखकच असला पाहिजे. त्याशिवाय कां त्यानं उंटछाप निळ्या शाईच्या बाटल्या आणि पेन्सीलीचा जुडगा परवा चोरला ? चोर फार तर दुकानातला गल्ला चोरील. शाई पेन्सीली चोरणारा, विड्या ओढणारा, शेवग्याच्या शेंगांची आमटी भुरकणारा, खुनशी डोळ्याचा आणि केरसुणी मिशाचा चोर असणंच शक्य नाही.

तसाच तो पिल्या. अशी दारू झोकणं आणि अशा इरसाल शिव्या मोजणं चोराच्या शक्तीपलिकडचं होतं. अशा शिव्या एक साहित्यिकच देऊं शकेल! शिवाय चोरीची फाऊंटनपेन विकून पैसे करण्याऐवजीं तो खुशाल खिशाला लावून ठेवत असे. आणि त्यानं परवां तें स्टेशनरी दुकान फोडलं तेव्हां त्यानं एक कागदाचं बंडलही उचलून आणलं होतं. तं कां त्याचं उत्तर आतां मला मिळालं.

तो भोंदू गुरुजी देखील त्यांतलाच असला पाहिजे. त्याशिवाय संभावित नसतांना संभावित दिसण्याची कला त्याला कशी बरं साधली ? पुष्कळदा तो कांहींतरी स्वतःशीच पुटपुटत असतो, रडत असतो, हसत असतो, तें काय तो साहित्यिक असल्याखेरीज ?

माझी शंका बरोबर होती. येश्या, पिल्या, गुरुजी हे तिघेही दरवडेखोराचा बुरखा पांघरलेले साहित्यिक होते. यांनी लेखनाचा पेशा कां बरं सोडला? यांची पुस्तकं खपेनाशी झालीं म्हणून? पण लेखकाविषयीं इतकी नीच शंका घेतल्याबद्दल मी स्वतःला चिमटा घेतला. ही शंका काढून टाकून मी माझी समजूत घातली कीं आपल्याप्रमाणेंच हे तिघेही खालच्या थरावर कादंबरी लिहिण्यासाठीं, खालच्या थरांत मिसळले असले पाहिजेत. माझ्या मनांत पुन्हा आणखी एक दुष्ट शंका आली. आपण जसं या तिघांचं मूळ स्वरूप ओळखलं तसं या तिघांनीं आपलं बिंग ओळखलं नसेल ना? परवां मी सहज 'चोराच्या मनांत चांदणं' अशी कोटी केली तेव्हां तिघांनीही माझ्याकडे टवकारून पाहिलं. परंतु अशा कल्पना करीत बसण्यापेक्षा त्या तिघांचीं सोंग उघडकीस येण्याजोगा कांहीं पुरावा मिळतो कां पहावा असं मनांत येऊन कंबर दुखत होती तरी मी उठलों. अनायासें ते तिघेही बाहेर गेले होते. त्यांचं सामान-सुमान चीजवस्त तपासून पाहण्याला पुन्हां अशी संधी मिळाली नसती.

प्रथम येश्याचं बोचकं मी पुढें ओढलें. विड्यांचीं बंडलं, जुने सदरे, एक फाटक्या वहाणाचा जोड वगैरे सामान उपसल्यानंतर त्याखालीं फाटक्या धोतरांत बांधलेलं कागदाचं बंडल मला दिसलं. मी ते कागद चाळून पाहिले तों पहिल्याच पानावर मला 'दलितांचीं दुःखें' असा मथळा दिसला. बाकी सारीं पानं त्या दुःखाच्या वर्णनांनींच भरलेलीं होतीं. चला, मला हवा तो पुरावा सांपडला होता. येश्या अखेर साहित्यिकच ठरला होता. त्याच्या बोचक्यांतल्या एक दोन पेन्सिली मी खिशांत घातल्या आणि पिल्याची पत्र्याची ट्रंक पुढें ओढली. ट्रंकेंत वर दारूच्या बाटल्या मला दिसल्या. कांही लेखक रक्तानं लिहितात. त्याप्रमाणे हा पिल्या लेखक असलाच तर दारूनं लिहितो कीं काय अशी मला शंका आली. बाटल्याखालीं एक जाडजूड नोटबूक होतं. त्या नोटबुकावर मोठ्या अक्षरांत 'गटारगंगा' असं लिहिलं होतं. ही निखालस चोरी होती. पिल्यानं माझ्या चामडी बॅगमधले पैसे चोरले असते तर मला वाईट वाटलं नसतं. परंतु माझ्या रूपककथेचा मथळाच त्यानं असा चोरावा याचा मला मोठा धक्का बसला होता. मी गुरुजींची पेटी उघडली. पेटींत काग-

दाचे गठ्ठे रचले होते आणि टाक, दौती, टीपकागद, पेन्सिली कोंबल्या होत्या. मी ते गठ्ठे बाहेर काढले आणि पाहतों तों त्यांत अनेक पुस्तकांचीं हस्तलिखितं मला दिसलीं. ' रंकाचें आक्रंदन ' ' गंची बाधा ' ' चोराची आई ' वगैरे मथळे मी वाचले. हा सारा प्रकार पाहून मी आश्चर्यानं दिङ्मूढ झालों. येशा, पिल्लू गुरुजी हे दरोडेखोर नसून माझ्यासारखेच लेखक होते ! इतकंच नव्हे तर त्यांच्या कादंबऱ्यांचीं हस्तलिखितं देखील अर्धी अधिक तयार झालीं होतीं ! ह्या भयंकर प्रकारानं मी अगदीं स्तंभित झालो. इतका कीं ते तिघं राक्षस केव्हा खोलींत शिरले तें सुद्धां माझ्या लक्षात आलं नाहीं.

माझ्याजवळच्या वह्या, पुस्तकं हिसकलीं गेलीं तेव्हा मी भानावर आलो. वर पहातो तों तिघे जमदग्नीचे अवतार माझ्यावर धावून येत होते. आपलीं बिंग बाहेर पडलीं यापेक्षाहि आपल्या लेखनात व्यत्यय आला म्हणूनच या दरोडेखोराना–नव्हे–लेखकांना संताप आला होता. साहित्यिकांचंच भांडण तें ! जो हलकल्लोळ उडाला तो काहीं विचारूं नका. खालच्या थरानं देखील लाजेनं मान खालीं घालावी अशा शिव्या आम्ही एकमेकाना मोजीत होतों !

भांडून झाल्यावर संपल्यावर मग आम्हाला विचार सुचला, कीं आतां आपलीं बिंग बाहेर पडलीं आहेत खरीं. तेव्हा त्यासंबंधीं मारामारी करण्यापेक्षा ज्या ध्येयानं आपण चोर झालो तें ध्येय तरी पुरं करावं. तावडतोब चारी कोपऱ्यात आम्ही चौघेजण जाऊन बसलो. आपापलीं हस्तलिखितं बाहेर काढलीं आणि आघाडीवरचे शिपाई काय बंदुका चालवतील अशा आवेशानं आम्ही लेखण्या चालवूं लागलों. आठ दिवस या लेखण्यांचा आवाज अव्याहत चालू होता ! ट्रामगाड्या, मोटारी वगैरेंचे आवाज देखील त्यात बुडून गेले. कादंबरी आधी पुरी करून प्रथम प्रकाशकाला गाठण्यासाठीं आम्ही चौघेही धडपडत होतो.

अखेर आठदिवसानंतर आमच्या कादंबऱ्या लिहून तयार झाल्या. दाराबाहेर प्रथम कोणी पडावं या प्रश्नावर मारामारी होण्याचा संभव होता. पण बिऱ्हाडाला दारच नसल्यानं आम्ही चौघेही एकदम बाहेर पडलो आणि

प्रकाशकाच्या दिशेन धावत सुटलों. प्रकाशकाला आधीं कोण गाठतो अशी आम्हा चौघात शर्यतच लागली.

मी एखाद्या रेसच्या घोड्यासारखा धावत सुटलो होतों. पिल्यानं मधेच आडवा पाय घातला तसा मी तोंडघशी पडलो, आणि हातातल्या हस्तलिखितांची पानं वाऱ्यावर उडालीं. दलितवर्गाच्या प्रश्नाचे जळजळीत निखारे फुलवून समाजांत क्रांतीची आग भडकविणाऱ्या माझ्या कादंबरीचीं पानं मुंबईच्या डांबरी रस्त्यावर विखुरलीं गेलीं. आता त्या पानांचा उपयोग मुंबईच्या बायका शेगडी फुलवून पोटाची आग विझविण्याकडे करतील ! महाराष्ट्राचा हा खलिल गिब्रान, म्हणजे मी, अखेर अंधारातच राहिलो !

---

## एका कुलीन पुरुषाच्या
# नाट्यसेवेची अमर कहाणी ! : : ८

गर्जनेच्या खास अंकासाठीं नटश्रेष्ठ हंसराज यांची मुलाखत घेण्यासाठीं ठरलेल्या वेळीं मी त्यांच्या घरीं दाखल झालें. नटश्रेष्ठ माझीच वाट पहात बसले होते. मीही मुलाखतीची सर्व तयारी केली होती. रंगभूमीवर कुलीन पुरुषांनीं कामं करावींत कां करूं नयेत, रंगभूमीनं सिनेमा मारला कां जगवला संगीतांत नाटक घुसडावं कीं घुसडूं नये, वगैरे ठराविक प्रश्न व त्याना नटश्रेष्ठांनीं दिलेलीं ठराविक उत्तरसुद्धां लिहून मी एक 'रेडीमेड' मुलाखतच तयार केली होती. परंतु मी दाखविलेली ही 'रेडीमेड' मुलाखत नापसत करून नटश्रेष्ठ म्हणाले,

" ही मुलाखत दुसऱ्या एखाद्या नटासाठीं तुम्हांला उपयोगी पडेल. ती जपून ठेवा. मी मात्र तुम्हांला मुलाखत देणार नाहीं. त्याऐवजीं माझं चरित्रच मी तुम्हांला सागतो तें लिहून घ्या. कलेसाठीं कला या उच्च हेतूनं मीं—एक कुलीन पुरुष धंद्यात कसा पडलो ती हकीगत तुमच्या खास अंकाच्या वाचकांना जितकी उद्बोधक तितकीच मनोरंजक वाटण्यासारखी आहे."

असं म्हणून नटश्रेष्ठांनीं आपल्या खांद्यापर्यंत रुळणाऱ्या केशसंभारावरून हात फिरवला. काप जाऊन भोकं उरावीं त्याप्रमाणें पायाखालची रंगभूमी गेली तरी नटश्रेष्ठाच्या मस्तकावरच्या जटा शिल्लक होत्या. मी कागद पेन्सील सरसावून बसलें आणि नटसम्राट आपलं चरित्र सांगूं लागलेः—

" नाटकात काम करण्याची माझी आवड अगदीं जन्मापासूनची होती. इंग्रजींत ज्याला 'बॉर्न ॲक्टर' म्हणतात ना—तसा मी उपजत नट होतों. माझ्या आईनं कांहीं मला नाटकाचं बाळकडू उगाळून घातलं नव्हतं. ती सरळ बाळहिरडे उगाळूनच मला पाजीत होती. कित्येकाच्या घराण्यांतून पिढ्यानपिढ्या नाटकांचा धंदा चालतो, व नाटकांत काम करण्याची आवड आनुवंशिक असते. तसाहि कांहीं प्रकार माझ्या बाबतींत नव्हता. माझी वंशावळ तपासून पाहिलीत तर एखादा साहित्यिक तुम्हाला आढळेल, एखादा दरवडेखोरहि तुम्हांला सापडेल, परंतु एकहि नट सांपडणार नाहीं. तेव्हां नाटकांत काम करण्याची माझी आवड आनुवंशिक नव्हती. आनुवंशिक अशी एकच गोष्ट माझ्या वाट्याला आली होती ती म्हणजे दमा. पुष्कळांना गोड गळ्याची, किंवा सहज अभिनयाची 'ईश्वरी देणगी' असते. ईश्वर मलाहि कांही विसरला नव्हता. एकवेळ धूतपापेश्वर कंपनी आपलं वार्षिक कॅलेंडर धाडण्यास विसरेल. परंतु आमच्या पाळण्यांत आपली 'देणगी' दरवर्षी धाडण्यास ईश्वर चुकत नसे. ज्या गांवीं मी लहानाचा मोठा झालों त्या गांवांत एकही नाट्यगृह नव्हतें. रस्त्यानं जातांना एकही स्त्रीपार्टी नट दिसत नव्हता; आणि वर्तमानपत्रांतून फुकटची नाटकांची जाहिरातसुद्धां वाचायला मिळत नव्हती. तरीहि हवा निरोगी असतांना देखील प्लेगचा उंदीर पडावा त्याप्रमाणे प्रतिकूल परिस्थिति

असूनही माझ्या अंतःकरणांत नाट्यप्रेमाच बीजारोपण झाल होतं आणि माझ्या वयाबरोबर तो अंकुरही फोफावत चालला होता. नोकरीनिमित्त मी मुंबईला गेलों, तेव्हां माझ्या नाट्यप्रेमानं उचल खाल्ली. महिन्याकाठीं खर्डेघाशीचे चार पैसे खिशांत खेळत असत. त्याचंया जोरावर मुंबईतली सारी नाटकी दुनिया मी पालथी घालत असें. स्त्रीपार्टी नट, नाट्यगृह, किंवा नुसती नाटकाची जाहिरात दृष्टीस पडली कीं माझ्या मनांतली सुप्त महत्वाकांक्षा उसळून जागी होई.

"त्या काळीं मुंबईच्या सर्वांत जुन्या नाट्यविजय थिएटरांत, मुंबईच्या सर्वांत गाजलेल्या 'नाट्यकलाप्रकास' कंपनीचे सामाजिक, पौराणिक आणि ऐतिहासिक असे तडाखेबंद हाऊसफुल प्रयोग चालू. त्यावेळचं रंगभूमीचं वैभव काय वर्णावं! 'नाट्यकलाप्रकास' सारखी पहिल्या प्रतीची कंपनी, भव्य सेटिंग्ज, उत्कृष्ट नटसंच आणि विशेष म्हणजे रत्ना डोळे सारखी स्वरूप सुंदर नटी— वगैरे गोष्टींमुळे प्रत्येक प्रयोगावर पतंगाप्रमाणें शेकडो रसिक उड्या घालीत—"फिरती ढाल" या ऐतिहासिक प्रयोगांत रत्ना डोळेचं ढालगज काम आज कुणाला आठवल्याशिवाय राहील काय? 'खैबरखिंड' या गाजलेल्या ऐतिहासिक प्रयोगातील खिंडीच प्रचंड सेटिंग कुणाला आठवणार नाहीं? "चोरावर मोर" या सामाजिक हास्यरसप्रधान नाटकांत कंपनीच्या हीरो 'सत्यनारायण' याची मोराची उत्कृष्ट भूमिक कुणाला आठवणार नाहीं?

"इतर अनेक कंपन्यांचे खेळ मी पहात असे. परंतु नाट्यकलाप्रकास कंपनीच्या नाटकासाठीं मी जवळ जवळ वेडा झालों होतो. त्याचीं नाटकं मला आवडत होतींच शिवाय त्याचे प्रयोग चालू असताना मला हवा तो एकांत नाट्यगृहांत मिळत असे. नाट्यविजय थिएटर म्हणजे माझं एक निवांत विश्रांतिस्थान होऊन बसलं होतं. कित्येकदां कंपनीचं नाटक चालू असतांना जणुं सबंध थिएटर माझ्यासाठीं रिझर्व केल्याप्रमाणें मीं एकटा त्या भव्य नाटकगृहांत बसून नाटक पाही. प्रयोग इतका उत्तम वठे की तासन् तास मी गुंग होऊन बसे. नाटक संपलं, पडदा पडला तरी मी भानावर येत नसे. नाट्यगृहाचा म्हातारा नोकर झाडून खुर्च्या झाडतां झाडतां माझ्याही डोक्यावर

झाडूचा फटकारा मारून जाई तेव्हां कुठें माझे डोळे उघडत. अजून जेव्हां कधीं कधीं ' घरांत ' झाडूचा फटकारा मला मिळतो तेव्हां नाट्यविजयांतल्या त्या सुखसमाधीच्या स्मृति माझ्या मनांत जागृत होतात!

" परंतु केवळ प्रेक्षक म्हणून जगण्यांत माझं समाधान होत नव्हतं. नाटकांत काम करण्याची माझी तळमळ दिवसेंदिवस वाढत चालली होती. पीटांत बसून नाटक पाहतांना पुष्कळदा माझं मन बंड करी कीं इथं जमीनीवर बसण्याऐवजीं आपण तिथं, रंगभूमीवर कां जाऊं नये. फक्त जागा बदलायची एवढंच. नटाला आवश्यक ते सारे गुण माझ्या अंगीं होते यांत मला शंका वाटत नव्हती. परंतु जन्मभर मी प्रेक्षकच राहिलों तर ते सारे गुण वाया जाणार होते. नट म्हणून मी रंगभूमीवर येण्याचा अवकाश—माझ्या कलेचं सामर्थ्य मी दाखविलं असतं. कित्येकदां समोर रंग-भूमीवर एखादा दिलखेचक, हृदयद्रावक प्रसंग चालू असतांना, सबंध रिकामं नाट्यगृह भावनाविवश होऊन तटस्थ राहिलं असतांना, मी टाळ्यांचा गजर करीं. रंगभूमीवरील नटाचा मला कितीहि हेवा वाटला तरी वेळ प्रसंग साधून त्याच्या गौरवासाटीं माझे हात कधीं कचरले नाहींत.

" नाटकांत काम करण्याची माझी फार दिवसाची इच्छा पुरी होण्याचा योग लवकरच आला. रंगभूमीवर माझं पहिलं पाऊल अगदीं अनपेक्षित आणि चमत्कारिक अशा प्रसंगानं मला टाकावं लागलं. कलाझकासच्या ' फिरती ढाल ' या गाजलेल्या नाटकाचा पन्नासावा प्रयोग मजुरांचे एकमेव पुढारी भाई सयगल यांच्या अध्यक्षतेखालीं थाटामाटात साजरा होणार होता. या सुमारास मुंबईच्या गिरण्यांतील मजुरांनी भाई सयगलच्या नेतृत्वाखालीं संप पुकारला होता. त्यामुळे सयगलच्या अध्यक्षतेखालीं होणाऱ्या ' फिरती ढाल ' च्या प्रयोगाला मजुरांची अलोट गर्दी लोटली. एरवीं ज्या नाटकगृहांत एखाद दुसरा फुकट पासावर येणारा वर्तमानपत्रांचा हाडकुळा बातमीदार बसलेला दिसे, तें नाट्यगृह पीटापासून गॅलरीपर्यंत मजुरांनीं—आणि मवाल्यांनीं खेचून भरलं होतं!

"नाटक सुरू झालं. पडदा वर गेला. आणि स्वरूप सुंदरी रत्ना डोळे रजपूत रमणीच्या वेषांत जेव्हां स्टेजवर आली तेव्हां तिच्र स्वागत करण्यासाठीं त्या असंख्य प्रेक्षकानीं एकच हलकल्लोळ उडविला. नाटकाचा सबध पहिला अंक या हलकल्लोळांत बुडून गेला. पण खरी धमाल उडाली तिसऱ्या अंकात. पडदा रणांगणाच्या देखाव्यावर उघडला. रजपूतरमणी रत्ना डोळे आपल्या भूपतीला–सत्यनारायणाला—प्रोत्साहन देण्यासाठीं जातीनं रणांगणावर तलवार घेऊन आली होती तर तिच्या पतीचा खिमा करण्याची कसम घेऊन शत्रू अफसोसखान आपली कट्यार पाजळीत होता. सत्यनारायण आणि अफसोसखान यांचा घनघोर संग्राम जुंपला. आणि अफसोसची कट्यार सत्यनारायणाच्या काळजांत आरपार घुसणार तोंच रजपूतरमणी समशेर सरसावून पुढें धावली. हरिणीसारखी ती रजपूतरमणी आणि रक्ताला लालचावलेल्या लांडग्यासारखा तो अफसोसखान याचं तें भीषण संगर पाहून माझ्या एका कारकुनाच्या—अंगांतही वीरश्री संचारली. मग ज्यांचं ध्येयवाक्य 'हातोडाकोयता' त्या असंख्य मजुरांचं रक्त किती उसळलं असेल! मालकशाहीवर खवळलेल्या आणि उपासमारीन चिडलेल्या त्या प्रेक्षक समुहांतून वीरश्रीच्या भयंकर आरोळ्या उठल्या. कुणी स्टेजच्या रोखानं टोप्या फेकल्या, भेळ चिरमुऱ्याचे पुडे फेकले, तर कोणी पायांतल्या चपला भिरकावल्या! परंतु हा प्रकार इथेंच न थांबतां बहकतच चालला. कांहीं बागवानांनीं भाजीच्या टोपल्या फेकल्या. मेहेतरांनीं लांब दांड्यांचे झाडू भिरकावले, आणि माझ्या आजूबाजूच्या गुंडांनी तर खुर्च्या फेकण्यापर्यंत पाळी आणलीं. गोष्टी भलत्याच थराला पोचल्या असा विचार माझ्या मनांत डोकावतो न डोकावतो इतक्यांत, माझ्या शेजारींच बसलेल्या एका तडाखेबंद मजुरानं मला मानगुटीस धरून वर उचललं आणि चेंडू भिरकवावा तसा मला सरळ स्टेजच्या रोखानें भिरकावला! मी स्टेजवर जेऊन आपटलो तो बरोबर रत्ना डोळेच्या पायाशीं!

"अशा रीतीनं रंगभूमीवर माझं पहिल पाऊल पडलं होतं!

"नाटकाच्या शेवटल्या अंकाचा पडदा पडेपर्यंत मी तसाच रत्ना डोळेच्या पायाशीं डोळे मिटून होतों. रणांगणाचा सीन असल्यामुळे माझ्याकडे

आपोआपच मुढ्याची भूमिका आली होती. परंतु नाटक संपल्यावर सर्व पात्रं रंगभूमीवर ओळीनं उभों राहून 'भरतवाक्य' म्हणूं लागली तेव्हां मीहि चटकन् उठलों आणि माझा आवाज त्याच्या गाण्यांत मिळविला. कलाज्ञकास कंपनींत अशाप्रकारें नट म्हणून मी प्रवेश केला !

'कलाज्ञकास' कंपनींतले माझे दिवस अतिशय आनंदाचे गेले. एक उत्कृष्ट नट म्हणून पुढें येण्याची माझी महत्त्वाकांक्षा या कंपनींत राहून मी पुरी केली. तेथं माझ्या अंगच्या नाट्यगुणांना भरपूर वाव मिळाला व जनतेनंहि माझी सेवा मानून घेतली. मी नटश्रेष्ठ ही पदवी माझ्या नांवामागें लावूं लागलो. कलाज्ञकास कंपनीनं पुढें जी सामाजिक, पौराणिक व ऐतिहासिक नाटकं बसवलीं त्या सर्वांतून माझ्या भूमिका गाजल्या. आमच्या 'एक खांबी तंबू' या सामाजिक नाटकाचे पाचशें एक प्रयोग झाले. माझी खांबाची भूमिका अमर टरली ! 'जवळचे दिवे' या नाटकात सारे दिवे एकटा मी लावीत असे. 'संत ज्ञानेश्वर' या आमच्या पौराणिक बोलपटात वशिल्याच्या जोरावर सत्यनारायणानं ज्ञानेश्वराची भूमिका पटकावली असली तरी दर प्रयोगाला हाऊस फुलची पाटी थिएटरवर लागत असे ती माझ्यामुळें. माझा चालत्या भिंतीचा आणि बोलक्या रेड्याचा डबल रोल पाहण्यास शहरांतूनच काय पण खेड्यापाड्यांतूनहि शेतकऱ्यांचे प्रचंड मोर्चे येत !

"परंतु ही माझी लोकप्रियता व यश कंपनीच्या हीरो सत्यनारायण यास पाहवली नाहीं. सत्यनारायण माझा मत्सर करीत असे. याला दुसरेंहि एक कारण होतं तें कारण म्हणजे रत्ना डोळे ! ज्या दिवशीं प्रथम मीं तिच्या पायगती पडलों, त्या दिवसापासूनच माझं प्रेम तिच्यावर जडलं होत, व हीच गोष्ट आम्हां दोघां नटांतल विशुष्ट वादविण्यास कारणीभूत झाली होती. परंतु याचा परिणाम मात्र कपनीवर झाला. सत्यनारायणाचं चित्त नाटकांत लागेना. केव्हांही कुठेंहि त्याची मत्सरी विषारी नजर मला शोधीत राही. प्रयोग भराभर पडूं लागले. नोकर कंपनी सोडून जाऊ लागले. खिडीचं सेटिंग लावणं, हलक्या आवाजांत ओरडून प्रॉम्टिंग करणं, आणि मेक-अप–विशेषतः रत्ना डोळेचा–करण आणि स्वतःच्या भूमिकाही पार पाडण अशा अनेक कामांची जबाबदारी

माझ्यावर पडली. कंपनीचं वाढत चाललेलं कर्ज भागविण्यासाठीं आम्ही कंपनी घेऊन दौऱ्यावर जाण्याचं ठरविलं. लहान मोठ्या गावीं प्रयोग गाजवून आमची कंपनी अखेर वाई शहरीं दाखल झाली.

" आमचा हुकमी एक्का–' एक खांबी तंबू ' हा प्रयोग आम्ही प्रथम लावला. परंतु एकही तिकीट खपलं नाहीं. मर्तिकाच्या आमंत्रणाची टाळाटाळ करावी त्याप्रमाणें लोक फुकट पास घेण्याची देखील टाळाटाळ करूं लागले. अखेर रिकाम्या थिएटरबाहेर हाऊसफुल्ल अशी पाटी लावून आम्ही आमचा प्रयोग दणकेबाज उडवून दिला. मात्र प्रयोग चालू असताना ज्या तऱ्हेनं सत्य-नारायण माझ्याकडे पहात होता ती पाहून माझ्या काळजाचं पाणी झालं. सत्यनारायणचं लक्षण काही ठीक नव्हतं.

" दुसऱ्या प्रयोगाच्या रात्रींही थिएटर रिकामें ! तिसऱ्या प्रयोगाला नाहीं म्हणायला एक अर्धवट मेनिजायटिस झालेला पेशंट पीटांत निजलेला आढळला. नाट्यगृह म्हणजे वाईचं हॉस्पिटलच अशी त्याची समजूत झाली होती ! चौथ्या रात्री पुन्हा थिएटर रिकामें !

" लागोपाठ रिकाम्या थिएटरपुढें प्रयोग करून करून आमची सह-नशक्ती भयंकर ताणली गेली होती. त्यांतच सत्यनारायणाचं व माझं वितुष्ट भयंकर विकोपाला गेलं होतं. चौथ्या रात्रीं आमची ' फिरती ढाल ' हा गाज-लेला प्रयोग आम्ही करीत होतों. सुरवातीपासूनच दोन बोक्याप्रमाणें आम्ही एकमेकावर फिस्कारत गुरगुरत होतों. अखेर या भांडणाचा स्फोट तिसऱ्या अंकांत रणांगणाच्या सीनवर झाला. अफसोस खान बुइंगमधून आरोळ्या ठोकीत व कट्यार परजीत धावत येतो व त्याच्याशीं सामना देण्यापूर्वी सत्य-नारायण आपल्या शूर पत्नीला रजपूत रमणीला आलिंगन देतो असा प्रसंग होता. माझ्याकडे पूर्वीप्रमाणेच रणांगणावरील मुडद्याची भूमिका होती. रत्ना डोळेला आलिंगन देण्यासाठीं सत्यनारायण हात पसरून डौलदार पावलें टाकीत एखाद्या कोंबड्याप्रमाणें तिच्याजवळ येऊं लागला. त्याबरोबर मुडद्याच्या

भूमिवे ही माझ्या अंगचं रक्त सळसळलं व मी हळूंच सत्यनारायणाच्या पायांत माझा मेलेला पाय घालून त्याला पायचित केला! रत्ना डोळेला आलिंगन देण्याऐवजीं त्यानं रंगभूमीला आलिंगन दिलं! वास्तविक हा साराच अपघात घडलेला. सत्यनारायण मला ठेचाळतो काय, आपटतो काय आणि मग रागानं एखाद्या कडकलक्ष्मीप्रमाणे नाचतो काय, असं मी मनाशी आश्चर्य करूं लागलों. इतक्यांत सत्यनारायणानं माझी मानगूट पकडली व रत्ना डोळेच्या पायगती पडलेला माझा जिवंत मुडदा वर हवेंत उचलून इतक्या जोरानं फेकून दिला कीं तो बरोबर पीटांत जाऊन पडला!

पीटांत बसून मी बाकीचं नाटक पाहिलें. परंतु तें देखील खरोखरीच्या एकाद्या मुडद्याप्रमाणें. अफसोसखानाची कट्यार सत्यनारायणाच्या काळजात आरपार गेली तरी माझ्या अंगावर रोमांच उभे राहिनात. पूर्वीप्रमाणें टाळ्यांचा गजर करण्यास माझे हात जवळ येईनात. एकीकडे स्टेजवर चाललेला तो प्रयोग पाहत असतां माझ्या मनांत येत होतं, नाट्यसृष्टींत आपण घालवलेलीं दोन वर्षे म्हणजे आपल्याला पडलेलं एक दीर्घ स्वप्न तर नव्हे? तें संपलं होतं आणि त्यांबरोबर माझ्या अंतःकरणातलं नाटकाचं वेडहि.

"'फिरती ढाल' नाटक संपलं. पडदा पडला. मीहि नाट्यगृहाबाहेर पडलों तों कायमचाच! परंतु मी वाजविलेल्या टाळ्यांचा गजर मात्र त्या रिकाम्या गृहांत नंतर किती तरी वेळ घुमत राहिला."

प्रिय मित्र श्यामल

तुम्हाला चिठ्ठी मिळाली अभ्यास

येथे सर्व आनंद है तुमचा

गाव सुंदर आहे तुम्हाला आमे

तुमचा न भुलो न आभिमानी

स्वार्थ आमी तुमचा तुम्हाला

~~[illegible]~~ आचार्य ... फुले

मिळणार नाही व तुम्ही गाव

कारण [illegible], [illegible] तुम्ही

को [illegible] विद्यार्थी अभ्यास

[illegible] आणि [illegible] ने

[illegible] और [illegible]

~~[illegible]~~ [illegible]

[illegible] [illegible] [illegible]

[illegible] [illegible] [illegible]